म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय नाटक
दा.क्र. २०९६७
IRBK-0120161
IRBK-0120161

वाचनालय
नाटक
२०९६१
२५।१।८४

बाळ कोल्हटकर

# अवघा आनंदी आनंद

IRBK-0120161
IRBK-0120161

जोशी ब्रदर्स, पुणे

अवघा आनंदी आनंद

प्रथमावृत्ती :
अनंतचतुर्दशी, २६-९-१९७७
शके १८९९

प्रकाशक :
केशव वामन जोशी
२५ बुधवार पेठ
अप्पा बळवंत चौक,
पुणे - २

© बाळ कोल्हटकर

मूल्य सात रुपये

मुखपृष्ठ :
सालकर

मुद्रक :
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे - ३०



जगातून एखादी व्यक्ती गेल्यावर त्याची उणीव जाणवते.
या नाटकात अशी एक व्यक्ती जाते, पण परत येते !
पण कधीच परत न येण्यासाठी गेलेल्या आमच्या परमश्रेष्ठ मित्राला—
कै. पद्मश्री **वसंत देसाई**
यांच्या चिरंजीव स्मृतीला
हे सुखान्त नाटक मोठ्या दुःखी मनानं
अर्पण करीत आहे.

**— बाळ कोल्हटकर**

॥ जयदेवी श्रीसरस्वती ॥

'प्रस्तावना' काय लिहावी का लिहूच नये या द्विधा मनःस्थितीत असतानाच मी पेन उचललेलं आहे! या नाटकाबद्दल बरंच काही आज तारखेपूर्वी वृत्तपत्रांतून लिहिलं गेलेलं आहे! ज्यानं त्यानं स्वतःला जे वाटलं ते लिहिलं!— जसं मी स्वतःला वाटतं तसं नाटक लिहिलेलं आहे! प्रत्येकजण स्वतःच्या विचारांचं समर्थन करायला मुक्त आहे, तशी मुक्तता आपणही घ्यायला हरकत नाही असं वाटलं, म्हणून हा प्रस्तावनेचा प्रपंच!

सर्व समीक्षकांचा रोख (अपवाद वगळता) या नाटकाला कथानक नाही फक्त संवाद आहेत, असा आहे! 'चांगले' असं मी म्हणत नाही; कारण ते त्यांनी म्हटलं आहे! माझा प्रश्न असा की, कथाच नसेल तर संवाददेखील कुठून? असो! आज प्रायोगिक रंगभूमीवर वेगळे वेगळे प्रयोग करून पाहिले जात आहेत! व्यवसाय हा प्रयोगापासून लांब का असावा असं मला सदैव वाटत आलं आहे; म्हणून पूर्वीपासून (आकाशगंगेपासून) वेगवेगळे प्रयोग मी करत आलो आहे! हे नाटक त्यातलाच एक प्रकार आहे, हे प्रथम नम्रपणे नमूद करून ठेवतो! आता व्यवसायात प्रयोगांना यश मिळत नसतं ती प्रथा या प्रयोगापुरती खोटी ठरली ह्याचे धनी प्रेक्षक! त्यांचा मी आभारी आहे!

१९४६ सालापासून मी रंगभूमीवर नाटकं लिहीत आलो आहे! प्रयोग करीत आलो आहे! तेव्हा थोडंसं या विषयात आपल्याला समजू लागलं असा अहंकार मला आला असेल, तर त्याबद्दल क्षमा तरी का मागावी? **कारण अहंकार हा कधीच क्षमा-प्रार्थी नसतो!** (एक चांगला संवाद कथा नसलेल्या प्रस्तावनेसाठी लिहिलेला) ऊर्ध्वं मूलं अधःशाखां अश्वत्थं प्राहुरव्ययं असं विश्वरूपाचं वर्णन गीतेमध्ये बहुतेकांनी वाचलंच असेल! तसाच विचार हे नाटक लिहिण्यापूर्वी माझ्या मनात येऊन गेला. म्हणून या नाटकाच्या सुरुवातीपासून प्रत्येक समस्या सोडवत सोडवत शेवटी मी गाठ मारून ठेवली आहे. म्हणजे फांद्या खाली आणि मूळ वरती असा या नाटकाचा प्रकार आहे.

एका लिफ्टमध्ये चार-पाच एकमेकांचे कट्टर शत्रू उभे असताना मध्येच वीज-प्रवाह खंडित होऊन बराच काळ लिफ्ट थांबते आणि पुन्हा कधीच सुरू होणार नाही अशी शंका आल्यामुळे ते सर्व प्रवासी एकमेकांचे वैर विसरून गाढ स्नेही होतात. आणि काही काळाने पुन्हा लिफ्ट सुरू झाल्याबरोबर पुन्हा एकदा एकमेकांचे कट्टर वैरी बनून बाहेरच्या जगात प्रवेश करतात. ही कथा ज्यांनी वाचली असेल (अर्थात ही कथा असली तर!) त्यांना या नाटकात कथानक नाही असं म्हणावंसं वाटलं तर मुळातच हा विचारातला मतभेद ठरेल. जन्म, लग्न आणि मृत्यू ह्या तीनच विषयांवर आयुष्याच्या नाटकाचं कथानक घडत असतं. आता आयुष्यालाच कथानक नाही असं जर म्हणायचं असलं तर या नाटकाला कथनाक नाही हे आपल्याला एकदम मान्य!

माणसाचा मृत्यू हे एक विनोदाला उत्तम माध्यम आहे असं कै. आचार्य अत्रे मागं एका व्याख्यानात म्हणाले होते; त्याचा मी सूत्र म्हणून या नाटकात उपयोग केलेला आहे! उदा.– दुसऱ्या अंकाच्या शेवटी एका व्यक्तीचा मृत्यू दाखवून तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीला तो प्रेक्षकांना जिवंत दाखवून नंतर त्याच्या घरची रडारड प्रेक्षकांना भरपूर हसवू शकते हा प्रयोग या नाटकाच्या निमित्तानं मी सिद्ध केलेला आहे.

व्यावसायिक रंगभूमी ही प्रेक्षकांचं रंजन करण्यासाठी राबवली जात असते; किंबहुना जावी असं मानणाऱ्यांपैकी मी एक आहे. तान्ह्या मुलाच्या निरागस वृत्तीनं तिकिटं काढून येणारा प्रेक्षक नाटकाला येत असतो, अशी माझी एक भोळी समजूत आहे. तान्हं मूल जसं वेगळे वेगळे रंग डोळ्यांपुढं आणि वेगळे वेगळे ध्वनी कानावर आल्यानंतर आनंदानं खिदळत असतं तोच प्रेक्षकांच्या बाबतीत मला आजपर्यंत आलेला अनुभव आहे. बीभत्स, अश्लील वा असभ्य असं काही तरी लोकांना दाखवून त्यांच्या भावना चाळवण्यापेक्षा आयुष्यात येणाऱ्या चांगल्या वा गोड अनुभवांची जंत्री प्रेक्षकांच्यापुढे ठेवून त्यांचं मनो-रंजन करणं इतक्यापुरताच माझा अभ्यास मर्यादित असल्यामुळे परीक्षकांच्या काटेरी विधानांचा अर्थच मला कळत नाही. हा माझ्या दृष्टीने माझ्या समा-धानाचा भाग. अज्ञानात सुख असतं असं म्हणतात ते हे असं! तेव्हा त्यांचा राग येण्याइतकी बुद्धीच मला परमेश्वराने दिली नाही याबद्दल परमेश्वराचे आभार मानले म्हणजे समीक्षकांचे वेगळे मानायला नकोत.

एक प्रश्न मात्र माझ्या डोळ्यांसमोर या परीक्षणाबद्दल नेहमी तरळत असतो; की रंगभूमी किंवा नाटक हा साहित्यातला एक श्रेष्ठ प्रकार आहे असं आवर्जून सांगणाऱ्या आजच्या जमान्यात नाटकांची परीक्षणं पूर्वीप्रमाणे वृत्तपत्रांचे संपादक आपल्या अग्रलेखातून का करीत नाहीत ?— जसं पूर्वी अच्युतराव कोल्हटकर वा काकासाहेब खाडिलकर करीत असत. का सध्याची रंगभूमी ही एखादी बातमी देण्याइतपतच योग्यतेची आहे असा त्यांचा विश्वास असून जशी आम्ही फक्त नाटकाची जाहिरात करतो तशीच मराठी रंगभूमी ही एक श्रेष्ठ कला आहे असा एक नाममात्र आभासाचा फुगाच फक्त समाज-आकाशात तरंगत ठेवण्यात आला आहे ? असो ! कधी नव्हे ते नाटक या विषयावर प्रस्तावनेच्या निमित्ताने लिहून प्रकाशकांना अडचणीत टाकलं तर जोशीबुवा ( जोशी ब्रदर्स, बुकसेलर्स ) रागावणार नाहीत ही खात्री आहे; म्हणून त्यांचे आभार मानतो. बाकीचे सर्व आभाराचे धनी यापूर्वीच्या नाटकांच्या प्रस्तावनेतून येऊन गेले आहेत. त्याची द्विरुक्ती न करण्यातच ती केल्यासारखी आहे. समीक्षक आणि प्रेक्षक यांतला फरक आम्हांला जाणवणारा वा आवडणारा आपल्याला कळावा यासाठी सोबत कविवर्य श्री. सोपानदेव चौधरी यांचे या नाटकाबद्दल मतप्रदर्शन करणारं मला आलेलं पत्र सोबत जोडलेलं आहे. त्यात माझी स्तुती करणारा मजकूर ( कंसातला ) वाचकांनी कृपया वाचू नये. जास्त काय लिहू ?

पुढचं नाटक हे मला लिहिलंच पाहिजे. एक सर्वोत्कृष्ट नाटक मी लिहिलं असं समीक्षक आणि प्रेक्षक दोघेही ज्या दिवशी म्हणतील तो सुदिन असं मी समजेन. पूर्वाश्रमीच्या कु. शीला गुप्ते या नाटकाच्या निमित्ताने पुन्हा रंगभूमीवर आल्या याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो आणि थांबतो.

आपला नम्र,

**बाळ कोल्हटकर**

॥ श्री ॥

२ आनन्द-निवास
मंगलवाडी, गिरगाव
जगन्नाथ शंकरशेट मार्ग
मुंबई ४०० ००४

प्रिय बाळासाहेब !

सप्रेम निवेदन प्रणाम– आनन्द, विशेष ! या जगात बालपणीच थोरपण घेऊन येणारी माणसे अगदी क्वचित ! " देखा काव्य-नाटका, जे निर्धारिता सकौतुका ! " ते कौतुक आपण घेऊनच आला आहांत. साहित्य हा आपला सहजधर्म ! ( सर्वेच जन्माला असा सह + ज ! )

" अनुभव वेडावला, अनुभूतिपणें "

अनुभवाला वेड लागावें लागतें तेव्हांच त्यांतून अनुभूति निर्माण होते. तो अनुभूति-सांठा आपणांमध्यें सांठला आहे. ' अवघा आनंदी आनंद, ' हें आपलें नाटक बघून असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं. आपलीं बहुतेक सर्व नाटकें याच प्रणालींतलीं ! परंतु " अवघा आनंदी आनंद " हें आगळेंच वैशिष्ट्य ! दुर्वांची जुडी या नाटकावर आलेली ही साय ! या नाटकांतील सुभाषितांची पेरणी हृदयाचा ठाव घेते. ती दाद रसिकांनीं दिलेली प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली. अत्यंत ध्येयवादी हें नाटक. त्यांत शांत अन् करुण-रसाच्या बरोबरच आलेला विनोद. ज्या विनोदाला पंख आहेत, डंखाचें नांव नाहीं असा ! साहित्य सोनियाच्या खाणीं अन् बोधबोधाची लेणीं ल्यायलेल्या नाटकाला " ॲवॉर्ड " मिळायला हवें असेंच वाटतें.

या नाटकांतील गुरुजी या प्रमुख भूमिकेंत आपण इतके तद्रूप होऊन गेला होतां कीं प्रयोग संपल्यानंतर आपल्याला भेटलों. तो आवाज रंगभूमीवर ऐकला, तोच आवाज आणि जातांना आपला निरोप घेतला त्या वेळीही तोच आवाज. भूमिकेशीं आपण किती तद्रूप झाला होतां याची प्रत्यक्ष प्रचीति आली.

वारा वाहून गेला तरी वृक्षाचा डोल
राहून जातो.
भूमीवर पाणी लोळून गेलें तरी
ओल राहून जाते.

अशी ती तंद्री. त्या तंद्रीतच आपला निरोप घेतला. तुम्ही चि. बाळ म्हणून शाबासकी दिली, परंतु त्याच्याही वर म्हणजे मी तुमची दृष्ट काढतों. नाटकांतील सुभाषितें आणि संवाद-भाषितें कानांत येऊन हृदयांत ठाव घेणारीं !

जें हें विश्वचि होऊनि असे
परी विश्वपण नासिल्या न नासे
अक्षरें पुसल्या न पुसे
अर्थु जैसा.

तीं अक्षरें, तो अर्थ असाच आपल्या येवो, तो आलेलाच आहे. जास्त काय लिहू ? सर्वस्पर्शी असें नाटक !

दाद देणारा दादा
**सोपानदेव चौधरी**

*आणखी एक महत्त्वाचें म्हणजे आपणांस ज्यांनीं साथ दिली अशा नट-संचाची ! सर्वांचींच कामें आपापल्या परीनें उत्कृष्ट अशींच, " ते अलंकारिले कवण कवणें ! " अशाच ह्या भूमिका ! योजकस्तत्र दुर्लभः. हें तर आपलें वैशिष्ट्य ! इति.

# अवघा आनंदी आनंद

[ डी. आर. एम. ४२९।७७ ]

या नाटकाचा प्रथम प्रयोग 'दुर्वांची जुडी'च्या सहकार्याने श्री. हरीष कुलकर्णी यांनी रविवार, दि. २४ जुलै १९७७ रोजी सकाळी १० वाजता रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी, मुंबई, या ठिकाणी सादर केला. त्या प्रथम प्रयोगात भाग घेणारे कलावंत व तंत्रज्ञ :

**प्रवेशानुक्रमे पात्र-परिचय**

| | | |
|---|---|---|
| विठ्ठल धोंडो पूर्णपात्रे | : | श्री. बाळ कोल्हटकर |
| लोके | : | वामन पटवर्धन |
| आई | : | सौ. शीला गुप्ते |
| टिंकी | : | कु. वंदना पंडित |
| चैतन्य | : | शशिकांत शिर्सेकर |
| उसासे | : | गणेश सोळंकी |
| विहंग | : | सदाशिव कान्हेर |
| पोलिस | : | वसंत दुदवडकर |
| सुखात्मे | : | आ. दे. पाटील |
| सेक्रेटरी | : | अविनाश लोलयेकर |
| दारुड्या | : | प्रशांत टिपणीस |
| इन्शुरन्स ऑफिसर | : | रघुनाथ लोके |

---

लेखक-दिग्दर्शक : बाळ कोल्हटकर ☐ नेपथ्य : बाबा पार्सेकर
संगीत : यशवंत देव, राम फाटक ☐ पार्श्वगायक : भीमसेन जोशी, राणी वर्मा
प्रकाश-योजना, ध्वनिसंकेत : मारुती पाटील ☐ ध्वनिमुद्रण : शशांक लालचंद
रंगमंच-व्यवस्था : अंबाजी, मामा, हरी, बाबू, गजानन आणि सहकारी

निर्मिति-सूत्रधार : बाळ कोल्हटकर, हरीष कुलकर्णी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २०१६१ नों. दि. २५।१।८४.
वि. नाटक क्र. ..................

॥ जय देवी सरस्वती ॥

[ कुठल्याही मध्यमवर्गीय माणसाच्या घराचा मधला बैठकीचा भाग. टेलिफोन, एक कॉट. एका बाजूला दोन खुर्च्या, टी-पॉय. डावीकडून स्वयंपाकघरात जाण्याचा रस्ता, उजव्या हाताला पुढे खिडकीतून एक खोलीचा अंतरभाग पुढे आलेला दिसतो. त्या खोलीच्या भिंतीला टेकून एक कॉट ठेवलेली आहे. वर गादी, टेकून बसायला. समोर बाहेरून येण्याचा दरवाजा. एक पानाचा डबा. त्या कॉटवर आहे. ]

पडदा उघडतो तेव्हा कॉटवर गुरुजी बसलेले असून खाली लोके बसलेले आहेत. रेडिओवर अभंग चालू आहे. तेव्हा खिडकीत असलेल्या आरशात बघून एक मुलगी आपल्याला वेणी घालत असलेली दिसते. रेडिओवर मोठ्या आवाजात एक कार्यक्रम ऐकू येतो. रेडिओ अनाउन्समेन्ट— 'यानंतर ऐका अभंगवाणी, गायक भीमसेन जोशी, कवी— विठ्ठल धोंडो पूर्णपात्रे—' ]

## अभंग

**अवघा आनंदी आनंद**
**मना घेई हाचि छंद ॥ धृ० ॥**
**न लगे धनसंपदा**
**शुद्ध बुद्धी देई सदा**
**नांदो जनांत आनंद**
**सत्य सदा समतानंद ॥ १ ॥**

समदृष्टी विश्व पहावे
दुसरा आपण होऊन जावे
जीव शिवाला भेटतो
तेथे होतो नामानंद ॥ २ ॥
जन्ममरण याचि देही
सोसणारा दुजा नाही
सोसविता मेळवितो
दुःखामाजि नित्यानंद ॥ ३ ॥

**बाबा :** समता ही अंगात बाणली पाहिजे, लय झाली पाहिजे आयुष्याच्या तालाची हा वेगळा, मी वेगळा हा विचार डोक्यातून गेला पाहिजे.

**लोके :** हो ! तो तर गेलाच पाहिजे.

**बाबा :** हे नुसतं तुम्ही म्हणता, तुम्हाला तरी अर्थ कळला आहे का समता या शब्दाचा.

**लोके :** त्याच्यासाठीच तर आपल्याकडे येतो गुरुजी.

**बाबा :** माझ्या स्तुतीनं काही साधण्यासारखं नाही, समतेची सवय झाली पाहिजे. तुम्ही मला कोण समजता ?

**लोके :** गुरुजी.

**बाबा :** ते तर झालंच ! थोडा पैसा जवळ आहे. काही थोड्या शाळा बांधल्यात. म्हणून म्हणत असाल गुरुजी.

**लोके :** थोड्याशा का ? एकूणचाळिसाव्या शाळेचं उद्‌घाटन आहे येत्या दसऱ्याला.

**बाबा :** हे तुम्ही मला सांगता. तसं पाहिलं तर मुक्या शाळेचं उद्‌घाटन. तो काही विशेष अभिमानाचा भाग नाही. तो माझा धर्म झाला. झाड काही फुलांचा वास जगाला मिळावा म्हणून आपली पानं हालवत नाही. ते देहधर्मानं होतं. तुम्ही मूळ मुद्दयावर या. समतेचा अर्थ काय ?

**लोके :** तुम्हीच सांगा.

**बाबा :** तुम्ही शेजारी येऊन बसा.

**लोके :** हा वादाचा विषय आहे. या बाबतीत तुमचं-माझं जमायचं नाही.

**बाबा** : लोके ! मी तुम्हांला रेम्या डोक्याचा म्हणतो ते एवढ्यासाठी. एवढी साधी समता तुम्हांला कळत नाही.

**लोके** : ही कसली समता ! तुमच्याजवळ येऊन बसायची. अहो ! गवत किती वाढलं तरी वडाच्या डोक्यावर जाऊन बसेल का ?

**बाबा** : चुकून चांगलं वाक्य बोललात. आनंद आनंद, अवघा आनंदी आनंद !

**लोके** : अहो, तो व्यायचीसुद्धा पात्रता पाहिजे. आम्ही कुब्या मनाची माणसं. दुसऱ्याचं चांगलं बघून कौतुकानं भरून येणारी माणसं मिळतात कुठे या जगात.

**बाबा** : सोपी युक्ती सांगू ? समोरचा माणूस उद्या मरणार आहे या समजुतीनं त्याच्याकडे पाहिलं म्हणजे आपल्याला त्याचा कधी राग येत नाही ना.

**लोके** : काही समजलं नाही.

**बाबा** : अहो डोके ! आपलं लोके ! समजा, उद्या मी मरणार आहे.

**लोके** : ( लोके डोळे पुसतो ) छे, छे ! भलतंच काय बोलता ?

**बाबा** : अरे, डोळे काय पुसतोस ? बरं, समजा, उद्या तुम्ही मरणार आहात.

**लोके** : मी कशाला मरेन ?

**बाबा** : अरे बाबा, कारण काहीही पुरतं, तारेवरचं पाखरू उडून जावं तसं प्राणपाखरू केव्हा उडून जातं पत्तासुद्धा लागत नाही. ते असो. समजा, तुम्हांला आज कसं कळलं.

**लोके** : कसं ?

**बाबा** : उद्या मी मरणार आहे.

**लोके** : छे, छे ! असं होणार नाही.

**बाबा** : अरे बाबा समज, त्या क्षणापासून माझ्या प्रत्येक हालचालीकडं तुम्ही सहानुभूतीनं पाहाल की नाही !

**लोके** : वा ! वा ! का नाही ?

**बाबा** : बस् ! तेवढं एकदा अंगात बाणलं म्हणजे अवघा आनंदी आनंद...

**आई** : ( प्रवेश करून ) लोके ! उठा ! तुमचं काय समाजकार्य असेल ते बाहेर जाऊन करा. तुम्हांला काही काम-धंदे आहेत की नाहीत.

**बाबा** : लोके, उठा ! राग येऊन द्यायचा नाही. समजा, तुम्हांला आज

कळलं की, उद्या ही. हो...

**लोके** : छे, छे ! ( साष्टांग नमस्कार घालतो. )

**आई** : का हो, नमस्कार कसला घातलात मला ?

**लोके** : अवघा आनंदी आनंद !

**आई** : का हो, काय झालं तुम्हांला ? बरे आहात ना !

**लोके** : परमेश्वरा ! नको रे असं करूस. बाई चांगल्या आहेत. त्यांना दीर्घायुष्य दे.

**आई** : मला काय होणार आहे ? नमस्कार तुम्हीच घातलात ना ! आणि तुम्हीच आशीर्वाद देता ?

**लोके** : तुम्ही काहीही बोललात तरी मला नाही राग यायचा. समजा, उद्या तुम्ही गेलात तर याच आठवणी काढून मी रडत बसेन की नाही. म्हणून म्हणतो समदृष्टी विश्व पहावे. काय गुरुजी.

**बाबा** : दुसरा आपण होऊन जावे ! जीव शिवाला भेटतो तेथेही तो नामानंद.

**आई** : अहो, गावागावातून, शाळाशाळांतून प्रवचनं करता तेवढी पुरे नाही का झाली. घरात कुठे हे वेड आणता ?

**बाबा** : जन्माला लागलेलं वेड जन्माबरोबरच राहणार !

**आई** : तुम्ही घरात चला.

**बाबा** : लोके, तुम्ही कचेरीकडे चला. मास्तरलोकांचे किती महिन्यांचे पगार राहिलेत तेवढा हिशेब तयार ठेवायला सांगा. मी येण्याच्या आत. ( लोके जातो. ) मास्तरांचे अजून दोन महिन्यांचे पगार दिलेले नाहीत. अजून तो भाऊ खंडाचे पैसे घेऊन आला नाही.

**आई** : घरात काही बायकांच्या हौसा-मौजा करू नका. जे काही उत्पन्न येईल ते धर्मार्थ शाळांच्या बोडक्यावर नेऊन घाला. काय मिळतं कुणास ठाऊक !

**बाबा** : आनंद, आनंद ! अवघा आनंदी आनंद !

**आई** : टिंके, तो ट्रान्झिस्टर थोडा मोठा कर. मला यांच्याशी बोलायचंय्.

**बाबा** : बोला !

**आई** : स्वयंपाकघरात.

( दोघे आत जातात. )

[ मुलगी बाहेर येऊन ट्रान्झिस्टर वाढवते.– जवां बगावं तवां आदळापट सदा हिडीस-फिडीस, न्हवऱ्याला सदा म्हनायची. कुटून ग बाई लगिन करून या वरात आले आता काय उपेग.

**फसले ग बाई**
**सुख कपाळी माझ्या नाही ॥ धृ० ॥**
**जाणे कुठला मुहूर्त ( झाला ) ठरला**
**संसाराचा डाव मांडला**
**भिडू निघाला जगावेगळा**
**घरात असुनी कधी न घरचा**
**घरोघरी जाई ॥ १ ॥**
**कुंकू आले इथे कपाळी**
**धनीपणा पुरुषांच्या भाळी**
**या दुनियेची रीत निराळी**

'काय फालतू कार्यक्रम ऐकत असते' असं म्हणून तो ट्रान्झिस्टर उचलून दरवाजाशी ठेवून देते. वडिलांच्या गादीखाली ठेवलेला स्प्रे उचलून अंगावर उडवताना चैतन्य प्रवेश करतो. त्याच वेळी आतून भांडी पडल्याचे आवाज येतात. ते ऐकून–]

**चैतन्य** : टिंके, आई संतापलेय् का ग ?

**टिंकी** : अरे, आई नाही, रेडिओवर कार्यक्रम चाललाय.

( दचकून स्प्रे लपवून ठेवते. )

**चैतन्य** : ते लपवलंस काय गादीखाली ?

**टिंकी** : कुठं काय लपवलंय् ? बाबांची गादी नीट करीत होते.

**चैतन्य** : तू — ?

**टिंकी** : हो. का ?

**चैतन्य** : कशाला थापा मारतेस ? तू आणि घरात लक्ष देणार ? रस्ते ओस पडले असतील ओस.

**टिंकी** : का ?

**चैतन्य** : तुला बघण्यासाठी लाईन लावणाऱ्यांना काय कामं उरणार मग ?

**टिंकी** : काही तरी वाह्यातपणानं बोलू नकोस हं आबा.

**चैतन्य** : टिंके ! पुन्हा तू मला आबा म्हटलंस हं.

**टिंकी** : आणि तू मला टिंके म्हणतोस ते ?

**चैतन्य** : ते आईला आवडतं.

**टिंकी** : मग आबा, बाबांना आवडतं.

**चैतन्य** : पण तुला सरळ चैतन्य म्हणायला काय होतं ?

**टिंकी** : प्रत्येक वेळेला काय चैतन्य म्हणू काय ? आचरट नाही तर. आबा आपलं म्हणायला सोपं.

**चैतन्य** : पण मला बावळटासारखं वाटतं.

**टिंकी** : आहेस म्हणून वाटतं.

**चैतन्य** : कोण, मी ?

**टिंकी** : पण तुला सरळ इंदू म्हणायला काय होतं ?

**चैतन्य** : इंदू ? ते नाव चांगलं नाही.

**टिंकी** : म्हणजे !

**चैतन्य** : मला भावबंधन मधली इंदू आठवते. पण तू नावाचं निमित्त करून विषयाला बगल देऊ नकोस. लपवलंस काय ते सांग.

**टिंकी** : अरे, कुठं काय लपवलंय् ?

**चैतन्य** : टिंके ! वस्तू लपवली तरी वास लपत नाही. सेंट कुठून आणलास ते सांग. कुणी दिला ?

**टिंकी** : तुला काय करायचंय ?

**चैतन्य** : हे चांगल नाही हं टिंके. बिल्डिंगमधली माणसं चर्चा करतात. तो बुभुक्षित आहे ना ! उसासे. तो ज्योतिषी. तो सगळ्या बायकांच्यात नेहमी बसलेला असतो. माहीत आहे ना तुला ?

**टिंकी** : मग माझं काय करणार आहे ?

**चैतन्य** : करणार काही नाही. पण मंगलाष्टकांऐवजी करुणाष्टकं म्हणायची स्वतःवर वेळ येऊ देऊ नकोस म्हणजे मिळवली. बाबांच्या विरुद्ध बोलून आणि आईची बाजू घेऊन आईवर इंप्रेशन मारून ठेवलंय् त्यानं. एकाचं दोन करून तिला सांगितलंन् तर मग बघा काय होतं ते. आईशी गाठ आहे.

**टिंकी** : अरे जा ! तुझ्यासारखी बावळट नाही मी. तिचीच मुलगी आहे.

**चैतन्य** : पण बरं नाही दिसत हं हे.

**टिंकी** : काय ?

**चैतन्य** : अशी रोजच्या रोज प्रेझेंटस् आणणं.

**टिंकी** : मित्र देतात, आणते घरी. पैसे तर नाही ना लागत ?

**चैतन्य** : पण तुझं अजून लग्न व्हायचय्.

**टिंकी** : अर्थात ! ते होणारच आहे.

**चैतन्य** : पण त्याच्याआधीच ?

**टिंकी** : आधीच काय आधीच ? किती पुढं जायचं हे मुलींना चांगलं कळतं. शिकलेल्या मुली आहोत आम्ही. तुझ्यासारख्या शिकून वाया गेलेल्या नाही. नोकरी बघ कुठं तरी. नाही तर चाललंय् आपलं बाबांच्या जिवावर.

**चैतन्य** : ती चिंता तू करू नकोस. इन्शुरन्स एजंट आहे.

**टिंकी** : हो ! कुठलीच नोकरी नसली म्हणजे आपलं इन्शुरन्स एजंट. स्वतःच्या लाइफची शुअरटी नाही. दुसऱ्याचं लाइफ ॲशुअर करणार म्हणे.

**चैतन्य** : ती जबाबदारी तुझ्यावर आलीय् का ?

**टिंकी** : मग ! माझी तुझ्यावर आलीय् का ?

**चैतन्य** : अर्थात.

**टिंकी** : का ?

**चैतन्य** : इन्शुरन्स एजंट. भाऊ आहे तुझा मोठा. वडिलांचं प्रपंचात लक्ष नाही. ते समाजकार्य करतात. मग पर्यायानं जबाबदारी माझ्यावर पडते. म्हणजे पक्षी. तुझी.

**टिंकी** : मग स्थळं बघायला सुरुवात कर.

**चैतन्य** : मग तेच हेरतोय.

**टिंकी** : काय ?

**चैतन्य** : तुझं एखादं प्रकरण शोधतोय्.

**टिंकी** : काय करणार आहेस ?

**चैतन्य** : त्याच्याच गळ्यात पडणार आहे.

**टिंकी** : तू ?

**चैतन्य** : हो ! पण तुझ्यासाठी !

**टिंकी** : मग का थांबला आहेस ?

**चैतन्य** : सुगावा लागत नाही. वास येतोय्, पण वस्तू नापत्ता आहे !

**टिंकी** : बैस शोधत. आणि आईनं विचारलं तर सांग साडीला फॉल लावायला दिलाय्. ती आणायला जाते म्हणून.

**चैतन्य** : तू सांग की स्वतः.

**टिंकी** : नको. ती आज ऐकण्याच्या मूडमधे नाही.

**चैतन्य** : मग ?

**टिंकी** : बोलण्याच्या आहे.

**चैतन्य** : म्हणजे बाबा घरात आहेत ?

**टिंकी** : अर्थात ! मग आई ऐकवणार कुणाला म्हणजे ? ( पर्स फिरवत बाहेर जाते. चैतन्य उठून ट्रान्झिस्टर बंद करतो. तरी आतून भांडी आपटण्याचा आवाज येतो. मारुतीच्या तसबिरीला नमस्कार करतो. ) हां ! ट्रान्झिस्टर बंद झाला तरी अजून श्रुतिका चालूच दिसते. ( टेलिफोनची बेल वाजते. टेलिफोन उचलतो. ) हॅलो ! कोण इंदू ? नाही ! आताच डॉक्टरांकडे गेली आहे. कुणाचा फोन आला होता म्हणून सांगू ? नाही ! ती मला म्हणत होती तुमचा टेलिफोन येईल म्हणून. काय नाव म्हणत होती बरं ? हां, बरोबर, विहंग कुलकर्णी ना ? सुखात्मे ? हां ! हां ! बरोबर ... कुलकर्णी तो दुसरा ! तुम्ही विहंग ना ? हां ! मग त्याचं नाव वेगळं आहे ... आणि तो माझा मित्र आहे ... थांबा हं ! ... हो ! मी भाऊ तिचा ... मला माहीत आहे सगळं .... कालचा सेंट कुठला ईव्हिनिंग इन् पॅरिस ना — ? ... नाही घरात नाहीत सांगितलंन् अजून कुणाला .... फक्त मलाच ठाऊक आहे ....( असे म्हणून सेंट ठेवलेल्या गादीकडे जातो. आई आतूनच केवढा हा ट्रान्झिस्टरचा आवाज चढवून ठेवलाय् तो, काही ऐकू येत नाही. फोन कुणाचा रे ! ( आई येते ) माझाच आहे खासगी ! ( एकदा त्याच्याकडे बघते. तो गॅलरीत वाकून बघताना बघते. आणि रिसीव्हर उचलते. तेवढ्यात चैतन्य धावून येऊन तिच्या हातातला रिसीव्हर काढून घेतो. ) खासगी आहे म्हटलं तर .... !

**आई** : काय रे, एवढं खासगी आहे ?

**चैतन्य** : तुला कळायचं नाही म्हटलं तर ! विमा उतरायचा आहे एकाच्या आयुष्याचा, तू थांब. ...हॅलो ! नाही... नाही... कुणी नाही ती

शेजारची बाई होती ! समजा ! पण आपण भेटू या ना... बरं ! आता कुठून बोलताहात... घरी या ना माझ्याबरोबर म्हणजे व्यवस्थित सविस्तर बोलता येईल... किती वाजले आता... बरोबर... चालेल... मग तुम्ही तिथंच थांबा... पोस्टाच्या खांबाजवळ... हो हो, येतोच. ( फोन ठेवतो )

**आई** : कुठं जायचं नाही हं बाहेर. मला बरोबर वेळेवर पोचलं पाहिजे समाजात. आमच्या भिशीचा दिवस आहे आज ! आणि कुठल्या मुलीचा फोन होता रे ?

**चैतन्य** : कुठल्या मुलीचा– ?

**आई** : सगळ्या जगाला फसवशील चैत्या ! सख्ख्या आईला नाही फसवू शकायचास. सेन्ट काय, ईव्हिनिंग इन् पॅरीस काय, पोस्टाच्या खांबाजवळ भेट काय, मला काय कळत नाही काय ? कुठली मुलगीबिलगी घेऊन येऊ नकोस हं घरी ! बिल्डिंगमध्ये राहायचंय्. आजूबाजूला सभ्य माणसं राहतात !

**चैतन्य** : हो ! ते उसासे ना ?

**आई** : का ? त्यांच्यावर का दात तुझा ? तुमच्या इत्थंभूत बातम्या त्यांना कळतात म्हणून.

**चैतन्य** : आमच्या कसल्या बातम्या ?

**आई** : सगळं कानावर आहे माझ्या. तू काय म्हणे परवा बिअर मिळते त्या हॉटेलातून बाहेर पडलास.

**चैतन्य** : अरे ! पण तिथं चहासुद्धा मिळतो. त्या उसाशाला काय ठाऊक आहे ?

**आई** : शेजारधर्म पाळतात ! तू रमी खेळतोस ?

**चैतन्य** : कधी ?

**आई** : त्यांनी चक्क तुला लोकलमध्ये पाहिलं आहे.

**चैतन्य** : अग, तो ब्रिज.

**आई** : म्हणजे एकच ! तसंच आज हे पोरीचं.

**चैतन्य** : पोरीचं काय ? च्या मारी धरून ! काय वाटेल ते आरोप करीत असतो.

**आई** : त्यांना उगाच दोष देऊ नकोस. हे पोरीचं मी स्वतः ऐकलंय्‌ या कानांनी.

**चैतन्य** : आता काय सांगणार तुला?

**आई** : काही रचून सांगू नकोस. आणि एवढा उतावळा झाला असलास लग्नाला तर त्या टिंकीच्या लग्नाचं बघ!

**चैतन्य** : तेच बघतोय्!

**आई** : कपाळ बघतोयस! स्वतःच्या नोकरीचं बघायचं अजून तुला जमत नाही. आम्ही काय तुला पैसे मागत नाही, पण आहे बिल्डिंगचं उत्पन्न म्हणून असं आळशासारखं आयुष्य काढणं काही शहाणपणाचं नाही.

**चैतन्य** : अग, पण मला नोकरी आहे.

**आई** : तेच इन्शुरन्स एजन्ट.

**चैतन्य** : कळेल.

**आई** : इतका उद्दामपणा बरा नव्हे हो चैत्या. काय ग बाई या घराचं होणार आहे! एकच घर आहे पण चार दिशांना चार दरवाजे! एकाचं तोंड इकडे तर दुसऱ्याचं चवथीकडे. मूळ मालक धड पाहिजे ना! डोंबलाचं समाजकार्य करताहेत. घराकडे बघायचं कुणी? सगळे एकाच माळेचे मणी.

**चैतन्य** : आणि मंगळसूत्र तुझ्या गळ्यात!

**आई** : गप्प बैस. आणि हा उशीचा अभ्रा काय दिलास, लोडाचा कुठाय?

**चैतन्य** : तो उशीला असेल!

**आई** : उशीला असेल काय? जा, आत असेल, घेऊन ये. ( तो जातो. ) कुठून ग बाई लग्न करून या घरात आले. दुसरं एखादं स्थळ मिळालं असतं तर सुखाचा संसार झाला असता.

**बाबा** : हा नवरा नसता तर– ( असं म्हणत विठ्ठल धोंडो प्रवेश करतात. )

**आई** : आलात! या!

**बाबा** : तू आहेस होय अजून? मला वाटलं भिशी का काय आहे तुझी, तिकडे गेलीस!

**आई** : तुम्ही घालवायला बसलाय् मला!

**बाबा** : काही तरीच काय बोलतेस अभद्रासारखं.

**आई** : हां! पुरे! जास्ती लाडात येऊ नका. जरा या मुलांच्याकडे बघा. मी काही आयुष्याला पुरणार नाही. तुम्ही जरा घराकडे लक्ष द्या. समाज नंतर सुधारा. आपली झोपडी आधी बघा. काय पोरांची एकेक लक्षणं आहेत! ती

कार्टी बाहेर गेली. जाताना मला सांगूनसुद्धा गेली नाही. ही शिस्त घरात !

**चैतन्य :** फॉल लावायला दिलेली साडी आणायला गेलीय् असा तिनं तुला सांगितलाय् निरोप.

**आई :** हां, तू आता सांगतोयस !

**चैतन्य :** त्या वेळी तुझा ट्रॅन्झिस्टर चालू होता.

**आई :** ट्रान्झिस्टर म्हणजे .. ?

**चैतन्य :** भांडण नाही का. बाबांच्याबरोबरचं ?

( वडील हसू दिसू नये म्हणून तोंडावर बोट ठेवतात. )

**आई :** हं. आणि तुम्ही फूस लावा पोरांना ! मूळ पुरुषच बिघडलेला, पिढीला दोष देण्यात काय अर्थ !

**बाबा :** अग, पण तू जरा शान्तपणानं घे. किती डोक्याला त्रास करून घेशील ? म्हणजे उगीच आपली वाणी शिणवायची ! कुणावर त्याचा परिणाम आहे का... ?

**आई :** हे तुम्ही मलाच सांगता ?

**बाबा :** माझ्याबद्दल नाही ग ! या पोरांच्याबद्दल म्हणतोय् मी.

**आई :** पण तुम्ही कधी विचारलंयत का मुलांना ?

**बाबा :** अग, पण काही उपयोग आहे का ? हे घे तुझ्या देखतच विचारतो. काय रे आबा, नोकरीचं काही बघतोस का नाही कुठं ?

**चैतन्य :** तुम्ही मला आबा वगैरे म्हणत जाऊ नका हो. उगीच माझा आबा करून ठेवलाय् सगळ्या बिल्डिंगमध्ये.

**बाबा :** हे माझ्या प्रश्नाचं उत्तर नव्हे. नोकरीचं काय केलंस ते सांग ?

**चैतन्य :** तुम्हाला आज सवड मिळाली वाटतं माझ्याशी बोलायला.

**बाबा :** ( ती हसते ) तू जा आत, तुला पावडर-कुंकू करायचं असेल ना ? भिशीला जायचंय ना— ?

**चैतन्य :** आणि तुम्हांला नाही का शिबिर ?

**बाबा :** हो तर ! शिबिर आहेच. त्यासाठीच एवढं घाई-घाईनं खाऊन घेतलं.

**चैतन्य :** आईचं बोलणं ?

**बाबा :** आज ज्ञानेश्वरांनी केलेली अहिंसेची व्याख्या कार्यकर्त्यांना समजा-

**चैतन्य :** आता काय सांगणार तुला ?

**आई :** काही रचून सांगू नकोस. आणि एवढा उतावळा झाला असलास लग्नाला तर त्या टिंकीच्या लग्नाचं बघ !

**चैतन्य :** तेच बघतोय् !

**आई :** कपाळ बघतोयस ! स्वतःच्या नोकरीचं बघायचं अजून तुला जमत नाही. आम्ही काय तुला पैसे मागत नाही, पण आहे बिल्डिंगचं उत्पन्न म्हणून असं आळशासारखं आयुष्य काढणं काही शहाणपणाचं नाही.

**चैतन्य :** अग, पण मला नोकरी आहे.

**आई :** तेच इन्शुरन्स एजन्ट.

**चैतन्य :** कळेल.

**आई :** इतका उद्दामपणा बरा नव्हे हो चैत्या. काय ग बाई या घराचं होणार आहे ! एकच घर आहे पण चार दिशांना चार दरवाजे ! एकाचं तोंड इकडे तर दुसऱ्याचं चवथीकडे. मूळ मालक धड पाहिजे ना ! डोंबलाचं समाजकार्य करताहेत. घराकडे बघायचं कुणी ? सगळे एकाच माळेचे मणी.

**चैतन्य :** आणि मंगळसूत्र तुझ्या गळ्यात !

**आई :** गप्प बैस. आणि हा उशीचा अभ्रा काय दिलास, लोडाचा कुठाय ?

**चैतन्य :** तो उशीला असेल !

**आई :** उशीला असेल काय ? जा, आत असेल, घेऊन ये. ( तो जातो. ) कुठून ग बाई लग्न करून या घरात आले. दुसरं एखादं स्थळ मिळालं असतं तर सुखाचा संसार झाला असता.

**बाबा :** हा नवरा नसता तर– ( असं म्हणत विठ्ठल धोंडो प्रवेश करतात. )

**आई :** आलात ! या !

**बाबा :** तू आहेस होय अजून ? मला वाटलं भिशी का काय आहे तुझी, तिकडे गेलीस !

**आई :** तुम्ही घालवायला बसलाय् मला !

**बाबा :** काही तरीच काय बोलतेस अभद्रासारखं.

**आई :** हां ! पुरे ! जास्ती लाडात येऊ नका. जरा या मुलांच्याकडे बघा. मी काही आयुष्याला पुरणार नाही. तुम्ही जरा घराकडे लक्ष द्या. समाज नंतर सुधारा. आपली झोपडी आधी बघा. काय पोरांची एकेक लक्षणं आहेत ! ती

कार्टी बाहेर गेली. जाताना मला सांगूनसुद्धा गेली नाही. ही शिस्त घरात !

**चैतन्य :** फॉल लावायला दिलेली साडी आणायला गेलीय् असा तिनं तुला सांगितलाय् निरोप.

**आई :** हां, तू आता सांगतोयस !

**चैतन्य :** त्या वेळी तुझा ट्रॅन्झिस्टर चालू होता.

**आई :** ट्रान्झिस्टर म्हणजे ..?

**चैतन्य :** भांडण नाही का. बाबांच्याबरोबरचं ?

( वडील हसू दिसू नये म्हणून तोंडावर बोट ठेवतात. )

**आई :** हं. आणि तुम्ही फूस लावा पोरांना ! मूळ पुरुषच बिघडलेला, पिढीला दोष देण्यात काय अर्थ !

**बाबा :** अग, पण तू जरा शान्तपणानं घे. किती डोक्याला त्रास करून घेशील ? म्हणजे उगीच आपली वाणी शिणवायची ! कुणावर त्याचा परिणाम आहे का... ?

**आई :** हे तुम्ही मलाच सांगता ?

**बाबा :** माझ्याबद्दल नाही ग ! या पोरांच्याबद्दल म्हणतोय् मी.

**आई :** पण तुम्ही कधी विचारलंयत का मुलांना ?

**बाबा :** अग, पण काही उपयोग आहे का? हे घे तुझ्या देखतच विचारतो. काय रे आबा, नोकरीचं काही बघतोस का नाही कुठं ?

**चैतन्य :** तुम्ही मला आबा वगैरे म्हणत जाऊ नका हो. उगीच माझा आबा करून ठेवलाय् सगळ्या बिल्डिंगमध्ये.

**बाबा :** हे माझ्या प्रश्नाचं उत्तर नव्हे. नोकरीचं काय केलंस ते सांग ?

**चैतन्य :** तुम्हाला आज सवड मिळाली वाटतं माझ्याशी बोलायला.

**बाबा :** ( ती हसते ) तू जा आत, तुला पावडर-कुंकू करायचं असेल ना ? भिशीला जायचंय ना— ?

**चैतन्य :** आणि तुम्हांला नाही का शिबिर ?

**बाबा :** हो तर ! शिबिर आहेच. त्यासाठीच एवढं घाई-घाईनं खाऊन घेतलं.

**चैतन्य :** आईचं बोलणं ?

**बाबा :** आज ज्ञानेश्वरांनी केलेली अहिंसेची व्याख्या कार्यकर्त्यांना समजा-

वून द्यायचीय्.

**चैतन्य** : कुठल्या कार्यकर्त्यांना ?

**बाबा** : आदिवासी.

**चैतन्य** : त्यांना कळणार आहे ?

**बाबा** : त्या निमित्ताने आपल्याला कळेल. हजारो वर्षे अज्ञान- अंधःकारात बुडून गेलेल्या असंख्य समाजबांधवांना ज्ञानदीप दाखवून त्यांच्या जीवनाच्या उज्ज्वल भवितव्याची वाट......

**चैतन्य** : हे... हे इतकं सगळं बोलता आदिवासींच्या पुढं. मलासुद्धा कळलं नाही.

**बाबा** : गाढव आहेस.

**चैतन्य** : तुमचा मुलगा असून...

**बाबा** : काय म्हणालास ?

**चैतन्य** : नाही ! तुमचा मुलगा असूनसुद्धा मला कळत नाही ते त्यांना कसं कळेल ?

**बाबा** : त्याचं असं आहे आबा, ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी वाचून दाखविली सगळ्यांना. पण शेवटी वेद बोलला रेडाच ! आम्ही त्याच जातीचे. परमेश्वरानं पाठविलेले रेडे ! सत्कार्य आहे ना, करत राहायचं. रेड्याच्या बुद्धीनं परिसाचा स्पर्श सुवर्णाला झाला. उपयोग काय म्हणून मी आपलं लोखंड शोधत फिरत असतो. ( गादीवर बसतो. वरची पिशवी काढून पुस्तक ठेवता ठेवता ) तुम्ही सुशिक्षित मुलं ! सोन्याला काय गरज परिसाची ! म्हणून आपला बाहेर असतो.

**चैतन्य** : बाबा, रागावलात उलट बोललो म्हणून ?

**बाबा** : नाही रे, ते विनोदानं बोललास तेवढं कळतं मला.

**चैतन्य** : घरात राहावंसं वाटत नाही ना तुम्हांला ?

**बाबा** : नाही रे आबा. कोण म्हणतं ?

**चैतन्य** : आई सारखी बोलत असते ना तुम्हाला !

**बाबा** : नाही रे. तिचं बरोबर आहे. संसार बरोबरीनं करतोय्. जन्माच्या खोडी. आयुष्याच्या कुरणात एका कळपानं राहायचं एकदा ठरलं ना ? मग.... एकमेकांच्या सवयी करून घ्याव्या लागतात. तिला बोलायची आहे. मला ऐकायची आहे. आणि ऐकायला आधी असतो कुठं घरात. आता तुझ्या

नोकरीचं ही मला तुला विचारायला सांगते. तू नेहमी उडवाउडवी करतोस. सवय लावून घ्यायची. एक सांगून ठेवतो मी. तुला जन्म तिला हे निमित्ताला कारण. तुझ्या आयुष्याची तुझ्यावर जबाबदारी आहे. पुरुष आहेस. कुठंही मेहनत कर पैसे मिळव. तुझा तू ! सांगायलासुद्धा येऊ नकोस. मी असं बोललो हे हिला कळू दे, बघ कशी तोंड सोडील. ऐकून घ्यायचं. सवय लावून घ्यायची. एक मात्र तुला सांगून ठेवतो. आपल्या बहिणीची जबाबदारी मात्र तुझ्यावर आहे. ती तेवढी संभाळ, हे मात्र तुझं—माझं खासगीतलं. कुठं गेलीय् ही टिंकी ? ही मला स्थळं बघायला सांगते. वेळ कुठाय् ? त्यातून ही नवीन पिढी ! मुलं-मुली बरोबर फिरत असतात. जमलं असलं कुठं तर ? साधारण घर बघायचं, हो म्हणून टाकायचं ! काही चूक नाही. ते तिला सांग बघू !

**चैतन्य** : बाप रे ....!

**बाबा** : काय झालं रे ?

**चैतन्य** : मला जायला पाहिजे !

**बाबा** : कुठं ?

**चैतन्य** : आईला सांगा, मला यायला कदाचित वेळ होईल. जेवण घेईन मी वाढून हातानं.

**बाबा** : अरे ! अरे पण जरा थांबशील की नाही !

**उसासे** : ( प्रवेश करून ) अरे अरे ! जरा हळू जा. केवढा धक्का दिलास !... आहेत का वहिनी ?

**बाबा** : हो, आहेत. मीही आहे ना ? या, बसा.

**उसासे** : आश्चर्य आहे !

**बाबा** : कसलं ?

**उसासे** : आपण आज घरात कसे ?

**बाबा** : का ? असायला नको होतं ?

**उसासे** : मला काय तसं वाटायचं कारण ? ( आत बघून )

**बाबा** : ते मी कसं सांगणार ?

**उसासे** : म्हणजे ?

**बाबा** : माझ्याच घरात येऊन, मीच घरात कसा, हा प्रश्न मी असतो तरी स्वतःला कधी केला नसता ! या, पान खाणार का ? बसा !

**उसासे :** तुम्ही जरा सरकून बसा, मी टेकून बसतो.

**बाबा :** मी निघालोच होतो शिबिराकडे. ( सरकून त्याला कॉटवर बसवतो.) कसे आलात ?

**उसासे :** नाही ! वहिनींनी जरा कुंडली बघायला सांगितली होती—

**बाबा :** माझी ?

**उसासे :** नाही.

**बाबा :** तिची ?

**उसासे :** छे, छे ! त्यांचं काय आता लग्नाचं वय आहे काय ?

**बाबा :** हं हं, लग्नाचं ! बरी आठवण झाली ! अहो उसासे, आमच्या टिंकीची कुंडली एकदा बघा हो !

**आई :** पाहिलंत ? हे तुमचं लक्ष संसाराकडे ! ( आनंदीबाई येतात. )

**उसासे :** खरं सांगतो मी वहिनी, तुम्हाला ! तुम्ही आहात म्हणून हा संसार चाललाय् व्यवस्थित !

**बाबा :** अहो, पण माझंही तेच म्हणणं आहे ! ती नसती तर माझ्या घराची खानावळ झाली असती !

**उसासे :** ही आपली सुटका करून घेणं झालं. उगीच आपली वहिनींची स्तुती करायची आणि घराकडे लक्ष द्यायचं नाही. हे काही खरं नाही.

**बाबा :** तुम्ही कोण आमचे, भाडेकरू ? शेजारी ! का सासरे हो ?

**उसासे :** का उगीच माझं वय वाढवता ? आपलं शेजारधर्म म्हणून आपुलकी वाटते.

**आई :** आणि काही चूक नाही तुमचं उसासे. भाउजी, यांचं असतं का घराकडे लक्ष ? हं ! गिळलात ना तंबाकू. म्हणजे मला आता उत्तर द्यायला नको. बायकोला बसू दे बडबडत. मग तुमचं समाजकार्य कोण करील ? इमारतीच्या आणि दुकानाच्या येणाऱ्या भाड्यावरच मुलांनी जन्म काढायचा का ? कुठं तरी नोकरी नको का बघायला ? त्याचं मी एक प्रकरण ऐकलंय्. कुठल्या तरी मुलीशी बोलत होता फोनवर. दोघंही घरी नसताना मुली-बिली आणत असला घरी तर अब्रू जाईल जगात. बरं, तोंडावर बोलणार आहे कोण ? का हो ?

**उसासे :** छे... छे... भलतंच. अहो, अब्रू म्हणजे काय— वाईटच ते !

**आई :** आता कुठं गेलाय् तो ? ( खुणेनं मला माहीत नाही असे म्हणतो. )

अहो, जाऊ कसं दिलंत त्याला. तुम्ही निघालात, मी निघाले. घर मोकळं! छे ग बाई, असे कसे तुम्ही वेंधळे! (उसाशांकडे बघून केविलवाणा हसतो) हसताय काय?

**उसासे :** खरं आहे वहिनी म्हणतात ते. (सहज गादीखाली हात जातो.) हे हो काय, सेंट वाटतं? तुम्ही वापरता वाटतं? काय ते ईव्हिनिंग इन् पॅरीस.

**आई :** अहो, तोच तो, त्यालाच दिलेला दिसतो तिनं!

**उसासे :** काय सांगताय् काय? फार उच्चीचे ग्रह आहेत त्याचे. श्रीमंताचा लेक म्हणून फसवेल हो एखादी मुलगी. जरा लक्ष ठेवा.

**आई :** पण समाजकार्य कोण करील? (घड्याळ बघत) अग बाई ग, सगळ्या बायका जमल्या असतील. जन्मभर कुठं चुलीला बांधून घेऊ? पण यांनी नको का घराकडे बघायला... ती मुलगी आता वयात आली आहे. तशी त्या वाटेनं जाणारी नाही. माझीच मुलगी आहे. पण तिच्या लग्नाचं नको का बघायला? काय म्हणतेय् हो कुंडली?

**उसासे :** हा द्वादशात, हा सप्तमात. लग्न जमलंच पाहिजे. म्हणजे आता अगदी जमतंय् असा योग आहे.

**आई :** पण यांनी चार ठिकाणी जायला नको? हजार वेळा सांगितलं परवापासून त्या सुखात्म्यांचं स्थळ चांगलं आहे, जाऊन पाहून या. का नाही गेलात?

**उसासे :** स्थळ खरंच चांगलं आहे. मोठ्या कारखान्याचा मालक आहे. बाप नेहमी अमेरिकेच्या वाऱ्या करीत असतो.

**आई :** यांच्या चालल्यात! स्वतःचं घर सोडून दारोदारी वाऱ्या! समाजकार्य करतात.

**उसासे :** परवा काय झालं, त्या झोपडीवाल्या दादानं मारलं म्हणे तुम्हांला?

**आई :** यांना? ते बाई कशासाठी?

**उसासे :** तुम्ही काय त्या झोपडीतल्या एका मुलाला तो बाहेर रस्त्यावर बसलेला असताना, शाळेसमोर दिवसा असे विधी करू नयेत असं सांगितलंत?

**आई :** आणि मग-?

**उसासे :** मग काय! ही काय तुझ्या बापाची जागा हाय का? म्हणून

काय त्याचा प्यालेला बाप आला आणि खूप तमाशा झाला ना! वरळीच्या नाक्यावर मारलं म्हणे त्यानं तुम्हांला!

**आई** : काय बाई! कशा बातम्या तुम्हांला लागतात उसासे भाउजी! घरात बसून आम्हांला कळल्या नाहीत.

**उसासे** : शेजारधर्म म्हणून आपुलकी वाटते.

**आई** : अहो, पण सांगितलेत कुणी तुम्हांला हे नसते उद्योग? जगात पोत्यानं पुढारी आहेत. काय वाटेल ते झालं तरी तुम्ही काय विनोबा होणार नाही. आपलं घर बघा ना (जरा थांबा अशी हातानं खूण करून आत जातो) आतादेखील प्रवचन, तोंड मोकळं करून आल्यावर जातील, किंवा निघून घरातनं कुठं ग बाई या घरात आले....

**बाबा** : तुमच्या वडिलांच्या घरून माझ्या वडिलांच्या घरी! असं पहा आनंदी! मी माझ्या संसाराची जबाबदारी पार पाडलेली आहे. तुझ्या वडिलांनी माझं स्थळ पाहिलं तेव्हा पहिला प्रश्न काय होता? मुलीला पोटभर जेवायला घालेल का नाही? हा प्रश्न मी सोडविलेला आहे. तुम्हांला काही कमी आहे का? नाही. मग तुमचे तुम्ही स्वतंत्र आहात. माझा मी स्वतंत्र आहे. मघाशी यांनी सांगितलेली बातमी अगदी खरी आहे. मी मार खाल्ला. तो माझा मी खाल्ला, पण त्यानंतर तो मुलगा रडला हे तुम्ही सांगायला विसरलात उसासे! किंवा ते तुम्हांला कळलं नसावं. झोपड्या तर सुधारल्याच पाहिजेत, पण त्यातली माणसं पण सुधारली पाहिजेत. समाजपुरुष हा सुदृढ आणि स्वच्छ असलाच पाहिजे. मग त्याचं एखादं अस्वच्छ अंग धुताना थोडीशी घाण स्वतःला लागली तर ती सहन करायला हवी. मला बसलेला मार अकारण बसला होता, हे त्या बापाच्या मुलाला कळलं तरी माझं काम झालं. तोच मुलगा उद्या माझं काम करायला लागेल. हे तुमचं काम आहे का? असं प्रत्येक जण म्हणायला लागला तर मग हे कुणाचं काम? आता घराकडे मी लक्ष द्यायला पाहिजे हे खरं, पण आता ओळीनं सात दिवस माझा दौरा आहे. ओळीनं व्याख्यानं ठरलेली आहेत. साक्षरता–प्रसारासाठी.

**उसासे** : साक्षरता–प्रसाराचे फायदे दिसतात हल्लीच्या साहित्यात. शिवीशिवाय शब्द वाचायला मिळत नाही आजकाल कवितेतही.

**बाबा** : त्या कवितेच्या मागची भावना कळली तर तीच शिवी ओवी-

सारखी वाटायला लागते, उसासे. समजून घेण्यावर आहे. लिहिता यायला लागलं ना? आपआपल्याला भाषेत आपआपले विचार मांडायला यायला लागलेत ना? खूप झालं! मग भाषेभाषेत फरक असायचाच. कुत्रा भुंकून पहारा करतो. माणूस असला तर तोंडाने 'हुश्शार!' असं म्हणतो. फक्त भाषेत फरक असतो. पहारा तोच. असो, मी शिबिरात बोलल्यासारखं वाटायला लागलं. तुम्ही बसा, मी निघतो. हिलाही बिचारीला मी समोर असलो म्हणजे बोलायचा उगीच त्रास होतो.

**आई** : अहो पण, घरात कोण?

**उसासे** : मी आहे ना?

**बाबा** : हं. हे आहेत. ( जातो )

**उसासे** : मी बसतो. फार झालं तर मुलं येईपर्यंत. तुम्हालाही जायचंय् ना कुठं?

**आई** : होय हो. झालीच आहे वेळ. भिशी आहे ना आज. मी गेले नाही म्हणजे उगीच मालकीणबाई आल्या नाहीत म्हणून कालवा करतील बायका. पण यांनी नको का घराकडं लक्ष द्यायला?

**उसासे** : नाही हो आनंदीबाई.

**आई** : तुम्ही मला नावानं कसली हाक मारता हो.

**उसासे** : त्याचं काय होतं. चाळीतल्या सगळ्या बायका ओळखीच्या.

**आई** : चाळीतल्या नाहीत, बिल्डिंगमधल्या म्हणा.

**उसासे** : त्याचं काय आहे, रंग उडाल्यामुळे चाळीसारखी दिसते. बरं. आपल्या बिल्डिंगमधल्या सगळ्याच बायका ओळखीच्या हो. परवा त्या पेंडशांच्या घरी असाच बारशाला म्हणून गेलो. सगळ्या तिथं जमलेल्या. मी पेंडशांच्या वहिनींना 'वहिनी—' म्हणून हाक मारली, तर सगळ्या जणींनी 'ओ' दिली, एकदम. आणि अतिशयोक्तीची गोष्ट म्हणजे सांगतो पाळण्यात चांगलं खिदळत असलेलं गोजिरवाणं ते भोकांड पसरून रडायला की हो लागलं. तेव्हापासनं ठरवून टाकलं की बाई दिसली की नावानं हाक मारायची. तर सांगायचं कारण आनंदीबाई, तसे विठ्ठल धोंडो म्हणजे जगातला फार थोर माणूस...

**आई** : फार शहाणपणानं सांगू नका. जगाला असतील. असतील म्हणजे

काय त्याचा प्यालेला बाप आला आणि खूप तमाशा झाला ना ! वरळीच्या नाक्यावर मारलं म्हणे त्यानं तुम्हांला !

**आई** : काय बाई ! कशा बातम्या तुम्हांला लागतात उसासे भाउजी ! घरात बसून आम्हांला कळल्या नाहीत.

**उसासे** : शेजारधर्म म्हणून आपुलकी वाटते.

**आई** : अहो, पण सांगितलेत कुणी तुम्हांला हे नसते उद्योग ? जगात पोत्यानं पुढारी आहेत. काय वाटेल ते झालं तरी तुम्ही काय विनोबा होणार नाही. आपलं घर बघा ना (जरा थांबा अशी हातानं खूण करून आत जातो ) आतादेखील प्रवचन, तोंड मोकळं करून आल्यावर जातील, किंवा निघून घरातनं कुठं ग बाई या घरात आले....

**बाबा** : तुमच्या वडिलांच्या घरून माझ्या वडिलांच्या घरी ! असं पहा आनंदी ! मी माझ्या संसाराची जबाबदारी पार पाडलेली आहे. तुझ्या वडिलांनी माझं स्थळ पाहिलं तेव्हा पहिला प्रश्न काय होता ? मुलीला पोटभर जेवायला घालेल का नाही ? हा प्रश्न मी सोडविलेला आहे. तुम्हांला काही कमी आहे का ? नाही. मग तुमचे तुम्ही स्वतंत्र आहात. माझा मी स्वतंत्र आहे. मवाशी यांनी सांगितलेली बातमी अगदी खरी आहे. मी मार खाल्ला. तो माझा मी खाल्ला, पण त्यानंतर तो मुलगा रडला हे तुम्ही सांगायला विसरलात उसासे ! किंवा ते तुम्हांला कळलं नसावं. झोपड्या तर सुधारल्याच पाहिजेत, पण त्यातली माणसं पण सुधारली पाहिजेत. समाजपुरुष हा सुदृढ आणि स्वच्छ असलाच पाहिजे. मग त्याचं एखादं अस्वच्छ अंग धुताना थोडीशी घाण स्वतःला लागली तर ती सहन करायला हवी. मला बसलेला मार अकारण बसला होता, हे त्या बापाच्या मुलाला कळलं तरी माझं काम झालं. तोच मुलगा उद्या माझं काम करायला लागेल. हे तुमचं काम आहे का ? असं प्रत्येक जण म्हणायला लागला तर मग हे कुणाचं काम ? आता घराकडे मी लक्ष द्यायला पाहिजे हे खरं, पण आता ओळीनं सात दिवस माझा दौरा आहे. ओळीनं व्याख्यानं ठरलेली आहेत. साक्षरता–प्रसारासाठी.

**उसासे** : साक्षरता–प्रसाराचे फायदे दिसतात हल्लीच्या साहित्यात. शिवीशिवाय शब्द वाचायला मिळत नाही आजकाल कवितेतही.

**बाबा** : त्या कवितेच्या मागची भावना कळली तर तीच शिवी ओवी-

सारखी वाटायला लागते, उसासे. समजून घेण्यावर आहे. लिहिता यायला लागलं ना? आपआपल्याला भाषेत आपआपले विचार मांडायला यायला लागलेत ना? खूप झालं! मग भाषेभाषेत फरक असायचाच. कुत्रा भुंकून पहारा करतो. माणूस असला तर तोंडाने 'हुश्शार!' असं म्हणतो. फक्त भाषेत फरक असतो. पहारा तोच. असो, मी शिबिरात बोलल्यासारखं वाटायला लागलं. तुम्ही बसा, मी निघतो. हिलाही बिचारीला मी समोर असलो म्हणजे बोलायचा उगीच त्रास होतो.

**आई** : अहो पण, घरात कोण?

**उसासे** : मी आहे ना?

**बाबा** : हं. हे आहेत. ( जातो )

**उसासे** : मी बसतो. फार झालं तर मुलं येईपर्यंत. तुम्हालाही जायचंय् ना कुठं?

**आई** : होय हो. झालीच आहे वेळ. भिशी आहे ना आज. मी गेले नाही म्हणजे उगीच मालकीणबाई आल्या नाहीत म्हणून कालवा करतील बायका. पण यांनी नको का घराकडं लक्ष द्यायला?

**उसासे** : नाही हो आनंदीबाई.

**आई** : तुम्ही मला नावानं कसली हाक मारता हो.

**उसासे** : त्याचं काय होतं. चाळीतल्या सगळ्या बायका ओळखीच्या.

**आई** : चाळीतल्या नाहीत, बिल्डिंगमधल्या म्हणा.

**उसासे** : त्याचं काय आहे, रंग उडाल्यामुळे चाळीसारखी दिसते. बरं. आपल्या बिल्डिंगमधल्या सगळ्याच बायका ओळखीच्या हो. परवा त्या पेंडशांच्या घरी असाच बारशाला म्हणून गेलो. सगळ्या तिथं जमलेल्या. मी पेंडशांच्या वहिनींना 'वहिनी—' म्हणून हाक मारली, तर सगळ्या जणींनी 'ओ' दिली, एकदम. आणि अतिशयोक्तीची गोष्ट म्हणजे सांगतो पाळण्यात चांगलं खिदळत असलेलं गोजिरवाणं ते भोकांड पसरून रडायला की हो लागलं. तेव्हापासनं ठरवून टाकलं की बाई दिसली की नावानं हाक मारायची. तर सांगायचं कारण आनंदीबाई, तसे विठ्ठल धोंडो म्हणजे जगातला फार थोर माणूस...

**आई** : फार शहाणपणानं सांगू नका. जगाला असतील. असतील म्हणजे

आहेतच. स्वतःच्या खर्चानं बेचाळीस-त्रेचाळीस शाळा उघडल्या ही काही खायची गोष्ट नाही. पण घराचं काय?

**उसासे** : इथं मात्र तुमचं-माझं मत एक हो. तुमच्या पायगुणावर हे घर उभं राहिलं. तुमचं लग्न झाल्यापासून पाहतोय. तसं वयानं आपण बरोबरीचेच नाही का? हे घर उभं राहिलं ते पायगुणानं तुमच्या. ही कुंडलीच सांगते ना तुमची.

**आई** : नाही, असं आमच्या माहेरची माणसं अगदी आर्जवूनच म्हणताहेत नेहमी. पण आपण कशाला उगीच गर्व करायचा. तुम्ही दूध वगैरे घेता का नाही?

**उसासे** : मी आज आता लिंबू-पाणी घेतलंय्. तुम्हांला कुलूप लावून ध्यायचंय् ना? नाही तरी आता आमच्या खोलीत दिवसा अंधार असतो. बोलून चालून ब्रह्मचाऱ्याची मठी. उजेडात बसतो मी वाचत जरा. मालकांचाच हॉल आहे.

**आई** : मी येऊ मग? आणि आमच्या चैतूला सांगा जरा.

**उसासे** : त्याची काळजी सोडा. उत्तम कुंडली आहे पोराची. तसा मुलीबिलींच्या फंदात पडणारा दिसत नाही. बहिणीची काळजी उत्तम घेणार. अहो, याची रास हे तिचं लग्न आहे. आणि याचं लग्न ही तिची रास आहे. मुलीबिलींचा संशय अजिबात घ्यायला नको. स्वच्छ आहे कुंडली. अहो, तुमच्या घरात पाऊल टाकतो तेव्हा तुमच्या घरातल्याच कुंडल्या नाचत असतात.

**आई** : कुंडल्या तुमच्या ठेवलंन त्यानं गुंडाळून. स्वच्छ मी कानानं ऐकलेलं आहे त्यानं फोनवर सांगताना. त्याला तिनं एक सेंट दिलेला आहे ईव्हिनिंग इन् पॅरीस...

**उसासे** : हां? हाच ना!

**आई** : हो. हाच असणार. तुम्ही जरा बारकाईनं चौकशी करा. कोण कोण येतात याच्याकडे, काय काय करतात.

**उसासे** : ते करतो मी बरोबर.

**आई** : काय बाई होणार आहे या घराचं, कुठनं ग बाई लग्न करून या घरात आले. यापेक्षा चांगलं स्थळ मिळालं असतं तर सुखानं संसार झाला असता.

**उसासे** : कुंडलीत असतं ते होणार.

**आई :** तुम्हाला नाही हो म्हटलं मी....

**उसासे :** मला नाही राग येत तुम्ही किती बोललात तरी. कारण मला माहीत आहे तुमच्या कुंडलीतला मंगळ. स्वभाव तापट पण मन प्रेमळ. आणि–आणि दुसरं कारण माझी कुंडली. वृत्ती शान्त. या तुम्ही. उशीर होईल तुम्हांला ना? त्या बायका वाट बघत असतील. ( बाई जातात. 'केसरी'चा अंक उसासे वाचायला उघडतात. ) ( फोन वाजतो. उठून फोन उचलतो. ) हॅलो... कोण? कुठलं महिला मंडळ? उत्कर्ष? नाही नाही. ते बाहेर गेलेत... कोण प्रमिलाबाई, बाई आहात होय? मला पुरुषाचा आवाज वाटला. मग तुमच्या कुंडलीतला राहू तुमच्या कंठस्थानावर असला पाहिजे. काय? व्याख्यान? 'स्त्रिया आणि आत्मोन्नती' अध्यक्ष म्हणून? विठ्ठल धोंडो ना? ( मागे चैतन्य आणि विहंग उभे राहतात ) परवाच्या दिवशी.... नाही नाही. तारीख नाही मोकळी. ते दौऱ्यावर जाणार आहेत.

**चैतन्य :** अहो वासूकाका, आमच्या वडिलांची डायरी तुम्ही लिहिता की काय सध्या? सरळ तारीख रिकामी नाही म्हणून सांगताय्.

**उसासे :** थांब रे जरा. ( पुन्हा फोनवर ) लग्न-कुंडली आणि धनयोग या विषयावर हवं तर मी येईन बोलायला. होरारत्न मी बुभुक्षित उसासे. नाव ऐकलं नसेल, व्याख्यान ऐका. बायकांना आवडणारा विषय.

**चैतन्य :** 'बायका' हा तुम्हांला आवडणारा विषय आहे असं सांगा ना–! ( फोन घेतो ) हॅलो... हां, मी त्यांचा मुलगा बोलतोय्. उसाशाचा नाही. माझ्या वडिलांचा. हो, हो उत्कर्ष मंडळ ना–?...मी त्यांना तुम्हांला आल्यावर फोन करायला सांगतो...तुमचा नंबर सांगून ठेवा. ( लिहून घेतो ) बरोबर... बरं बरं. ( फोन ठेवतो ) काका, दुसऱ्याच्या घरात अगदी स्वतःच्या घरात वागल्यासारखं कसं वागता हो तुम्ही?

**उसासे :** या घराचे आणि माझे संबंधच तसे आपुलकीचे आहेत.

**चैतन्य :** अहो पण हे अति झालं. टेलिफोनवर बायकांच्याबरोबर मी व्याख्यान देऊ का म्हणून काय विचारताय्? डिग्निटी कमी होत नाही का बाबांची?

**उसासे :** बायकांच्याबरोबर कसं बोलायचं हे तुला अजून कळायला वेळ आहे.

**चैतन्य** : आजन्म ब्रह्मचारी असून तुम्हांला अजून कळलेलं नाही. आय्. ॲम् सॉरी. तुम्ही बसू नका. (सुखात्म्याकडे पाहून) तुम्हाला नाही म्हटलं मी.

**उसासे** : मग हरकत नाही.

**चैतन्य** : तुम्हाला नाही हो म्हटलं मी.

**उसासे** : म्हणजे ?

**चैतन्य** : तुम्ही जा. आम्हाला जरा खासगी बोलायचंय्.

**उसासे** : हे कोण ?

**चैतन्य** : माझी यांची अजून ओळख व्हायचीय्.

**उसासे** : केव्हा ती ?

**चैतन्य** : तुम्ही इथून गेल्यावर.

**उसासे** : मग अनोळखी माणसाला एकदम घरात आणलंस ?

**चैतन्य** : माझ्याच घरात ना ?

**उसासे** : नंतर ओळख करून घेणार.

**चैतन्य** : होतं असं कधी कधी.

**उसासे** : कसं ?

**चैतन्य** : लहानपणी एकदा वडिलांच्याबरोबर मंडईत गेलो होतो. गर्दीत चुकून दुसऱ्या माणसाचा हात धरला. सहज वडिलांचा खिसा समजून त्याच्या खिशातले चार आणे काढले.

**उसासे** : गुणी आहेस.

**चैतन्य** : त्याची जांभळं घेतली आणि पुन्हा वडिलांचा हात धरून पुढं निघालो.

**उसासे** : कुणाला कळलं नाही ?

**चैतन्य** : सगळ्यांना कळलं. प्रथम त्या जांभूळवाल्याला कळलं. त्यानं त्या माणसाला सांगितलं. तेव्हा त्याला कळलं. त्यानं माझ्या पाठीत रट्टा घातला तेव्हा मला कळलं. का घातला म्हणून वडिलांनी त्याला विचारलं, तेव्हा त्यांना कळलं; आणि तशी आमची ओळख झाली. पुढं तीच वाढली. कशी ते विचारा. आपल्या बिल्डिंगच्या खाली जे केमिस्टचं दुकान आहे ते त्यांचंच. अशा ओळखी होतात, मग वाढतात. काय हो, काय म्हणालात आडनाव तुमचं ?

**विहंग** : नंतर सांगतो.

**उसासे** : नंतर का ?

**चैतन्य** : मोठी माणसं इतक्या सहज ओळखी होऊ देत नाहीत. आणि तुम्हांला काय उपयोग आहे यांच्या ओळखीचा ? ते काही बाई नाहीत.

**उसासे** : बाई म्हणजे ?

**चैतन्य** : तुम्हांला तिथं इंटरेस्ट जास्त.

**उसासे** : परक्या माणसासमोर एकदम असं काय बोलतोयस रे ?

**चैतन्य** : आणि तुम्ही आमच्याबद्दल वाटेल ते बोलता घरात ते.

**उसासे** : काय बोलतो ?

**चैतन्य** : बिअरच्या दुकानात जातो, रमी खेळतो.

**उसासे** : जे दिसतं ते बोलतो. तू परक्यादेखत वाटेल ते बोलतोस मी तसं बोललो तर ?

**चैतन्य** : बोला की. कर नाही त्याला डर कसली ?

**उसासे** : कुठल्या पोरी घेऊन फिरत असतोस गावात ?

**चैतन्य** : कुठल्या पोरी ?

**उसासे** : हे बघ, तुझ्यावर लक्ष ठेवायला सांगितलंय् तुझ्या आईनं मला.

**चैतन्य** : मग आपल्या खोलीच्या खिडकीत जाऊन बसा बघत दुर्बिण लावून.

**उसासे** : मला सगळं कळलंय्, हा सेंट कुणी दिला तुला ? कुठल्या पोरीनं ?

**चैतन्य** : कुठला ?

**उसासे** : हा ईव्हिनिंग इन् पॅरीस.

( विहंग दचकतो, चैतन्य बाटली काढून घेतो. )

**चैतन्य** : द्या इकडे. आमची खाजगी वस्तू आहे ती.– गादीखालचा घेतलात ना ?

**उसासे** : तुझ्या आईच्या समोर घेतला. पण हे कोण आहेत ?

**चैतन्य** : तुम्हांला काय करायच्यायत नसत्या चौकशा ?

**उसासे** : हे बरं नव्हे हो. जरा सुधारा ही वागणूक. चित्रपटगृहाभोवतीच्या चकरा पुरेत आता.

**चैतन्य** : तुम्ही आधी स्वतःला सुधारा. प्रसूतिगृहाजवळ तुम्ही कशाला

चकरा मारत असता ?

**उसासे** : तो बिझिनेस आहे माझा, ज्योतिषाचा.

**चैतन्य** : त्यात कसला आला आहे बिझिनेस.

**उसासे** : रोज शेकड्यानं मुलं येतात जन्माला. अद्याप.

**चैतन्य** : अद्याप म्हणजे ?

**उसासे** : लग्न झाल्याशिवाय तुला याचा अर्थ कळून उपयोग नाही. ज्या तारखेला मूल जन्माला आलं, त्या तारखेची कुंडली करायची. दवाखान्याच्या रजिस्टरमध्ये पालकाचं नाव असतंच, घराचं एकूण आर्थिक अवसान बघायचं आणि नेमकं बारशाच्या दिवशी त्यांच्या घरी जायचं,– मुलाची उत्तम कुंडली जवळ तयार ठेवून.

**चैतन्य** : नसली तरी ?

**उसासे** : बिझिनेस आहे.

**चैतन्य** : मग अजून तुम्ही इथं कसे ? अहो, ती मोटवानीची चंदा आली की हॉस्पिटलमधून आता तिच्या घरी. आताच पाहिली मी गाडी.

**उसासे** : झाली का बाळंत? चला, म्हणजे मोकळी झाली. पण हे हिप्पी आहेत कोण ?

**चैतन्य** : तो माझा बिझिनेस आहे.

**उसासे** : कसला ?

**चैतन्य** : इन्शुरन्स एजंट. हे पॉलिसी उतरायला आलेत, त्यांच्या लाइफची. तुम्ही जा बघू. आमचं खाजगी काम आहे.

**उसासे** : रास काय तुमची ?

**विहंग** : म– म– माझी ? मला आठवत नाही.

**चैतन्य** : तुम्ही कशाला यांच्या राशीला बसलात ?

**उसासे** : बरं, जन्मतारीख ?

**विहंग** : आता लक्षात नाही.

**चैतन्य** : कुणासाठी तरी स्थळ बघायला आल्यासारखं काय बोलता हो त्यांच्याशी ?

**उसासे** : तुला धोरण कळायचं नाही. टिंकी लग्नाला आलीयू. बहीण तुझी. जरा केस कमी केले आणि कपडे बदलले तर टिंकीला अगदी योग्य स्थळ आहे.

**चैतन्य** : तुम्हाला सोपवलंय् ते काम ?

**उसासे** : तुझे वडील काही लक्ष देत नाहीत.

**चैतन्य** : आम्ही नाही वडील– बंधू ? तुम्ही आता या म्हटलं तरी–

**उसासे** : ओळख ठेवा हो. झालेली नसली तरी. माझं नाव हीरारत्न बुभुक्षित उसासे.

**विहंग** : चांगलं आहे.

**चैतन्य** : आम्ही यांना वासूकाका म्हणतो. ( त्यांच्याकडे बघत जाताना दरवाजात ठेच लागते ) हां, पडाल. ( उसासे जातो ) मोठा चमत्कारिक माणूस आहे. न बोलावता येतो आणि हाकललं तरी जात नाही. सॉरी हं. तुम्हाला निष्कारण ताटकळत बसावं लागलं. आपण मुद्द्यावर येऊ. मुद्दामच रस्त्यात मी काही बोललो नाही. खाजगी विषय चारचौघात नको.

**विहंग** : आय् मस्ट थँक्यू फॉर दॅट. पण मीना आजारी आहे असं म्हणालात ना ?

**चैतन्य** : मीना ?

**विहंग** : हां, तेच इंदू !

**चैतन्य** : हां, हां, टिंकी !

**विहंग** : टिंकी ?

**चैतन्य** : हां, ते तिचं निक नेम आहे.

**विहंग** : असं होय ? पण ती आजारी आहे असं म्हणालात ना ?

**चैतन्य** : तिला काय धाड भरलीय् ?

**विहंग** : म्हणजे ?

**चैतन्य** : मी तुम्हाला ते मघाशी खोटं सांगितलं.

**विहंग** : का... ?

**चैतन्य** : तुम्हाला इथं घेऊन येण्यासाठी.

**विहंग** : कशाकरिता ?

**चैतन्य** : तुम्हाला विचारण्यासाठी.

**विहंग** : काय ?

**चैतन्य** : मीनावर प्रेम बसलंय् ना तुमचं ?

**विहंग** : तुम्हीच सांगितलंत ना, तिनंच ते तुम्हाला सांगितलं म्हणून ?

म्हटलं की बंद व्हायचा.

**विहंग** : तो माझाच. पुरुषाचा आवाज ऐकला की बंद करायचो. बरं, हे तुमचं घरही माहीत नव्हतं. तसं डिरेक्टरीत शोधलं असतं, पण इथं येणं योग्य दिसलं नसतं.

**चैतन्य** : का ?

**विहंग** : माझ्यापेक्षा तिची परिस्थिती वाईट झाली असती. पुरुष बदनाम घेऊनच जन्माला आलेला असतो. मुलींचं तसं नसतं. तिचं अजून लग्न व्हायचंय्. समजा, माझं तिचं काही कारणानं नाही झालं लग्न ..

**चैतन्य** : का ?

**विहंग** : ते नंतर सांगतो. आणि आधी तुमच्या घरी न येण्याचं कारण सांगतो. जर ती अकारण बदनाम झाली तर पुढं त्या बिचारीची दशा फार वाईट होईल असं वाटलं, म्हणून घरी आलो नाही. आणि फोनवर बोललो नाही.

**चैतन्य** : आज कसे बोललात ?

**विहंग** : राहावलं नाही. खरं सांगतो, मला तुमचा स्वभाव मनापासून आवडला म्हणून, व तुम्हाला सांगतो, माझं तुझ्या बहिणीवर, सॉरी– माझं तुमच्या बहिणीवर मनापासून प्रेम आहे. आणि तिचं माझ्यावर. आम्ही परस्परांना लग्नाची वचनंसुद्धा दिलेली आहेत.

**चैतन्य** : टिंकी इतकी तयार असेल असं वाटलं नव्हतं हं.

**विहंग** : थांबा, यात तिच्यावर तयारीचा आरोप करण्यासारखं काही नाही. कॉलेजच्या गॅदरिंगमधे आम्ही बरोबर कामं केली. तिथं आमची ओळख झाली. अर्थात त्या नाटकात मला काम होतं तिच्या वडिलांचं.

**चैतन्य** : हे कादंबरीवाले लेकाचे ओळखीच्या जागेच्या खुणा बरोबर शिकवत असतात.

**विहंग** : दोष कादंबऱ्यांना नको, वयाला द्या. किंवा आमच्या बाबतीत त्या नाटकाला द्या. बाप म्हणून नाटकात तिच्या पाठीवर टाकलेला हात जो शहारा देऊन गेला तोच शहारा तिच्या गालांवरच्या गुलाबांना लाली देऊन गेला. आणि त्याच क्षणी आमची मनं एक झाली, स्पष्ट सांगतोय्. कारण मला काहीही लपवून ठेवायचं नाही. एक सांगतो, एकमेकांशी बोलण्यापलीकडे आम्ही कुठंही

**चैतन्य** : तेसुद्धा मी खोटंच सांगितलं.

**विहंग** : का ?

**चैतन्य** : मला अंदाज घ्यायचा होता.

**विहंग** : कसला ?

**चैतन्य** : हे जे तुमचं काही आहे ते कशा प्रकारचं आहे ?

**विहंग** : काय ?

**चैतन्य** : प्रेम !

**विहंग** : म्हणजे ?

**चैतन्य** : म्हणजे हे तुमचं प्रेम, वयाच्या ओलाव्यानं तारुण्याच्या इमारतीवर तात्पुरत्या चढणाऱ्या बुरशीसारखं आहे, का मनाच्या मातीच्या ओलाव्यानं पुढं स्वतःच्या पायावर कायम उभं राहण्यासाठी जन्माला आलेल्या हिरवळी-सारखं आहे ? थोडक्यात म्हणजे तात्पुरतं आहे का कायमचं आहे ? आणि प्रामाणिक आहे का उथळ ? किंवा विचारी का अविचारी ?

**विहंग** : मग काय ठरवलंत ?

**चैतन्य** : माझी बहीण माझ्याच आई-वडिलांची मुलगी आहे.

**विहंग** : हे तुम्ही ठरवलंत.

**चैतन्य** : नाही. तिचं सिलेक्शन चुकलेलं नाही, हे ठरवलं.

**विहंग** : कशावरून ?

**चैतन्य** : ज्या अर्थी तुम्ही माझी वाट पाहात ठरलेल्या ठिकाणी थांबलात त्यावरून.

**विहंग** : मला कळलं नाही.

**चैतन्य** : अहो, एखादा चंट असता तर मला भेटायला भ्यायला असता, तिला भेटला असता आणि तेही चोरून. शिवाय तुम्ही घरी तिला टेलिफोन करू शकलात.

**विहंग** : गेल्या चार दिवसांत ती भेटलीच नाही हो, त्यामुळं मनात काळजी वाटली.

**चैतन्य** : तिला अचानक मधे जावं लागलं पुण्याला एका लग्नाला. तरीच !

**विहंग** : काय ?

**चैतन्य** : गेले चार दिवस याच वेळेला एक फोन यायचा आणि मी हॅलो

म्हटलं की बंद व्हायचा.

**विहंग** : तो माझाच. पुरुषाचा आवाज ऐकला की बंद करायचो. बरं, हे तुमचं घरही माहीत नव्हतं. तसं डिरेक्टरीत शोधलं असतं, पण इथं येणं योग्य दिसलं नसतं.

**चैतन्य** : का?

**विहंग** : माझ्यापेक्षा तिची परिस्थिती वाईट झाली असती. पुरुष बदनाम घेऊनच जन्माला आलेला असतो. मुलींचं तसं नसतं. तिचं अजून लग्न व्हायचंय्. समजा, माझं तिचं काही कारणानं नाही झालं लग्न ..

**चैतन्य** : का?

**विहंग** : ते नंतर सांगतो. आणि आधी तुमच्या घरी न येण्याचं कारण सांगतो. जर ती अकारण बदनाम झाली तर पुढं त्या बिचारीची दशा फार वाईट होईल असं वाटलं, म्हणून घरी आलो नाही. आणि फोनवर बोललो नाही.

**चैतन्य** : आज कसे बोललात?

**विहंग** : राहावलं नाही. खरं, सांगतो, मला तुमचा स्वभाव मनापासून आवडला म्हणून, व तुम्हाला सांगतो, माझं तुझ्या बहिणीवर, सॉरी—माझं तुमच्या बहिणीवर मनापासून प्रेम आहे. आणि तिचं माझ्यावर. आम्ही परस्परांना लग्नाची वचनंसुद्धा दिलेली आहेत.

**चैतन्य** : टिंकी इतकी तयार असेल असं वाटलं नव्हतं हं.

**विहंग** : थांबा, यात तिच्यावर तयारीचा आरोप करण्यासारखं काही नाही. कॉलेजच्या गॅदरिंगमधे आम्ही बरोबर कामं केली. तिथं आमची ओळख झाली. अर्थात त्या नाटकात मला काम होतं तिच्या वडिलांचं.

**चैतन्य** : हे कादंबरीवाले लेकाचे ओळखीच्या जागेच्या खुणा बरोबर शिकवत असतात.

**विहंग** : दोष कादंबऱ्यांना नको, वयाला द्या. किंवा आमच्या बाबतीत त्या नाटकाला द्या. बाप म्हणून नाटकात तिच्या पाठीवर टाकलेला हात जो शहारा देऊन गेला तोच शहारा तिच्या गालांवरच्या गुलाबांना लाली देऊन गेला. आणि त्याच क्षणी आमची मनं एक झाली, स्पष्ट सांगतोय्. कारण मला काहीही लपवून ठेवायचं नाही. एक सांगतो, एकमेकांशी बोलण्यापलीकडे आम्ही कुठंही

मर्यादा सोडलेली नाही. कारण ती माझी भावी वधू म्हणून मी तिच्याकडे पाहातो. ती शुद्धच असली पाहिजे. हा संयम तीही पाळते, म्हणून आम्ही सभ्य आहोत.

**चैतन्य** : म्हणून चोरून भेटता ?

**विहंग** : ते कारण सांगतो.

**चैतन्य** : कारण काहीही सांगा, पण हे पटत नाही. लग्नच करणार आहात ना तिच्याशी ? — मग रीतसर भेटा ना. ठरवा. हो— नाही काय ते रीतसर होऊ दे, मग भेटा. चोरून कसले भेटता ? आपल्याच आयुष्याचा चार्म आपणच हरवून बसला आहात.

**विहंग** : कसा ?

**चैतन्य** : बघा ना. पूर्वी कसं होतं, मुलानं मुलगी बघितली, त्याला ती पसंत पडली, लग्न ठरलं एकदा, म्हणजे मग पुन्हा त्यांनी एकमेकांना बघायचं केव्हा, भटजींनी अंतरपाट बाजूला केल्यावर माळ घालताना. आपलं म्हणून पाहिलं आम्ही तेही चोरून. आणि स्पर्श केव्हा,— मम म्हणून भटजी हाताला हात लावायला सांगतात तेव्हा. त्या पहिल्या स्पर्शातला तो शहाराच आपण मंडळी हरवून बसला आहात.

**विहंग** : तुम्ही तरुण असून सनातनी वाटता हो !

**चैतन्य** : मी भारतीय आहे. आणि त्याचा मला अभिमान आहे. शीत कटिबंधातले हे कोर्टिंग वगैरे जे प्रकार आपल्याकडे आलेत ना, चूकच एकदम. तिकडं ठीक आहे हो. सारखं बर्फ पडतं. रक्त थंड असतं. इकडचं रक्त उसळ्या मारणार. अकारण ओव्हर फ्लो !

**विहंग** : माझं जरा ऐकता ?

**चैतन्य** : ऐकवा.

**विहंग** : माझं नाव विहंग. आडनाव सुखात्मे.

**चैतन्य** : सुखात्मे म्हणजे ?

**विहंग** : हो, तेच. माझे वडील मोठे कारखानदार आहेत. त्यांचा मी एकुलता एक मुलगा आहे.

**चैतन्य** : ते गाडीवरून लक्षात आलं. आणि त्यामुळंच भीती वाटली.

**विहंग** : कसली ?

**चैतन्य** : बहिणीच्या आयुष्याची. बडे बाप के बडे बेटे हो, पोरींना खेळवायचं काम सोपं. पैसा असतोच.–जो पोरींना तेवढा सुरुवातीला पुरे असतो. तुम्हा लोकांची चार दिवसांची करमणूक. पोरींना आयुष्याचा विचार करण्याइतका पोच आलेला नसतो. पुढे केव्हा तुम्हांला दुसरं खेळणं सापडलं तर हिची अवस्था तोंड दाबून बुक्क्यांचा मार !

**विहंग** : मी तसं होऊ देणार नाही.

**चैतन्य** : मग रीतसर मागणी घाला.

**विहंग** : मग थोडं थांबा.

**चैतन्य** : किती ?

**विहंग** : माझे वडील येईपर्यंत.

**चैतन्य** : लग्न तुम्हीच करणार आहात ना ?

**विहंग** : ते विनोद म्हणून ठीक आहे. पण प्रेमासाठी राज्यसुद्धा सोडायला तयार होणारा मी एखाद्या काल्पनिक कादंबरीतला राजपुत्र नाही. मी एक प्रॅक्टिकल माणूस आहे. शिवाय माझी अडचण सांगतो. माझी आई सावत्र आहे.

**चैतन्य** : बरं मग ?

**विहंग** : माझे वडील आज अमेरिकेत आहेत.

**चैतन्य** : पुढं ?

**विहंग** : ते माझ्या शब्दाबाहेर जाणार नाहीत. पण प्रत्यक्ष मला ते भेटेपर्यंत ही गोष्टच काय माझं आडनावसुद्धा बाहेर पडायला नको.

**चैतन्य** : का ?

**विहंग** : चुकून कुणाकडूनही गोष्ट माझ्या आईच्या कानावर गेली तर हे लग्न आयुष्यात होणार नाही.

**चैतन्य** : का ?

**विहंग** : तिनं तिच्या नात्यातली एक मुलगी माझ्यासाठी ठरवून ठेवली आहे. कारण पैसा. तिच्या मनात आहे तेच ती करणार. कारण बाबा तिला दुखवणार नाहीत. ती जरा तापट आहे. त्याच्या अगोदर मी बाबांना पत्र लिहिलेलं आहे. त्यांचा मीही लाडका आहे. ते तुमच्या वडिलांनाही ओळखतात. इतकंच नव्हे तर आदरानं बोलतात. पण ते, आई नव्हे. माझ्या मनाविरुद्ध

ते कधीच काही करणार नाहीत. पण त्यांना येऊ दे. आधी माझं आडनावसुद्धा तुमच्या घरात कळायला नको. खात्री करून घेण्यासाठी माझ्या घरी जर तुमच्यापैकी कुणी गेलं तर आमचं स्वप्न अर्ध्यावरच तुटेल. सत्यात उतरणार नाही.

**चैतन्य :** केव्हा येणार आहेत ते ?

**विहंग :** उद्या.

**चैतन्य :** हो ?

**विहंग :** हो. तसं मी तिच्याजवळ बोललोसुद्धा आहे. मग कदाचित तुम्ही म्हणता त्याप्रमाणं तो पहिला शहारा वगैरे सगळं रीतसर होईल. पण ते येईपर्यंत मी अडचणीत आहे. तुम्ही म्हणत असाल तर तोपर्यंत मी तिला भेटतसुद्धा नाही.

**चैतन्य :** खरं ?

**विहंग :** आणखीन तुमचा कसा विश्वास पटवून देऊ ?

**चैतन्य :** पॉलिसी उतरता ?

**विहंग :** कसली ?

**चैतन्य :** आयुष्याची !

**विहंग :** कुणाच्या ?

**चैतन्य :** माझ्या बहिणीच्या.

**विहंग :** म्हणजे ?

**चैतन्य :** लग्न करणार आहात म्हणजे पर्यायानं तिच्या आयुष्याची जबाबदारी घेणार आहात; आणि तुमच्या म्हणण्याप्रमाणं तुम्ही आपल्या वडिलांची संमती नक्कीच मिळवणार आहात.

**विहंग :** एकशे एक टक्के.

**चैतन्य :** मग तिच्या नावाची एक पॉलिसी उतरा. तुमचे वडील येतील तोपर्यंत तुमचं गुपित मी गप्प ठेवतो. तुमचं आडनाव दडवतो. एक पन्नास हजारांची पॉलिसी उतरा. समजा, तुमच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही लग्न केलंत तर पैसे तुमच्याच घरात येतील. नाही केलंत, जगाच्या म्हणण्याप्रमाणं फसवलंत, तर ते पैसे तिच्या नावावर जमा होतील. मीच इन्शुअरन्स एजंट आहे. फार झालं तर मला मिळणारं पहिल्या हप्त्याचं कमिशन मीच तुमच्या लग्नात अहेर म्हणून देईन.

**विहंग :** काही गरज नाही.

**चैतन्य** : तुम्हाला नाही, तिला.

**विहंग** : मान्य आहे. पण तुझ्यासारखा भाऊ तिला मिळाला हे मात्र तिचं भाग्य आहे.

**चैतन्य** : भाग्य कसलं कपाळाचं ? माझ्यावर जबाबदारी आहे. वडिलांनी सोपवलेली. मग पॉलिसीचं काय ? आई यायची वेळ झाली. तो उसासेही तिच्यासाठी स्थळ शोधतोय्.

**विहंग** : नाही. तेवढं प्लीज़ नका करू. प्लीज़ !

**चैतन्य** : ठीक आहे. पण पॉलिसीचं काय ?

**विहंग** : माझी तयारी आहे.

**चैतन्य** : केव्हा ?

**विहंग** : तुम्ही म्हणाल तेव्हा.

**चैतन्य** : प्रॉमिस ?

**विहंग** : येस, प्रॉमिस ! ( दोघं हातात हात देतात. )

**चैतन्य** : अहो, किती वेळ हात ठेवलाय् हातात ? तो माझा हात आहे. पण ही टिंकी आली कशी नाही अजून ? म्हणजे साडी आणायला गेली हे निमित्त तर नव्हे ?

**विहंग** : निमित्त म्हणजे ?

**चैतन्य** : तुमची भेटण्याची वेळ ठरलेली असेल ना ? ( विहंग मान खाली घालतो ) पुरुष असाच लाजतो का ? थांबा हं, तुम्हाला एक भेट देतो. ( सेंटची बाटली देतो. )

**विहंग** : अहो, ही तर मीच तिला दिली होती.

**चैतन्य** : तुम्हीच तिला ती परत द्या.

**विहंग** : केव्हा ?

**चैतन्य** : सांगतो योग्य वेळ आली म्हणजे.

**विहंग** : एक प्रश्न विचारू का ?

**चैतन्य** : हो, विचारा. आता माझ्याशिवाय आहे कोण इथं ?

**विहंग** : तसं नाही, पण स्वतःच्या बहिणीशी असलेलं परपुरुषाचं नातं तुम्ही स्वतःच जमवून देता ? एखाद्या सभ्य माणसाला हा प्रकार—

**चैतन्य** : सभ्यपणाचाच वाटेल. कारण विचारा.

**विहंग** : सांगा.

**चैतन्य** : तुमची तासावर चालणारी भेटीची मुदत मी आयुष्यानं वाढवली. टाळी.

**विहंग** : दिली.

**चैतन्य** : तरुण समाजाचं बदललेलं चित्र वाटेल ते रंग करत असतं. ते रंग थांबवायचे असले तर हा एक ढंग करून पाहायचा.

**विहंग** : कसला ?

**चैतन्य** : भावानं बहिणीचा प्रियकर हेरून काढायचा आणि सरळ तिचा हात त्याच्या हातात देऊन टाकायचा.

**विहंग** : का ?

**चैतन्य** : समवयस्कांची सुखदुःखं सारखीच असतात ना ?

**विहंग** : तुमचे एकूण विचार इतके पुढं गेलेले पण वागता किती साधे हो ?

**चैतन्य** : माझ्या पेहेरावावर जाऊ नका. अहो, स्त्री काय, किंवा पुरुष काय, बाहेरचे कपडे बदलले तरी आतली स्त्री काही पुरुष होत नाही. म्हणून मी ठरवलंय् पुरुष आहोत ना ? पुरुषाचे कपडे घालायचे.

**विहंग** : असंच का हो ?

**चैतन्य** : त्याचे तसेच काही नियम आहेत. पुरुषाचं शरीर सुदृढ असलं पाहिजे. आणि ते वस्त्राच्या सहाय्यानं उठून दिसलं पाहिजे. दंडाचे स्नायू, पायांच्या पोटऱ्या असल्या तर त्या नसतात म्हणून ढगळ किंवा चित्रविचित्र कपड्यांच्या अभ्रयांत लपवलेली बुजगावणी बघायला मिळतात. तुम्हांला नाही म्हणत मी.

**विहंग** : नाही, मीसुद्धा धोतर वगैरे नेसतो कधी कधी.

**चैतन्य** : ते समजलं. पण एकूणच बघा पुरुषांनी केस वाढवले म्हणजे बुद्धीची वाढ केसांत जात असावी असं वाटलं, म्हणूनच मी केस डोक्याबरोबर ठेवलेले आहेत.

**विहंग** : आणि बायकांचं काय ?

**चैतन्य** : सांगतो ना ! ज्या अवयवांचं दर्शन आई-वडिलांनासुद्धा दाखवायला माणूस नावाचा प्राणी एका विवक्षित वयात लाजतो त्या अवयवांना उठावदारपणा आणून झाकायच्या वस्तूंकडं डोळे लागावेत अशी वस्त्रं नेसायची

फॅशन हल्ली या पोरीं करायला लागल्यात.

**विहंग :** बायका म्हणा.

**चैतन्य :** एकच ते. कारण विचारा. त्यांच्या डोक्यावरचे केस कमी झाले. सौंदर्य हीच बायकांची बुद्धी आहे. आणि ते केसांत असतं. पक्षी, स्त्रियांची बुद्धी केसांत असते. आणि पुरुषांचं सौंदर्य डोक्यात असतं.

**विहंग :** ( हसत ) म्हणजे मला आता बारीक करायला हवेत !

**चैतन्य :** का ? मी केली तेवढी पुरे नाही का झाली ?

**विहंग :** (उठत) बरं, मी येतो.

**चैतन्य :** ते पॉलिसीचं लक्षात असू द्या.

**विहंग :** हो. ( दाराकडे जात असताना उसासे वहिनींना घेऊन प्रवेश करतात ).

**उसासे :** थोडे केस कमी केले आणि कपडे बदलले म्हणजे टिंकीला अगदी योग्य मुलगा आहे असं वाटलं. म्हणून मुद्दाम दाखविण्यासाठी घेऊन आलो. कसा वाटतो मुलगा ? टिंकीला योग्य आहे का नाही ?

**चैतन्य :** अहो, तुम्हांला हे नसते उद्योग सांगितलेत कुणी ?

**आई :** असा काय रे डाफरतोस ज्याच्या त्याच्यावर ? कोण आहेत हे ?

( टिंकी येते. त्याच्याकडे बघून न बघितल्यासारखं करते. )

**टिंकी :** मला काय ठाऊक !

**आई :** तुला नाही विचारलं मी.

**चैतन्य :** माझ्याकडे आलेत खाजगी कामाकरता.

**आई :** तुझं कसलं खाजगी काम ?

**चैतन्य :** विमा उतरावयाचाय् यांचा.

**आई :** काय आडनाव यांचं ?

**चैतन्य :** आडनाव ?

**विहंग :** मी येतो आता.

**चैतन्य :** एस्. विहंग.

**आई :** एस्. म्हणजे ?

**चैतन्य :** माझे मेव्हणे.

**टिंकी :** आबा....

**आई** : मेव्हणे म्हणजे ?

**चैतन्य** : तू समजतेस ना ते यांच्याच बहिणीचं प्रकरण आहे.

**आई** : अरे, सरळ बोल ना काही तरी.

**चैतन्य** : काय बोलणार ? तुम्ही काही आमच्या लग्नाकरता स्थळ बघत नाही, आपणच आपलं जमवून टाकावं. काय टिंके ? काय हो ?

**विहंग** : मी चलतो. (सेंट घेऊन जायला निघतो.)

**उसासे** : तो सेंट आपल्याच घरातला ना ?

**आई** : तुलाच दिला होता ना कुठल्या तरी मुलीनं ?

**चैतन्य** : अग, कुठली मुलगी काढलीयस ? टिंकीनं आणला होता माझ्यासाठी. हो ना टिंके ?

**टिंकी** : हो वाटतं !

**चैतन्य** : बघ, तिलासुद्धा वाटतं ! तिनं मला दिला, मी त्यांना देऊन टाकला. काय हो ?

**विहंग** : त्यांना हवा असेल तर ठेवा की, मी आता चलतो. (विहंग जातो.)

**आई** : तू तो सरळ घेतलास त्याच्याकडून. तू आपलं सरळ प्रेमप्रकरण आहेस म्हणून सांगतोयस. काय ग बाई होणार आहे या घराचं ! कुठनं ग बाई लग्न करून या घरात आले. दुसरं एखादं चांगलं स्थळ मिळालं असतं तर सुखाचा संसार झाला असता.

**उसासे** : कुंडलीत तुमचा गुरू वक्री आहे हो. उद्या मार्गी होईल. वडिलांचा आणि तुमचा षडाष्टक योगच आहे. लग्न ठरवताना पत्रिका बघणाऱ्याची तरी चूक असेल किंवा तुम्हा दोघांपैकी एकाची कुंडली चुकीची असेल.

**आई** : माझी नाही, असली तर त्यांची असेल.

(बाहेरून लोके डोक्याला पट्टी बांधलेल्या अवस्थेत विठ्ठल धोंडोंना घेऊन प्रवेश करतात.)

**लोके** : (ओरडून) गुरुजींना मार बसला.

**चैतन्य** : काय झालं बाबा तुम्हांला ?

**बाबा** : गाईनं शिंगावर घेतलं.

**चैतन्य** : केव्हा ?

**बाबा** : भाकड गाई रस्त्यावर फिरत होत्या त्या पांजरपोळात पोचवायला

निघालो होतो.

**उसासे** : समाजकार्य. बरं मग ?

**बाबा** : त्या गाईला राग आला.

**उसासे** : गोवधबंदीचं सत्कार्य केलं एवढं ! आहे त्या गाईंना त्याचं काही ? छे, ही जनावरंसुद्धा हल्ली माणसासारखी वागायला लागलीत.

**लोके** : अहो, गाय कशाला शिंगावर घेईल. तो खाटीक चोरून गाई कसाई-खान्यात नेत होता. हे त्या पांजरपोळात पोचवायला निघाले. त्या कसायाला आला राग. त्याने काठीनं पाच-सहा रट्टे घातले यांच्या पाठीत.

**बाबा** : उगाच त्या कसायाला कशाला बदनाम करता ? अहो, मी ते तो माणूसच ना.

**लोके** : पण तुम्ही पडून राहा बघू. पाच-सहा रट्टे घातलेत तुमच्या पाठीत. आई, तुम्ही तरी सांगा हो.

**आई** : पडा बघू इथं. नसते धंदे करताहेत बाहेर !

**उसासे** : अहो, हे समाजकार्य करता करता मराल एखाद्या दिवशी !

**बाबा** : उसासे, मी कधीच मरणार नाही. समोरचा माणूस उद्या मरणार आहे या समजुतीनं त्याच्याकडे पाहिलं की, आपल्याला त्याचा राग येत नाही. हा उपदेश जेव्हा मला पटला त्याच दिवशी मी अमर झालो. तुम्ही काय, मी काय....

**उसासे** : माझं मरण कशाला पाहाता ?

**बाबा** : तुमचंच कशाला ? तुम्ही काय, मी काय केव्हा तरी मरणारच आहोत. हा उपदेश माझ्या मनात आला. त्याचा अमृतपेला मीही प्यालेलो आहे.

**आज मी अमृत पेला प्यालो ।। धृ. ।।**
**मी जगलो तर जगेल ईश्वर**
**नसेन तोही नसेन मी तर**
**मनोमनी पटेल तेव्हा**
**अमर खरोखर झालो ।। १ ।।**

आनंदाच्या नयनी आसू
आसूंच्या कोंदणात हासू
हे आसूंचे अन् हासूंचे
गाणे चाले जन्मभर
गुणगुणतच गेलो ।। २ ।। ( नकळत समजून गेलो )

तृप्त असून मी अतृप्त सर्वदा
सुखात डुंबत धुंद कैकदा
या सौख्याचे दुःख पचविणे
सहजच पचवून गेलो ।। ३ ।।

**आई :** अहो, पण सांगितलं होतं कुणी तुम्हांला हे नसते धंदे ? काय बाई होणार आहे या घराचं ! कुठनं लग्न करून या घरात आले ? दुसरं एखादं चांगलं स्थळ मिळालं असतं तर सुखाचा संसार झाला असता.

**टिंकी :** काय झालं बाबा तुम्हांला ?

( सगळेजण विठ्ठल धोंडोंना संभाळून कॉटवर ठेवत असताना पडदा पडतो.)

पहिला अंक समाप्त

## अंक दुसरा

[ दुसऱ्या दिवशीची सकाळ. पायाशी चैतन्य पाय चेपत बसलेला आहे. आतल्या खोलीत इंदू आपल्याशीच गाणं म्हणत बसलेली आहे. ]

**चैतन्य** : इथं बाबा आजारी आहेत आणि तुला ही स्वप्नं कसली पडताहेत ?

**बाबा** : असू दे रे. ( उठत ) स्वप्नंच पडायची वयं आहेत तुमची. छान म्हणत होती गाणं. या घरात सुरेल स्वर ऐकू येतो तो असा कधी तरी. कशाला थांबवलास ?

**टिंकी** : बाबा, त्रास झाला तुम्हाला ?

**बाबा** : नाही रे बेटा, अजिबात नाही.

**चैतन्य** : मानभावीपणानं मुद्दाम विचारतेस ? ते चांगले म्हणाले म्हणून ? स्वतःचं फुकट कौतुक करून घ्यायची तुम्हा बायकांना सवयच. पण तुम्ही उठलात कशाला बाबा ? तब्येत बरी नाही ना तुमची ?

**बाबा** : नाही रे बाबा. मी पडून राहिलो, कार्य पडून राहील. असं पडून राहिलो, तर तुमची आई मला घरातून बाहेर पडू देईल का ? अरे, किती तापट तुमची आई, तरी तिचं माझ्यावर प्रेम आहेच.

**टिंकी** : म्हणजे बाहेर जाणार तुम्ही, बाबा ?

**बाबा** : अग, दौरा नाही का माझा आज सुरू ? आज संध्याकाळी इगतपुरी, उद्या नासिक.

**टिंकी** : पण कुठं जायचं नाही असं सांगितलं होतं ना आईनं ?

**बाबा** : अग, त्यासाठीच तर ही युक्ती. आपल्याला काही झालंच नाही

असं दाखवायचं.

**टिंकी** : आणि तरीही नाही म्हणाली तर ?

**बाबा** : बघू; सुचेल ऐन वेळी काही तरी.

**चैतन्य** : पण गाडीला अजून किती तरी वेळ आहे. समोर तर स्टेशन आहे. आतापासून कशाला उठता ?

**बाबा** : तिच्या धाकानं पडून राहिलो होतो. तुम्हीच दोघं आहात म्हणून बसलो जरा उठून. आणि टिंके, हे कसले कपडे घातलेस तू आज ?

**टिंकी** : हे काय! परवा नाही का तुम्हाला विचारलं ? – सगळ्या मुली असलेच कपडे घालतात, मीही शिवायला देऊ का म्हणून ?

**बाबा** : मला विचारलंस ?

**टिंकी** : हो.

**बाबा** : मग मी काय ' हो ' म्हणून सांगितलं ?

**टिंकी** : कुणाला ठाऊक !

**चैतन्य** : मी सांगू का बाबा, कुणाच्या सांगण्यावरून तिनं हे कपडे घातले ते ?

**बाबा** : सांग रे.

**चैतन्य** : आईच्या. आहे तुमची छाती आता विचारायची ?

**बाबा** : हो ग ?

( ती नुसती एका दिशेला बघत बसलेली आहे. )

**चैतन्य** : ए, टिंके ! तुला विचारताहेत बाबा. हवेत आहेस काय ? जरा, जरा खाली ये.

**टिंकी** : नाही.

**चैतन्य** : काय नाही ?

**टिंकी** : बाबांची छाती नाही आईला विचारायची.

**बाबा** : ते नाही विचारत. या कपड्यांचं विचारतोय्. कुणी तुला सांगितलं हे कपडे करायला ?

**टिंकी** : ( एकदम उठते. गिरकी घेऊन– ) स्वप्नील जीवनाचा स्वप्नील गंध-वारा, स्वप्नातलाच पक्षी, स्वप्नी फिरे भरारा !

**चैतन्य** : झालं, ही पुन्हा स्वप्नात गेली. ( ती आपल्या खोलीत जाते. )

मला काही हिचं लक्षण ठीक दिसत नाही. ( आतून एक वही आणि पेन घेऊन येते. ) बाबा, हिला हल्ली कविता व्हायला लागल्यात. सगळ्या लोकांत बसलेली असताना मध्येच एकटी होते. परवा जेवताना काय गोंधळ केलान् मला विचारा. सगळं मीठ तुपात टाकलंन्, लिंबू दुधात पिळलंन्, खिरीत कढी घातलीन्, हातानं कालवली, थोडं खाल्लंन्, पुन्हा उठली— पुन्हा बसली. आपल्याच नादात.

**बाबा** : छे आबा ! तुझा चावटपणा आहे हा लेका. सौभद्रातल्या कृष्णाचं गाणं आहे :

**घाली सारे मीठ तुपातचि**
**दुग्धी लिंबू पिळिले ।**
**क्षीरीमध्ये कढी घालुनी हस्तानी कालविले**
**थोडे खाउनी उठला । बसला फिरफिरुनी ।।**

सुभद्रेला बघून अर्जुनाच्या झालेल्या अवस्थेचं वर्णन !

**चैतन्य** : एक्झॅक्टली ! तसंच तिचं काही तरी झालं असावं अशी शंका आहे.

**बाबा** : हिचं ? होय ग टिंके ? तसं काही असलं तर सांगून टाक ग बाई ! वेळ वाचेल माझा. आणि ते श्रम दुसऱ्या सत्कार्याच्या कारणी लागतील. आहे काही ? आई यायच्या आत सांग.

**टिंकी** : बाबा, नवी कविता ऐका :

**स्वप्नील जीवनाचा स्वप्नील गंधवारा**
**स्वप्नातलाच पक्षी स्वप्नी फिरे भरारा ।**
**स्वप्नात मोरपंखी रंगातला पिसारा**
**रंगात अंतरंगी रे नाच रे मयूरा**
**हा नाच नाचताना किरणेच भोवताली**
**रंगी तरंगतोही स्वप्नातला पसारा ।**
**हे स्वप्न जागताना वाटे मनात भीती**
**वाटे कधी न यावी ती जाग स्वप्नप्रांती ।।**
**जाग्या जगातला तो तो तीक्ष्ण रुक्ष वारा ।**
**चुकवून सौख्य देतो स्वप्ना तुझा निवारा ॥**

**बाबा :** कविता चांगली आहे. पण विषय कुठं मिळाला ते सांग ना.

**चैतन्य :** ए टिंके, बाबांनी हे विचारलंय्, जमतंय् का तुझं कुठं काही ?

( आई मागे उभी आहे. )

**आई :** तिच्यावर कशाला खोटेनाटे आरोप घेतोयस ? ( बाबा तोंडावर पांघरूण घेऊन झोपतात. ) तुझं स्वतःचं काय ते बघ. नोकरीचं कुठं काय बघशील, का पोरींची प्रकरणं करत बसशील ?

**चैतन्य :** कुठली प्रकरणं ? उगीच नाही ते काय ?

**आई :** मला बनवू नकोस. तो सेंट तुला कुणी दिला ते सांग.

**चैतन्य :** टिंकीनं.

**टिंकी :** मी कशाला देईन ?. तूच आणला असशील कुठून तरी.

**चैतन्य :** मघाशी आईच्या देखत होय म्हणाल्येय्.

**टिंकी :** ते चुकून म्हटलं असेल.

**चैतन्य :** भांडं फोडायला लावू नकोस हं टिंके.

**टिंकी :** कसलं भांडं फोडणार आहेस ?

**चैतन्य :** जाऊ दे, जरा वचनात गुंतलोय्.

**आई :** घरात विचारल्याशिवाय कुठं वचनाबिचनात गुंतू नकोस हं चैत्या. घरात वडील माणसं आहेत. अजून वेळ आहे. आधी कुठं नोकरीचं बघ. अहो, तुम्ही तरी— हं, तुम्ही पडलात ना तोंडावर पांघरूण घेऊन ? म्हणजे मला उत्तर द्यायला नको. काय ग बाई होणार आहे या घराचं ? कुठून ग बाई लग्न करून या घरात आले ! दुसरं एखादं....

**चैतन्य :** ...चांगलं स्थळ मिळालं असतं तर सुखाचा संसार झाला असता.

**आई :** तू माझी टिंगल करतोयस हं चैत्या.

**चैतन्य :** तू हे लाटणं घेऊन कुठं निघालीयस आई ?

**आई :** जरा त्या पेंडशांच्या घरी मदतीला जातेय्. आज त्यांच्याकडे सोळा सोमवारांचं उद्यापन आहे.

**चैतन्य :** मग हरकत नाही. ( वडिलांकडे बघतो. )

**आई :** त्यांच्याकडे काय बघतोयस ?

**चैतन्य :** तुझ्या आवाजामुळं झोपमोड झाली बाबांची.

**बाबा :** आवाजानं नाही, लाटण्यानं झाली.

**आई** : म्हणजे ?

**बाबा** : तू बाहेर जाणार असं दिसतंय्. मलाही माझी पिशवी भरायला हवी, ती आठवण झाली.

**आई** : तुम्ही करा थट्टा, फूस द्या पोरांना. बघितलंत कशी मुलं बोलतात ते ? हा तुमचा वचक घरावर !

**बाबा** : अग, वचक कसला ? वचक ठेवायला कुटुंबप्रमुख म्हणजे जेलर वाटला काय तुला ? आणि हे कैदी ! जरा शांतपणानं घे. प्रेम द्यावं प्रेम घ्यावं. प्रेम अवघ्याशी वाटावं. घर कसं एखाद्या मंदिरासारखं असावं.

**चैतन्य** : पण तिथं सारखी घंटा वाजतच असते की बाबा.

**बाबा** : असं बोलू नये रे आबा. तिनं तुला कोडकौतुकानं वाढवलेलं असतं. आई आहे ती.

**चैतन्य** : मग कशाला खोटेनाटे आरोप घेत असते ?

**आई** : म्हणजे मी खोटं बोलते ?

**बाबा** : तू तरी एकदम कशाला त्रास करून घेतेस ? जरा शांतीनं घे.

**आई** : हे प्रवचन तुम्ही एखाद्या शिबिरात जाऊन द्या. आणि टिंके, हे कपडे कसले केलेप तू ?

**बाबा** : म्हणजे, तुला ठाऊक नाही ?

**आई** : काय ?

**बाबा** : तूच करून दिलेस ना तिला हे कपडे !

**आई** : मी ? काय डोकंबिकं फिरलंय् की काय तुमचं ?

**चैतन्य** : ते तिचं असेल आई. बाबांच्यावर कशाला चिडतेस ?

**बाबा** : अरे, चिडतेय् कुठं ती ? तिचं प्रेमानं बोलणं असंच असतं.

**आई** : तुम्ही आणखी मुलांच्यासमोर माझी शोभा करा. त्यामुळे पोरं हाताबाहेर चालल्येयत.

**चैतन्य** : माझ्याबद्दल बोलू नको हं आई. आपण आजन्म ब्रह्मचर्याची शपथ घेतलेली आहे.

**टिंकी** : देणार आहे कोण तुला मुलगी ? एकदा अवतार बघ,– वडारी दिसतोस !

**चैतन्य** : तुला दिसणारा स्मार्टनेस तुझा तू पसंत कर. माझा बावळटपणा

मला लखलाभ असो. करायचंय् काय लग्न करून ? नसती जबाबदारी.

**बाबा :** असं म्हणणारी मुलंच पुढं माझ्या जागेवर येतात रे शेवटी. आपली जबाबदारी आपल्यावर असं म्हणणं हा अंगचुकारपणा झाला. स्त्री हा दुर्बल घटक आहे, आपल्या जगात जन्माला आलेला. वृक्षाच्या आधाराशिवाय वेलसुद्धा वाढत नाही. तेव्हा आधाराचं काम सोडणं पुरुषानं म्हणजे बेजबाबदारपणा झाला.

**चैतन्य :** मग रामदास स्वामी काय बेजबाबदार होते ?

**आई :** हं, आता तू हो रामदास, हे आहेतच विनोबा. आणि तू कोण होणार आहेस ?

**चैतन्य :** मरलिन् मनरो !

**आई :** आणि तू चालल्येस कुठं एवढी नटून ?

**टिंकी :** ॲपॉइन्टमेन्ट आहे.

**चैतन्य :** हं, तिची वेळ झाली असेल.

**आई :** हं, तिला बोलायचं काही कारण नाही. आम्ही समर्थ आहोत.

**चैतन्य :** हं; तिचा विषय निघाला की तू बदलणारच. माझ्यावर मात्र डाफर. तुझं नाव आनंदी कुणी ठेवलं ग आई ?

**बाबा :** मी.

**आई :** एक देईन ठेवून कशी ?

**बाबा :** कुणाला ?

**आई :** तुम्हांला नाही म्हटलं हो मी. इतकी दुरुत्तरं करतात पोरं तोंडावर.

**बाबा :** एक उपाय आहे याच्यावर, पण तुला जमणार नाही.

**आई :** कसला ?

**बाबा :** समोरचा माणूस बोलायला लागला की तोंडात तंबाखू धरून बसत जा.

**आई :** अफू द्या आणून थोडी !

**चैतन्य :** कुठं मिळते ती सांग, म्हणजे आणून देतो.

**आई :** आणशील की, बीअर पितोस, जुगार खेळतोस, आता अफू खा.

**बाबा :** हे काय ऐकतोय् रे मी चैत्या ?

**चैतन्य :** खोटं आहे. त्या उसाशाला असा ठोकणार आहे—

**आई :** शाबास! आता जोडीला गुंडगिरी सुरू कर.

**चैतन्य :** मला विचारतेस तसं तिला विचार की काही तरी!

**आई :** ती कधीच वाईट रस्त्यानं जायची नाही.

**चैतन्य :** पळून जाईल एखाद दिवशी कुणाचा तरी हात धरून तेव्हा कळेल.

**आई :** तिची जबाबदारी तुझ्यावर आहे का?

**चैतन्य :** घेतलेलीच आहे. जोपर्यंत एक पुरुष तिचा पत्नी म्हणून स्वीकार करीत नाही तोपर्यंत भाऊ म्हणून तिची जबाबदारी माझ्यावर आहे. काय बाबा?

**बाबा :** अरे, हे तुझ्या-माझ्यातलं होतं.

**आई :** म्हणजे? याच्याशी संगनमत करता होय? काय बाई होणार आहे या घराचं! या मुलाचं हे लक्षण, तुमचं ते लक्षण, आणि हिचं हे तिसरंच लक्षण. तू कुठं निघालीयस आता? कुठं घरातून बाहेर जायचं नाही, सांगून ठेवते.

**टिंकी :** मी जाणार. आमची आता पार्टी आहे हॉटेलात.

**आई :** कसली?

**टिंकी :** परवाच्या नाटकाची.

**आई :** म्हणजे?

**टिंकी :** तुला नाही कळायचं ते.

**चैतन्य :** हं, तिला कळेल. रोज रोज प्रेझेंटस् आणते.

**टिंकी :** हो, आणते.

**चैतन्य :** मैत्रिणींच्याकडून आणतेस.

**टिंकी :** नाही, मित्रांच्याकडून आणते. आहे एक माझा ब्रॉयफ्रेंड, त्यानंच पार्टी ॲरेंज केलीय्. त्याच्याकडेच चाललेय्. घे करून काय करायचं ते. (पाय आपटत बाहेर जाते.)

**आई :** बघितलंत?

**बाबा :** तू जरा शांतपणानं घे. मुलांना जरा त्यांच्या मतानं वाढू द्यावं. जन्मभर आईबापांचा पांगुळगाडा पुरणार आहे का त्यांना? माणसाचं भाग्य देव त्या त्या माणसाबरोबर पाठवीत असतो. स्वतःपुरता प्रत्येक माणूस नक्की शहाणा असतो. आपली मुलं वाईट वागतात असं आपणच ठरविलं तर ती

नसली तरी तशी होतात.

**आई :** तुमचा शहाणपणा तुमच्याजवळ ठेवा !

**बाबा :** तुला तो देत नाही हेच तर दुःख आहे ना ?

**जे जे आपणास ठावे । ते ते दुसऱ्याशी शिकवावे ।**
**शहाणे करून सोडावे । सकल जन ।**

**आई :** अहो, मुलीला अशी वाऱ्यावर सोडायचीय् का ?

**बाबा :** मिळाली फांदी म्हणजे होईल स्थिर. सहशिक्षणाचं युग आहे. मुलं-मुली बरोबर फिरत असतात. ओळखी होत असतात. पुरुषाजवळ गेली की वाया गेली असं समजण्याइतकी पुढची स्त्री आता मूर्ख राहिलेली नाही.

**आई :** आणि एखाद्या कुठल्या तरी जातीचा मुलगा असला तर ?

**बाबा :** एक तर आपली मुलगी तसं करणार नाही. हा आपण प्रथम विश्वास ठेवायचा. असला तर स्वीकारायचा.

**आई :** कुठल्याही जातीचा ?

**बाबा :** जातीयवाद नाहीसा करायचा असेल तर त्याची सुरुवात लग्नाच्या बोहल्यावरच व्हायला पाहिजे. कसला जातीयवाद घेऊन बसली आहेस ? माणूस नावाचा एक प्राणी आहे, त्याच्यात दोन जाती असतात; — एक पुरुष, आणि एक स्त्री.

**आई :** हे तत्त्वज्ञान देवळात सांगा.

**बाबा :** नाही ना चालत, म्हणून शिबिरात सांगतो.

**आई :** आणि मार खाऊन येतो. घराकडे लक्ष द्या की जरा.

**चैतन्य :** ती जबाबदारी माझ्यावर सोपवलीय्.

**आई :** तू आपल्या नोकरीचं बघ.

**चैतन्य :** आहेच मला नोकरी.

**आई :** कुठं....?

**चैतन्य :** तुला काय करायचंय् ?

**आई :** उद्धटासारखं बोलू नकोस हं चैत्या.

**बाबा :** हे बरं नव्हे रे आबा.

**चैतन्य :** तसं नव्हे हो बाबा, बघा, माझ्या पगारावर घर आहे का ? मग ?

कुठली नोकरी करत असेन. उद्या मी कुठं तरी चार्टर्ड अकौंटन्ट आहे असं कळलं तर ही मला कौतुकानं जवळ घेणार आहे का? ती लाड करणार टिंकीचे! तुम्ही टाकलीय् ना जबाबदारी, जुळवून देतो की नाही बघा लग्नाची.

**आई :** दिवे ओवाळा! ते काही नाही, आजच्या आज जर तुम्ही त्या स्थळाकडे गेला नाहीत तिची पत्रिका घेऊन, तर मी कुठं तरी जाऊन जीव देईन. निघाले मी.

**बाबा :** इतक्यात कुठं ?

**आई :** पेंडशांकडे. दौरा-बिवरा सगळं रद्द. स्वच्छ सांगते. (बाहेर जाते.)

**चैतन्य :** आता हो बाबा ?

**बाबा :** कशाचं काय ?

**चैतन्य :** तुमचा दौरा रद्द ?

**बाबा :** कोण करणार, आई ?

**चैतन्य :** आमची.

**बाबा :** तेच. अरे आबा, हे वर्षानुवर्षं चाललंय्. तिनं नाही म्हणायचं, मी करायचं. सत्कार्याचा वाटाड्या परमेश्वर. हा दौरा ती थांबवू शकेल आणि वरचाच दौरा परमेश्वरानं आखला तर? तो कोण थांबवणार आहे का ?

**चैतन्य :** छे, असं एकदम वाईट का बोलता बाबा? कंटाळा आला तुम्हाला आमचा ?

**बाबा :** नाही रे आबा. देवानं दिलेल्या जीवनाचा कंटाळा करून कसं चालेल ? अरे, मागून परमेश्वर जीवन देत नाही, मरण कसं देईल ?

**चैतन्य :** पण असली भाषा बोलताच कशाला? घरातल्या आम्हा मुलांच्या भवितव्याविषयी चिन्ता वाटते का ?

**बाबा :** तुमच्या भविष्याची चिंता मी कशाला करू? पुष्कळ गोष्टी नाही आवडत घरातल्या मला. मी तुम्हाला कधी कठोर बोललोय् का ? —नाही.

**चैतन्य :** का नाही बोलत ?

**बाबा :** नाही. माझा तो स्वभावच नाही. तुझ्या आईचा आहे, ती बोलते. काय परिणाम होतो ? उगीच भांडणं होण्यापेक्षा तिचा आवाज वाढायला नको म्हणून मी तुमची बाजू घेतल्यासारखं बोलतो. पण मघाशी ज्या पद्धतीनं घरातून ती गेली तो प्रकार काय मला बरा वाटला असेल का— नाही. चांगल्या घरातल्या

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २०१६१ नों. दि. २५।१।८४

मुलींनी इतकं मोकळं वागणं चांगलं नाही. माझी जबाबदारी मी पार पाडत नाही, तुम्हाला दोष काय देऊ ? या मुलीबद्दल बाहेर बोलल्या जाणाऱ्या गोष्टी माझ्या कानावर येत नसतील का ? निदान अंदाज करता येत असेलच ना ? आता हिच्यासाठी स्थळं बघायला गेलो, आणि तिथं यातलं काही कानावर आलं—

**चैतन्य** : नाही बाबा, तशी नाही ती. मला ठाऊक आहे.

**बाबा** : मलाही ठाऊक आहे. मला जाब विचारता येईल का ? आणि विचारून उपयोग होणार आहे का ? जोपर्यंत चोरून एखादी गोष्ट माणूस करतो, त्या वेळी तो ती चोरूनच करणार. स्पष्ट माझ्याशी बोलायला येईल त्या वेळी तिला ते धाडस आलेलं असेल. तोपर्यंत वाट बघायची. बरं, तिची ही तऱ्हा, तर तू दुसऱ्या टोकाला.

**चैतन्य** : माझं काय झालं ?

**बाबा** : पाच-सहा वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. ओघाला आलं म्हणून बोलतो. तू बी. कॉम्. ला पहिला आलास, बोलला नाहीस. आम्ही पेपरमध्ये वाचलं. आम्हांला सांगायला तुझा आमचा संबंध काय ?

**चैतन्य** : त्यात काय सांगायचं ? नापास झालो असतो तर सांगितलं असतं.

**बाबा** : तुझ्याबरोबरची मुलं कशी वागतात, आणि तू ? मी आता तुझ्या गादीजवळ रात्री रेझर, ब्रश, ब्लेड, आणि साबण या वस्तू ठेवणार आहे.

**चैतन्य** : कशाला ?

**बाबा** : म्हणजे तुला कळेल की, या वयात या वस्तूंचा उपयोग करायचा असतो. या मिश्या काय वाढवल्यास ?

**चैतन्य** : पुरुषासारखं दिसावं म्हणून मी मिश्या ठेवल्या.

**बाबा** : बघ, केलंस माझं तोंड बंद. तुझ्यापुढं काय बोलणार ? नाही मला आवडत. काही उपाय आहे ?

**चैतन्य** : चुकलो बाबा, पुन्हा नाही बोलणार.

**बाबा** : अरे, तू विनोद केलास असं मी म्हणतो तो विषय बदलण्यासाठी. काही फरक पडणार आहे का ? मग निष्कारण भविष्याची चिंता कशाला करत बसू ? पुढच्या क्षणी काय होईल ते चालू क्षणाला कळत नाही. आता तुमच्या

सगळ्यांच्या समाधानासाठी एक उपाय म्हणजे माझं समाजाचं काम सोडून देणं. नाही ईश्वराची इच्छा माझी लोकसेवा चालू ठेवण्याची. हा ठरला हा दौरा शेवटचा. यापुढं समाजकार्य बंद. मीच आता प्रपंचाकडे वळतो. पण माझं सुख तुम्ही हिरावून घेतलंत हे मात्र माझं दुःख कायम राहील.

**चैतन्य** : पण तुम्हांला त्रास व्हावा असं इथं कुणालाच वाटत नाही, बाबा.

**बाबा** : हे बघ, या सर्व गोष्टी समजावून सांगण्याइतके तुम्ही दोघंही वयानं लहान नाही. व्यक्ती म्हणून तुमचं स्वातंत्र्य मी हिरावून घेऊ इच्छीत नाही, हे जितकं खरं तितकंच माझं स्वातंत्र्य मी कुणाला हिराबून देणार नाही हेही खरं.

( लोके येऊन दरवाजात उभे. त्याबरोबर उसासे. )

**लोके** : गुरुजी !

**बाबा** : कोण, लोके ! या, बसा. हे कसे तुमच्याबरोबर ?

**उसासे** : मी कशाला यांच्याबरोबर येईन ? मला वहिनींनी पाठवलंय्. मीनाची कुंडली घेऊन.

**बाबा** : बसा !

**उसासे** : तुम्ही जरा सरकून बसा. मी टेकून बसतो. तिच्या लग्नाचं ठरवायला जाणार आहात ना ? आता निघणार असलात तर मुहूर्त फार चांगला आहे.

**लोके** : कसला मुहूर्त चांगला आहे ? गुरुजी, घाई करा. तुम्हांला ताबडतोब निघायला हवं पक्षाच्या कचेरीकडे.

**बाबा** : हो; प्रचाराचा दौरा आखायचा असेल ना ?

**लोके** : अहो, दौरा कसला आखताहात ? फार वाईट बातमी आहे !

**बाबा** : कसली ?

**लोके** : यांच्यादेखत सांगू ?

**बाबा** : सांगा की, वाईट बातमी आहे ना ? मग लपून राहणार का ? चांगल्या बातम्यांचे पाय मुंगीचे असतात, पण वाईट बातम्या ससाण्याचे पंख लावून येतात.

**लोके** : मला नक्की कळलेलं नाही, पण तुम्हाला बहुतेक भूमिगत व्हावं लागणार.

**बाबा** : मला ? का रे बाबा ? मी चोरी-बिरी केलीय् कुणाची ?

**लोके :** चोरी नाही, पण सार्वजनिक ठिकाणी दंगल माजविण्याच्या आरोपाखाली तुम्हाला मिसाखाली पकडणार आहेत म्हणे.

**बाबा :** मी दंगल केली ? कुठं ?

**उसासे :** मला वाटतं ते कालचं गाईचं प्रकरण असणार.

**बाबा :** गाईचं कसलं प्रकरण ?

**उसासे :** ते शिंग नाही का मारलं गाईनं तुम्हांला ?

**बाबा :** ती दंगल मी केली का गाईनं ? मी नाही तिला शिंग मारलं.

**लोके :** तेही नाही मला ठाऊक. नाही, पण सचिवालयातला एक अधिकारी आणि एक पोलिस, दोघेही कचेरीत बसलेले आहेत. तुम्ही तिकडे पक्षाच्या कचेरीत चला. तिथं खुलासा होईल.

**बाबा :** यायलाच हवं, तू आहेस अर्धवट. तुझ्यावर विश्वासून कसं भागेल ? तू हो पुढं. ( तो जातो. ) काळजी करू नको रे. हा लोके लेकाचा रेम्याडोक्या आहे. तिला काही बोलू नको. उगीच घाबरून जाईल. बाहेरच्या जगात काहीच कार्य करता आलं नाही म्हणजे जी काही माणसं समाजकार्य करायला निघतात ना त्यातला आहे हा लोके. ( जातात )

**चैतन्य :** कसला हो चांगला मुहूर्त घेऊन आलात वासूकाका ?

**उसासे :** चांगला मुहूर्त आहे तो तिच्या कुंडलीत. त्यांची कुंडली कुठं बघितली होती ?

**चैतन्य :** कुंडली तुम्ही स्वतःचीच का बघत नाही ?

**उसासे :** माझी कशासाठी ?

**चैतन्य :** आमच्या लग्नाच्या राशीला बघण्यापेक्षा तुमच्या राशीला लग्नाचा योग आहे का तो पाहा ना ?

**उसासे :** तो माझ्या कुंडलीतला योग. तसं म्हणशील तर माझ्या कुंडलीत लग्नाचा योग आहे.

**चैतन्य :** अजून ?

**उसासे :** विधवाविवाह होण्याची शक्यता आहे.

**चैतन्य :** अरे...अरे !

**उसासे :** का रे ?

**चैतन्य :** मग तुम्हाला कुणाच्या तरी मरणाची वाट पाहावी लागणार.

**उसासे** : काही सांगता येत नाही. पण नशिबी असेल ते टळत नाही.

**चैतन्य** : मग बघायचं कशाला ?

**उसासे** : काय ?

**चैतन्य** : नशीब !

**उसासे** : टळणार नसलं तरी कळण्यात आनंद असतो म्हणून.

**चैतन्य** : त्याचा तुम्ही फायदा घेता !

**उसासे** : म्हणजे ?

**चैतन्य** : म्हणजे भविष्य सांगता.

**उसासे** : अरे, तो आनंद माझा. कुणाला बुद्धिबळ सोडवायचा नाद असतो, मला नक्षत्रांची गणितं सोडवण्याचा नाद आहे.

**चैतन्य** : गणितात नापास झाल्यामुळंच तुम्ही मॅट्रिकला नापास झालात ना ?

**उसासे** : तू माझी बरोबरी केल्यासारखा माझी थट्टा करतोस ? तुम्हा मुलांना हल्ली ताळ राहिलेला नाही. तुझ्या वडिलांसारखा मी तुमच्या घरात...

**चैतन्य** : त्यांची कुठं बरोबरी करता ?

**उसासे** : म्हणजे ?

**चैतन्य** : तुम्ही खूप म्हणाल. पण आम्हाला नाही ना वाटत तसं. अरे, वा रे, वा रे वा ! प्रत्येक घरात जाऊन तुम्ही असंच इंप्रेशन मारता आणि वायकांचा तुमच्यावर विश्वास बसतो. बिल्डिंगमधली सगळी तरुण पोरं चिडली आहेत तुमच्यावर. एखाद दिवशी ठोकतील पोरं जिन्याखाली तेव्हा कळेल.

**उसासे** : तू सरळ सरळ धमकी देतोयस मला !

**चैतन्य** : बघा ना, तसा योग आहे का कुंडलीत तुमच्या ? स्वतःचं जमत नाही म्हणून तुम्हाला दुसऱ्याचं जमवण्याचा नाद. माझ्या लग्नाच्या बाबतीत एक शब्द बोललात घरात तर याद राखा !

**उसासे** : ते वाटेल ते असलं तरी आता ज्या मुलीशी तुझं प्रकरण चालू आहे ते लग्न हजार हिश्शांनी होणार नाही, हे नक्की सांगतो. तुझ्या कुंडलीत तो योगच नाही.

**चैतन्य** : हेच मी म्हणतो ते. तुम्हाला पुरुषांच्या कुंडलीतलं काही कळत नाही. ( मीना येते. ) हिची सांगा बघू. म्हणाल ते भविष्य खोटं करून दाखवतो !

**उसासे** : ये, बैस इथं. आताच्या ज्या गुलाबी स्वप्नात तू वावरते आहेस

ना, ते खोटं आहे. आई-वडील ज्या मुलाशी तुझं लग्न ठरवतील तिथंच तुझं लग्न होणार. प्रेम वगैरे जे आहे ना ते सर्व खोटं आहे. वडील ठरवतील त्याच मुलाशी तुझं लग्न होणार.

**चैतन्य** : आणि मी सांगतो हे तुमचं भविष्य मी खोटं ठरवणार. तिचं ज्याच्यावर प्रेम आहे त्याच्याशीच तिचं लग्न होणार.

**उसासे** : ज्योतिषाचा व्यवसाय सोडून देईन !

**चैतन्य** : तोच योग तुमच्या कुंडलीत असेल.

**टिंकी** : पण माझं कुणावर प्रेमच नाही म्हटलं तर ?

**उसासे** : मग सांगतो काय ? योगच नाही. प्रेम वगैरे जे आहे ते सगळं खोटं आहे, असं म्हणालो ते काय ? तसा योगच नाही.

**चैतन्य** : फिरवला मोहरा. एकाच वाक्याचे अर्थ उलटसुलट करून सांगितलं, असं सांगितलं की झालं भविष्य. तसा योगच नाही किंवा आहे. एवढं जोडलं म्हणजे झालं. काही झालं तरी होणारं टळत नाही, हे जर सत्य आहे, तर भविष्याकडं बघायचं कशाला ? तुम्ही कसली भविष्यं सांगता ? गणिताचार्यांचा भास्कर गणिती भास्कराचार्य ना ?

**उसासे** : हो, असणार.

**चैतन्य** : बोंब ! म्हणजे हेसुद्धा तुम्ही कुंडली बघून सांगणार. बरं, त्याची मुलगी लीलावती माहीत आहे ?

**उसासे** : ते असणार म्हणजे ती असणारच.

**चैतन्य** : नक्की सांगा.

**उसासे** : मला अजून भेटलेली नाही.

**चैतन्य** : अहो, त्या भास्कराचार्यांची लीलावती तुम्हाला कशाला आणि कशी भेटायला येईल ?

**उसासे** : वाङ्मयात म्हटलं रे मी. वाचनात.

**चैतन्य** : धन्य आहात ! ( हात जोडतो. )

**उसासे** : ते असू दे, त्या लीलावतीचं काय ?

**चैतन्य** : अहो वासूकाका, तिचं कुंडलीतील वैधव्य टाळण्याकरिता उत्तमातला उत्तम मुहूर्त बघून त्या थोर गणितज्ञानं तिचा विवाह लावला; पुढं काय झालं ?

**उसासे** : कुंडलीतला योग असेल तसं होणार.

**चैतन्य** : नाही झालं. घटिकापात्रात पाणी बघण्यासाठी म्हणून लीलावती खाली वाकली, आणि तिच्या डोक्यावरची एक अक्षत ( तांदूळ – मोती ) घटिकापात्रात पडला, आणि भोक बंद होऊन पळानं घटिका चुकली. तिला वैधव्य यायचं ते आलंच ! ते काही ज्योतिष टाळू शकलं नाही !

**उसासे** : असं व्हायचंच. तो योगच तिच्या कुंडलीतला.

**चैतन्य** : अरेच्या ! पुन्हा आपलं तेच. अहो, तो टाळण्यासाठी तर मुहूर्त काढला होता ना ? जाऊ दे. आपला तुमच्या भविष्यावर विश्वास नाही. प्रेम-प्रकरण काय, अमुक-तमुक काय, तुम्हाला करायचं काय ? आमच्या घरातली लग्नं आहेत आमची आम्ही ठरवू.

**उसासे** : घराबद्दल आपुलकी वाटते म्हणून खरं सांगतो.

**चैतन्य** : या तुमच्या आपुलकीचा वीट आलाय्. एखाद्या माणसाच्या भिडस्त स्वभावाचा फायदा किती घ्यायचा ? आई-बाबा दोघे बिचारे भिडस्त आहेत, पण आम्हांला नाही हे पटत. आमच्याच घरात येऊन आमच्याच वडिलांना तुम्ही सरकून बसा,– मी टेकून बसतो असं म्हणता ? अशा माणसाला काय म्हणतात माहीत आहे ? लोचट...!

**लोके** : ( प्रवेश करीत ) धाकटे गुरुजी !

**उसासे** : नाही, पण तुझ्या वडिलांचं काय झालं ते अजून कळलेलं नाही.

**चैतन्य** : ( धावत येऊन ) काय झालं तिकडे लोके ?

**लोके** : गुरुजींना सांगा मी भूमिगत होतोय् म्हणून.

**चैतन्य** : म्हणजे ?

**लोके** : मघाची बातमी उलटी सांगितली.

**चैतन्य** : उलटी म्हणजे ?

**लोके** : पोलिस माझ्यासाठी आला होता. मला बाहेरच्या बाहेर कळलं. तो सचिवालयातला अधिकारी गुरुजींच्यासाठी आला होता.

**चैतन्य** : का ?

**लोके** : गुरुजींना पदवी मिळालीय, ' विद्यामहर्षी ' म्हणून. आणि दंगलीची बातमी माझ्याबद्दल होती. मी पळतो. मला भूमिगत व्हायला पाहिजे. (लोके जातो)

**उसासे** : पदवी मिळाली ? अरे, मिळणारच. सांगत काय होतो ?

**चैतन्य** : हा कुठला तरी नवपंचम योग असेल ना ?

**उसासे** : तुला काय कळतं रे त्यातलं ? आनंदाची बातमी आहे, वहिनींना जाऊन सांगतो. ( उसासे जातो )

**चैतन्य** : का ग टिंके, रडत का होतीस ? ते भेटले नाहीत ?

**टिंकी** : तुला काय करायचंय् ?

**चैतन्य** : वा ! असं कसं ? माझ्याशी सर्व बोलणं झालेलं आहे.

**टिंकी** : कसलं बोलणं ?

**चैतन्य** : तुझ्या लग्नाबद्दल.

**टिंकी** : तुला ब्रह्मचाऱ्याला लग्नाच्या उठाठेवी हव्यात कशाला ?

**चैतन्य** : एकटं राहून अक्कल वाढते. वाटली जात नाही म्हणून.

**टिंकी** : म्हणजे ?

**चैतन्य** : संसार करणाऱ्यांना काय कळत नाही हे संसार न करणाऱ्यांना बरोबर कळतं. म्हणून 'संसार करावा नेटका' हे तुकारामानं का म्हटलं नाही ? अकलेचं वाटप दोघात झालं होतं म्हणून. रामदासांनी का सांगितलं ? कारण एकटा. बुद्धी शाबूत.

**टिंकी** : तुझी बुद्धी शाबूत आहे ?

**चैतन्य** : तुझ्या मानानं निश्चित.

**टिंकी** : फार शहाणा आहेस.

**चैतन्य** : त्याचाच अर्थ तो. हे बघ टिंके, माझं सगळं बोलणं झालं आहे तुझ्या त्या विहंगाशी.

**टिंकी** : कोण विहंग ?

**चैतन्य** : सुखात्मे. त्याची–तुझी ओळख नाही ? ( टिंकी लाजते. ) आता कशी आलीस जातीवर ?

**टिंकी** : काय काय बोलला तुला तो ?

**चैतन्य** : नाटकात पाठीवर थाप पडल्यापासून हातात हात पडेपर्यंत सर्व काही बोलले.

**टिंकी** : इश्श ! आचरटच आहे ! आणखी काय सांगितलंन् ?

**चैतन्य** : आचरटपणा तर म्हणतेस; आणि ऐकायला तर हवं का ?

**टिंकी** : ए, सांग ना. आणखी काय म्हणाला ?

**चैतन्य** : कशाबद्दल ?

**टिंकी** : वडील येणार होते ते आले त्याचे ?

**चैतन्य** : आज कळेल.

**टिंकी** : मला नाही वाटत !

**चैतन्य** : मग काय वाटतंय् ?

**टिंकी** : ते कधीच येणार नसावेत. आबा, मला भीती वाटते.

**चैतन्य** : कसली ?

**टिंकी** : कसली नाही.

**चैतन्य** : ए, खुळचट, काही तरी वेड्यावाकड्या कल्पना मनात आणू नकोस. फार सज्जन वाटला आपल्याला तो. पोरगा भाऊक आहे पण खरा आहे.

**टिंकी** : कुणास ठाऊक !

**चैतन्य** : मला ठाऊक आहे. आज त्याचे वडील येणार आहेत.

**टिंकी** : असं आतापर्यंत तीन वेळा झालंय्.

**चैतन्य** : काय ?

**टिंकी** : काही तरी कारणानं परदेशातला दौरा लांबणं, येणं रद्द होणं.

**चैतन्य** : अग, शक्य आहे. फार मोठा उद्योगपती बाप आहे त्याचा. नशिबानं फार चांगलं स्थळ सापडलंय् तुला. टिंके, सुखाचा संसार होईल तुझा. अग, पन्नास हजारांची पॉलिसी फटक्यात उतरायला तयार झाला तो.

**टिंकी** : खोटं असणार सगळं.

**चैतन्य** : माझी पारख कधीच चुकणं शक्य नाही.

**टिंकी** : आमच्या खुणा आम्हांला कळतात.

**चैतन्य** : कसल्या ?

**टिंकी** : तसं असतं तर आज तो ठरल्या ठिकाणी भेटला असता !

**चैतन्य** : तू फार हळवी आहेस टिंके. आज नक्की येईल बघ तो. तो-पर्यंत कुठंच काही बोलू नकोस. मी तर नाहीच बोलत. बाबा दौऱ्यावरून आले की ही बातमी त्यांना देऊन थक्क करून टाकतो. बाबांनी आज आपलं मन स्वच्छ उघडं केलं माझ्यासमोर. त्यांना दुखवायचं नाही ! त्या उसाशाच्या ज्योतिषावर विश्वास ठेवू नको. तू कविमनाची मुलगी आहेस. कुठल्याही क्षणी तू हळवी होतेस. ( बाबा मागे येऊन उभे राहतात. ) आईच्या बोलण्याला

अजिबात भिऊ नकोस. आणि कुणासाठी आपलं मत बदलू नकोस !

**बाबा** : का रे आबा ? आईच्या विरुद्ध काय कारस्थानं चाललीयत, सांगू का तिला ?

**चैतन्य** : बाबा !

**बाबा** : असं आपणच वातावरण बिघडवू नये रे. तिची बिचारीची तक्रार रास्त आहे. आपण दुसऱ्यांच्या वेदना लक्षात घेतल्या म्हणजे दोष गुणासारखे वाटतात. आणि माणसं प्रेमानं जिंकायला शिकावं !

**चैतन्य** : तेच शिकवत होतो मी तिला.

**बाबा** : काय ते ?

**चैतन्य** : प्रेमानं माणसं जिंकायला, प्रेम करायला.

**बाबा** : आईवर.

**चैतन्य** : नाही. (ती खूण करते, बाबा बघतात)

**बाबा** : मग ?

**चैतन्य** : तुमच्यावर.

**बाबा** : ( पाठीवर थाप मारून ) अरे, माझ्यावर प्रेम आहेच रे तिचं, काय ग ?

**चैतन्य** : आता जरा फरक पडलाय्, जागा बदललीय्.

**टिंकी** : आब्या ! बघा ना बाबा कसा चिडवतो ते !

**बाबा** : अरे, तुम्ही दोघं पोरं म्हणजे आधार आहात माझे.

**चैतन्य** : तुम्हांला आज पदवी मिळाली ना— विद्यामहर्षी म्हणून ?

**बाबा** : तुमच्यापर्यंत कशी आली बातमी ?

**चैतन्य** : तुमचे ते लोके येऊन गेले, मिसाखाली पकडणार म्हणून भूमिगत झालाय् म्हणे. ( बाबा डोळे पुसतात. ) काय झालं बाबा ?

**बाबा** : वेडा मुलगा रे तो. मिसाखाली नाही, साधीच अटक आहे. आणू सोडवून त्याला. माझ्या आनंदापेक्षा त्याचं दुःख मला जास्त आहे. माझ्यापायी त्या बिचाऱ्यानं स्वतःवर संकट ओढवून घेतलंन्.

**चैतन्य** : कसलं ?

**बाबा** : त्या गाईनं मला मारलंन् म्हणून यानं त्या कसायाला मारलंन्. त्यानं फिर्याद केली. आणि सार्वजनिक जागी दंगल केली या आरोपाखाली

माझ्यासाठी तो बिचारा हकनाक बळी गेला.

**चैतन्य :** कुणासाठीही तुमचे डोळे पाण्यानं भरतात का हो बाबा ?

**बाबा :** रोज बरोबर राहणारा मुलगा रे. तुझ्यासारखाच तो.

**चैतन्य :** माझ्यासारखा ?

**बाबा :** अर्धवट.

**चैतन्य :** हो ! ( तिघंही खद्‌खदून हसतात )

**बाबा :** चला, मला आता निघायला हवं लगेच. बरं दोस्तांनो, आता आपली भेट सात दिवसांनी पुन्हा.

**चैतन्य :** तोपर्यंत सर्व व्यवस्थित होईल !

**बाबा :** म्हणजे ?

**चैतन्य :** प्रत्येक गोष्ट तुमच्या मनाप्रमाणं करायची ठरवली. निदान मी. मी जरा सलूनमध्ये जाऊन येतो.

**बाबा :** कशाला रे ?

**चैतन्य :** तुमच्या मनाप्रमाणं वागायचं ठरलं ना ? (असं म्हणून चैतन्य जातो)

**बाबा :** अरे, आईला पाठवून दे लगेच वर. मी निघालोय् म्हणावं. टिंके, तुझी आई येण्यापूर्वी चार गोष्टी तुला एकटीला सांगायच्या आहेत. सांगू ?

**टिंकी :** हे काय विचारता बाबा ?

**बाबा :** हे पाहा पोरी, शक्य तो कुणाच्या वैयक्तिक आयुष्यात ढवळाढवळ करायला मला आवडत नाही. अगदी स्वतःच्या मुलांच्यासुद्धा. तरी पण बाप म्हणून तुला काही गोष्टी केव्हा तरी सांगायला हव्यात. तुझी आई इथं नाही, हे बघून मी संधी घेतो आहे असं समज. बापाचा मुलीस उपदेश वगैरे असा गंभीर अर्थ घेऊ नकोस. तुला मी एक साधा प्रश्न विचारतो, तुझ्या आईनं मला तुझ्यासाठी एक स्थळ बघायला सांगितलं आहे. पण त्याआधी मला तुझा एक खुलासा हवा आहे.

**टिंकी :** कसला ?

**बाबा :** तुम्ही मुलं-मुली मोकळ्या वातावरणात फिरत असता. तुझ्या पाहण्यात तुझ्या योग्यतेचं एखादं स्थळ आहे का ? उत्तर द्यायचं नसलं तर तसं स्वच्छ सांग.

**टिंकी :** पण बाबा, तुम्हांला असा काही संशय आला का ?

अजिबात भिऊ नकोस. आणि कुणासाठी आपलं मत बदलू नकोस !

**बाबा :** का रे आबा ? आईच्या विरुद्ध काय कारस्थानं चाललीयत, सांगू का तिला ?

**चैतन्य :** बाबा !

**बाबा :** असं आपणच वातावरण बिघडवू नये रे. तिची बिचारीची तक्रार रास्त आहे. आपण दुसऱ्यांच्या वेदना लक्षात घेतल्या म्हणजे दोष गुणासारखे वाटतात. आणि माणसं प्रेमानं जिंकायला शिकावं !

**चैतन्य :** तेच शिकवत होतो मी तिला.

**बाबा :** काय ते ?

**चैतन्य :** प्रेमानं माणसं जिंकायला, प्रेम करायला.

**बाबा :** आईवर.

**चैतन्य :** नाही. ( ती खूण करते, बाबा बघतात )

**बाबा :** मग ?

**चैतन्य :** तुमच्यावर.

**बाबा :** ( पाठीवर थाप मारून ) अरे, माझ्यावर प्रेम आहेच रे तिचं, काय ग ?

**चैतन्य :** आता जरा फरक पडलाय्, जागा बदललीय्.

**टिंकी :** आब्या ! बघा ना बाबा कसा चिडवतो ते !

**बाबा :** अरे, तुम्ही दोघं पोरं म्हणजे आधार आहात माझे.

**चैतन्य :** तुम्हांला आज पदवी मिळाली ना– विद्यामहर्षी म्हणून ?

**बाबा :** तुमच्यापर्यंत कशी आली बातमी ?

**चैतन्य :** तुमचे ते लोके येऊन गेले, मिसाखाली पकडणार म्हणून भूमिगत झालाय् म्हणे. ( बाबा डोळे पुसतात. ) काय झालं बाबा ?

**बाबा :** वेडा मुलगा रे तो. मिसाखाली नाही, साधीच अटक आहे. आणू सोडवून त्याला. माझ्या आनंदापेक्षा त्याचं दुःख मला जास्त आहे. माझ्यापायी त्या बिचाऱ्यानं स्वतःवर संकट ओढवून घेतलंन्.

**चैतन्य :** कसलं ?

**बाबा :** त्या गाईनं मला मारलंन् म्हणून यानं त्या कसायाला मारलंन्. त्यानं फिर्याद केली. आणि सार्वजनिक जागी दंगल केली या आरोपाखाली

माझ्यासाठी तो बिचारा हकनाक बळी गेला.

**चैतन्य :** कुणासाठीही तुमचे डोळे पाण्यानं भरतात का हो बाबा ?

**बाबा :** रोज बरोबर राहणारा मुलगा रे. तुझ्यासारखाच तो.

**चैतन्य :** माझ्यासारखा ?

**बाबा :** अर्धवट.

**चैतन्य :** हो ! ( तिघंही खद्खदून हसतात )

**बाबा :** चला, मला आता निघायला हवं लगेच. बरं दोस्तांनो, आता आपली भेट सात दिवसांनी पुन्हा.

**चैतन्य :** तोपर्यंत सर्व व्यवस्थित होईल !

**बाबा :** म्हणजे ?

**चैतन्य :** प्रत्येक गोष्ट तुमच्या मनाप्रमाणं करायची ठरवली. निदान मी. मी जरा सलूनमध्ये जाऊन येतो.

**बाबा :** कशाला रे ?

**चैतन्य :** तुमच्या मनाप्रमाणं वागायचं ठरलं ना ? (असं म्हणून चैतन्य जातो)

**बाबा :** अरे, आईला पाठवून दे लगेच वर. मी निघालोय् म्हणावं. टिंके, तुझी आई येण्यापूर्वी चार गोष्टी तुला एकटीला सांगायच्या आहेत. सांगू ?

**टिंकी :** हे काय विचारता बाबा ?

**बाबा :** हे पाहा पोरी, शक्य तो कुणाच्या वैयक्तिक आयुष्यात ढवळाढवळ करायला मला आवडत नाही. अगदी स्वतःच्या मुलांच्यासुद्धा. तरी पण बाप म्हणून तुला काही गोष्टी केव्हा तरी सांगायला हव्यात. तुझी आई इथं नाही, हे बघून मी संधी घेतो आहे असं समज. बापाचा मुलीस उपदेश वगैरे असा गंभीर अर्थ घेऊ नकोस. तुला मी एक साधा प्रश्न विचारतो, तुझ्या आईनं मला तुझ्यासाठी एक स्थळ बघायला सांगितलं आहे. पण त्याआधी मला तुझा एक खुलासा हवा आहे.

**टिंकी :** कसला ?

**बाबा :** तुम्ही मुलं-मुली मोकळ्या वातावरणात फिरत असता. तुझ्या पाहण्यात तुझ्या योग्यतेचं एखादं स्थळ आहे का ? उत्तर द्यायचं नसलं तर तसं स्वच्छ सांग.

**टिंकी :** पण बाबा, तुम्हांला असा काही संशय आला का ?

**बाबा** : संशय कसला ?

**टिंकी** : माझं वागणं तुम्हांला कुठं वावगं वाटलं का ?

**बाबा** : पुष्कळ गोष्टी माझ्या कानावर येतात. पण माझा तुझ्यावर विश्वास आहे. गोष्टीला लागलेलं तिखटमीठ काढून उरलेल्या मूळ भागात काही सत्य असेल तर मी तुझ्या मनात असेल तेच करीन.

**टिंकी** : तुम्हांला जे योग्य वाटेल ते तुम्ही करा.

**बाबा** : असं. म्हणजे आता दौऱ्यावरून आल्यावर जे स्थळ बघेन त्याच्याशी तू लग्न करशील ?

**टिंकी** : मी तुमच्या आज्ञेबाहेर नाही बाबा.

**बाबा** : त्या आज्ञाबिज्ञा आता पुराणात राहिल्या. हा व्यक्तिस्वातंत्र्याचा काळ आहे. तुम्हा दोघांही मुलांवर मी मनापासून प्रेम करतो. तेव्हा तुमच्या मनाविरुद्ध मी काहीही करू इच्छीत नाही. आणि लग्न हा तर सबंध आयुष्याचा प्रश्न आहे. बरं, प्रेमविवाह वगैरे गोष्टीला विरोध नाही. तसं काही असेल तर तसं सांग. मी त्या मुलाच्या घरी जाऊन रीतसर विचारून सगळ्या गोष्टी करीन.

**टिंकी** : पण तुम्ही परत आल्यावर आपण बोललो तर ?

**बाबा** : म्हणजे तुझ्या मनात काही आहे. ठीक आहे. तुझ्या आईच्या इच्छेप्रमाणं ती सांगते त्या स्थळाकडे मी जाईन, आणि निर्णय तुझ्यासाठी राखून ठेवीन.

**टिंकी** : बाबा, इतक्या मोकळेपणानं मुलीशी सगळे वडील बोलत असतील का हो ?

**बाबा** : मी बोलतोय्. आणि शिवाय बाप मी आहेच. हे मी तुला विचारतो ते एवढ्यासाठी, की वयाच्या आवेगानं जवळ आलेल्या कुणाही तरुणाकडून तुझी फसवणूक झाली तर तुला जो मानसिक धक्का बसेल तो मला सहन होणार नाही.

**टिंकी** : मी कधीच फसणार नाही बाबा. तसंच काही करायचं असेल तर संपूर्ण पारख केल्याशिवाय मी कुणावरच विश्वास ठेवणार नाही.

**बाबा** : शाबास ! मुली, चारित्र्याइतकं जगात मी कशालाही पूज्य मानत नाही. तू कुणाशीही लग्न ठरव. माझी संपूर्ण सहानुभूती तुझ्या पाठीशी आहे. मात्र ज्या कुणाला निवडशील आयुष्याचा सहकारी म्हणून, त्याच्यावर विश्वास

टाकण्यापूर्वी तो संपूर्ण विश्वासाला पात्र आहे का नाही याची खात्री करून घेऊन मग विश्वास टाक. मात्र एकदा विश्वास टाकलास की तो पूर्णपणानं नैष्ठिक आणि ठाम असू दे. वयानं येणाऱ्या चंचल विचारांपासून लांब गेल्याशिवाय स्थिर आयुष्याची उभारणी होत नाही. चांचल्य सोड. कोणावरही प्रेम करत असशील, माझी ना नाही. पण तू फसलीस हे माझ्या कानावर आलं तर मी तुला या जगात त्यानंतर दिसणार नाही. बरं, या बाबतीत माझी काही अडचण वाटत असली तर आबाला सांग. त्याला मी या बाबतीत सगळं बोललो आहेच. तुला प्रेमविवाह करायचा असेल तर खुशाल कर. बाप म्हणून सदैव मी तुझ्या पाठीशी उभा आहे. पण ज्याच्यावर प्रेम करत असशील त्याच्याविषयी संपूर्ण खात्री करून घे. तेवढी पिशवी घे इकडे. (जायला निघणार, तेवढ्यात आई मागून येते.)

**आई** : ही काय पद्धत झाली होय मुलांना शिकवायची? सरळ मुलीला प्रेमविवाह करायला शिकवता! बाप आहात का दलाल?

**बाबा** : मुलीच्या बापाचं हे कामच आहे. तुझे वडील माझ्याकडे कोण म्हणून आले होते? त्यापेक्षा हे बरं नाही का? तू जरा समजुतीनं घे. अग, यात काही गैर नाही. तुझी निवड चुकली. तिची चुकायला नको.

**आई** : माझ्या घरात नाही चालायची हो असली थेरं. मुकाट्यानं मी सांगते ते स्थळ बघून या. तुम्हाला तुमची मुलं बुद्धिवान वाटत असली तरी मी काही माझ्यापेक्षा मुलांना जास्त अक्कल आहे असं म्हणणार नाही. आम्ही देऊ त्याच ठिकाणी मुलींनी जायला पाहिजे. मेल्यांनो, आम्ही काय कधी मुली नव्हतो? का वयात आलो नव्हतो! आमचं नाही ते बसलं कधी कुणावर प्रेम?

**बाबा** : एकमेकांचा स्वभाव.

**आई** : काय म्हणालात?

**बाबा** : काही नाही, ठिंके, ती पिशवी दे इकडे.

**आई** : आणि, काय हो! त्या भाऊरावांनी खंडाचे पैसे आणून दिले ना?

**बाबा** : हो, दिले ना!

**आई** : किती दिले?

**बाबा** : मला काय ठाऊक!

**आई** : मला ठाऊक आहे ना!

**बाबा** : मग विचारलंस कशाला?

**आई** : त्यांतले मला पाच हजार रुपये हवेत.

**बाबा** : कशाला ?

**आई** : बिल्डिंगला रंग द्यायचाय्.

**बाबा** : तुमच्या ताब्यात इमारत दिलेली आहे. तिच्या भाड्यातून द्या.

**आई** : म्हणजे आता पुढच्या वर्षीपर्यंत गेलं.

**बाबा** : मग काय बिघडलं ? यातले पैसे मिळणार नाहीत. शाळेच्या इमारतीचे बांधकामाचे चाळीस हजार रुपये झालेत. शिवाय शिक्षकांचा दोन महिन्यांचा पगार ! काय आकडा लोक्यांनी सांगितला बरं ? हं, सत्तावीस...

**आई** : हजार ?

**बाबा** : हो हजार ! ती माणसंच आहेत ना, त्यांना जेवायला नको ? छे, छे ! यातले पैसे मिळणार नाहीत. मातीनं माणसांसाठी पिकवलेलं धान्य मी माणसांना वाटून टाकतो. त्यातला एकही पैसा मी घरात देणार नाही.

**आई** : असे कसे हो तुम्ही निःसंग ?

**बाबा** : त्याचं काय आहे आनंदी, गुरुजींनी आमच्या लहानपणी आम्हाला एक उपदेश करून ठेवलेला होता. तू पुढं संसारात पडशील. आणि पुढं कंटाळून तुला हिमालयावर तपश्चर्या करण्यासाठी जावंसं वाटलं, तर तसं काही करू नको. तर तू स्वतः हिमालय हो.

**आई** : तुम्ही ढीग व्हाल हिमालय. पण उद्या टिंकीचं लग्न येईल– उसाशांनी एक स्थळ पाहिलंय्, पाच हजार हुंडा लागेल.

**बाबा** : छे, छे ! सोन्यासारखी पोर द्यायची आणि वर हुंडा ! नाही, हुंडा घेणाऱ्याला माझी मुलगी द्यायचीच नाही !

**आई** : पण घरात पैसे देणार नाही, असंच ना ? एवढी कानी कपाळी मी ओरडतेय्, पण घराकडं काही लक्ष देऊ नका. सारखं पायांवर नक्षत्र पडल्यासारखं बाहेर राहात जा. जगाचं कल्याण करा. घरातल्या सुखदुःखाकडे बसा पाठ फिरवून.

**बाबा** : तू म्हणतेस त्या स्थळाकडे मी जातो, असं तुला सांगितलेलं आहे. तेवढा माझ्यावर विश्वास ठेव. तुझा नसला तरी माझा माझ्या मुलांवर विश्वास आहे. मला जे सांगायचं ते या दोन्ही मुलांना मी समजावून सांगितलेलं आहे. पुन्हा सांगतो, दौरा संपल्यावर तू म्हणतेस त्या स्थळाकडे मी जातो. तेव्हा

माझ्यावर विश्वास ठेव.

**आई :** कुठनं ग बाई या घरात आले....

**बाबा :** थांब, हे वाक्य पुन्हा बोलू नकोस ! सगळे मायापाश तोडायची मी संधी शोधतो आहे. मी असण्याची जाणीव मी नसल्याशिवाय तुम्हांला होणार नाही. मी गेल्याशिवाय माझं असणं तुम्हांला हवंसं वाटणार नाही.

**आई :** तुम्ही कशाला, मीच तुमच्याआधी जाते !

**बाबा :** खरंच, तसं झालं तर फार बरं होईल.

**आई :** अहो, कोण नवरा आहात का राक्षस ?

**बाबा :** माणूस. मी आधी गेलो तर तुला होणारं दुःख मला स्वर्गातसुद्धा माझ्याकडून बघवणार नाही ! नवरा जिवंत असताना अहेवपणी मरणाचं सुख स्त्रियांना मिळावं असं जे पुरुषांना वाटतं ते क्रूरपणा म्हणून नव्हे, तर स्वतःच्या स्त्रीला पुढं होणारं दुःख होऊ नये म्हणून पुरुषाला वाटणारं कारुण्य हे त्या विचाराच्या मागं पुरुषासारखं उभं असतं म्हणून. असो. तुला बोलायची संधी न देता मीच आज बरंच बोललो. पण खरं बोललो. बाहेर माझ्या कुठल्याच उत्तराला प्रत्युत्तर होत नाही. तुही सगळे ज्ञानी आहात. भोळा दलित समाज अज्ञानी आहे. टिंके, मी चाललो ग.

**टिंकी :** आले हं बाबा.

**आई :** थांबा जरा. सात दिवस बाहेरगावी जाणार आहात, एकटे आहात. घरच्यासारखं कोणी खायला घालणार नाही. ही तुपाची बरणी देते तेवढी बरोबर घेऊन जा.

**बाबा :** अग, कशाला... ?

**आई :** तुम्हाला काय त्यातलं कळतंय् ? आणि हे पाहा, मी पेंडशांच्याकडे आहे. जाताना मला सांगून जा. ( आई बाहेर जाते. )

**बाबा :** ही बाई वेली-झाडाच्या मजबुतीसाठी झटताहेत. टिंके, तिच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नकोस. मी आहे. तसं माझ्यावरसुद्धा तिचं प्रेम आहे ग. पण पोटात असतं ते ओठात येत नाही, इतकंच. सांभाळून रहा हं बेटा. ( दरवाजात विहंग उभा राहतो ) नमस्कार. या, कुणाकडे आला होतात ?

**विहंग :** मी...मी...यांच्याकडे आलो होतो.

**बाबा :** हिच्याकडे ?

**विहंग :** नाही...नाही,...माझं पॉलिसीचं काम होतं.

**बाबा :** कसली पॉलिसी ?

**विहंग :** विमा...विमा...उतरायचा होता. माझं काल बोलणं झालं होतं.

**बाबा :** हं, आमच्या चैतन्याकडे आला होता. हं, हं...मला वाटलं कुठं भाषण वगैरे ठरवायला आला होता का काय ! कारण आता मला हा आठवडा अजिबात वेळ नाही. आता मी दौऱ्यावरच निघालोय्. तुम्ही बसा, मी देतो त्याला पाठवून. खाली दुकानात गेलाय्. तुम्हांला कुठं तरी पाहिल्यासारखं वाटतं ?

**विहंग :** मला ? कुठं ?

**बाबा :** हं, हिच्याबरोबर. काय ग टिंके ?

**टिंकी :** माझ्याबरोबर ? कुठून पाहणार ?

**बाबा :** माझं काम नव्हतं का केलंत तुम्ही ?

**विहंग :** तुमचं कसलं ?

**बाबा :** बापाचं.

**विहंग :** मला काही समजलं नाही.

**बाबा :** मला समजलं.

**विहंग :** काय ?

**बाबा :** अहो, मिश्या काढल्या म्हणून माणूस बदलतो काय ?

**विहंग :** म्हणजे ?

**बाबा :** अहो, मिश्या नव्हत्या का लावल्यात तुम्ही हिच्या बापाचं काम करताना, कॉलेजच्या नाटकात ?

**विहंग :** हं, हं, नाटकात.

**बाबा :** समाजकार्य करत असलो तरी आम्हांलासुद्धा विनोदबुद्धी आहे का नाही ! बसा, मी देतो पाठवून चैतूला. ( जातात )

( विहंग खुर्चीत जाऊन बसतो. ती कॉटजवळ उभी आहे. नुसता बसून तिच्याकडे बघत राहतो. )

**विहंग :** मीना !

**टिंकी :** हं !

**विहंग :** इकडे ये. ( त्याच्याजवळ जाऊन उभी राहते. नुसता तिच्याकडे

बघत राहतो. ) बैस ना. ( बसते )

**टिंकी** : नुसते काय बघत राहिलांत माझ्याकडे ?

**विहंग** : असंच वाटतं. ( उसासे दरवाजाआड उभा राहून मिटक्या मारतो. )

**टिंकी** : काय ?

**विहंग** : नुसतं तुझ्याकडे बघत राहावं. तुला डोळ्यांत साठवून ठेवावं. डोळ्यांतून मनात ओढून न्यावं. हृदयाचं देऊळ व्हावं. त्यात तुझी ओढून घेतलेली मूर्ती कायमची बसवावी. डोळ्यांना पापण्यांची कुलुपं लावून बाहेर पडण्याचे दरवाजे बंद करून ठेवावेत,– म्हणजे माझ्यापासून कुठं कुठं जाणार नाहीस.

**टिंकी** : थापा !

**विहंग** : विश्वास नाही ?

**टिंकी** : कसा ठेवावा ?

**विहंग** : का ?

**टिंकी** : किती वेळ वाट पाहायला लावलीस ?

**विहंग** : रागावलीस ?

**टिंकी** : नाही तर काय ! एकटी किती वेळ उभी राहिली असेन ? लायब्ररीजवळ ? सगळी माणसं बघत होती सारखी. मी सारखं घड्याळ बघत होते. सारखं कुणी ओळखीचं भेटेल का, ही भीती. तू का आला नाहीस म्हणून टोचणी. एक पेन्शनर तर वर्तमानपत्र वाचण्याच्या निमित्तानं माझ्याचकडे पाहात होता. काटे टोचत होते मनाला. जगाला फसवून अशी प्रतीक्षा करताना कशा सुया टोचत असतात मनाला. तुला कल्पना नाही. ( उसासे जातो. )

**विहंग** : आय् ॲम सॉरी, मीना.

**टिंकी** : बस्स, एवढं म्हटलं की झालं ?

**विहंग** : तसं नाही. मी तुझ्याकरिता काय आणलंय्, पाहिलंस ?

**टिंकी** : काय ?

**विहंग** : सीकॉनची साडी आहे ! तुझ्या बंधूंना आवडत नाही ना असले कपडे, म्हणून मुद्दाम आणली आहे. ऑरेंज कलर आहे. तुला काय टॉप दिसेल सांगू ! ( हातात घेते. ) उघडून बघ ना ?

**टिंकी** : तू आधी कुठं गेला होतास ते सांग.

**विहंग** : विमानतळावर.

**टिंकी** : मग काय झालं ? आले वडील ?

**विहंग** : नाही. (पातळ खाली ठेवते)

**टिंकी** : आज काय झालं ?

**विहंग** : प्लेन चुकलं ! काही कळत नाही. घरी काही कॉल आला असेल तर माहीत नाही. मी घरी फोनसुद्धा केला नाही. तुला वाट बघावी लागली असेल या काळजीनं धावपळ करीत शेवटी इथं आलो.

**टिंकी** : आणि मला खूष करण्यासाठी साडी घेऊन आलास ?

**विहंग** : म्हणजे ?

**टिंकी** : तुला काय वाटलं ? माझे आई-वडील मला कपडे करीत नाहीत ?

**विहंग** : असं काय बोलतेस मीना ?

**टिंकी** : तू खोटा आहेस.

**विहंग** : मीना ?

**टिंकी** : या भुलभुलवण्या तू दुसऱ्या मूर्ख मुलीला दाखव.

**विहंग** : म्हणजे ?

**टिंकी** : तुला काय वाटलं ? ही प्रेझेन्टस् घेऊन मी हुरळून जाईन ? तुला जर असं वाटत असलं ना, माझं खेळणं म्हणून उपयोग करून घेऊ, तर प्लीज्, डोन्ट मिस् अंडरस्टॅन्ड मी.

**विहंग** : तुझा गैरसमज झालाय् मीना. मी खरंच तुझ्याशी लग्न करणार आहे. (हात धरतो)

**टिंकी** : अंगाला हात लावायचं काम नाही. (लांब जाऊन उभी राहते. हा तिच्या मागे जातो.)

**विहंग** : माझं जरा ऐकून घे ना, मीना—

**टिंकी** : ही चौथी वेळ आहे तुझ्या वडिलांचं प्लेन चुकण्याची.

**विहंग** : मीना—

**टिंकी** : प्लीज् ! मला नावानं हाक मारणारे तुम्ही कोण ?

**विहंग** : माझ्यावर विश्वास ठेव, मीना. तुझ्या नावाची पन्नास हजारांची पॉलिसीसुद्धा उतरायची ठरविली आहे मी !

**टिंकी** : लाच देता ?

**विहंग** : लाच म्हणजे ?

**टिंकी** : हे पाहा, तुम्ही श्रीमंत असाल, तर आपल्या घरचे. मीही खाऊन पिऊन सुखी आहे. माझ्या आई-वडिलांना मला यापुढं फसवायची इच्छा नाही. पैशाच्या जोरावर प्रेम विकत घ्यायला आम्ही पोरी म्हणजे काय विक्रीच्या वस्तू वाटलो तुम्हांला ? तुमची श्रीमंती तुम्हांला लखलाभ असो ! आई-वडील ठरवतील त्या मुलाशी लग्न करून मी माझ्या वडिलांना तरी सुखी ठेवीन. तुझ्यासाठी मी माझ्या वडिलांना फसवलं, मला स्वतःला फसवलं. यापुढं तुमचा–माझा संबंध संपला. ( आतल्या खोलीत जाऊन सेन्टच्या बाटल्या, कागदाचे खोके घेऊन येते. त्याच्यापुढे टाकते ) ही तुमची प्रेझेन्टस्,– परत घेऊन जा.

**विहंग** : मला भीक नाही लागलेली !

**टिंकी** : मलाही लागलेली नाही. प्लीज़्, मला तुमच्याशी एक अक्षरसुद्धा बोलण्याची इच्छा नाही. प्लीज़्, गेट आउट फ्रॉम माय हाउस.–किंवा मी बाहेर निघून जाते.

**विहंग** : आवश्यकता नाही. सभ्य माणसाला एवढा अपमान पुरतो. ठीक आहे. तू मला झिडकारलं असलंस तरी मी तुला विसरलो नाही, एवढं मात्र लक्षात ठेव. ( जाताना समोरून आई येते. मागोमाग उसासे आहेच. )

**आई** : कुणाकडं आला होतात ? ( काही न बोलता निघून जातो. टिंकी धुसमुसून रडत बसलेली आहे. ) कोण आला होता ग हा ? तुझ्याकडं आला होता कोणी ?

**उसासे** : उत्तर न देताच निघून गेला.

**आई** : तू तरी उत्तर दे ना. बघतेस काय अशी कावरीबावरी ? आणि हे काय फेकून दिलंस इथं ? प्रेझेन्टस् वाटतं ? त्यानं दिलेली ? भांडण झालं ? म्हणजे इथपर्यंत मजल गेली होती तुझी ! काय ? उत्तर दे ना. आग लावून दे ना घराला त्यापेक्षा. इतकी कशाला उतावीळ झालेयस ? चांगलं अब्रूचं खोबरं खिरापत म्हणून वाटलं जाईल अशानं. सांग तुझ्या वडिलांना. ( धुमसते. ) रडून कशाला साजरं करतेस ? आम्ही आई-बाप मेलो होतो तुझे. एवढी कशी लाज सोडलीस ? हेच शिक्षण घेतेस ? बरोबर आहे, वडिलांची फूस असेल या गोष्टीला. आई कोण ? आता बोल की, कोण आला होता ? सांग, कोण आला होता हा मुलगा ?

कशासाठी आला होता ? काय नाव त्याचं ? ( तोंडात मारते ).

**टिंकी** : आई...

**उसासे** : उगी उगी. रडू नको. अहो, होतात असे प्रेमभंग. सांगत काय होतो, सगळे पापग्रह विरुद्ध दिशेला आहेत. प्रेम सफल होणार नाही. आई वगैरे घरची माणसं बघतील ते स्थळ तुझ्या कुंडलीत आहे. म्हणून सांगत होतो, हिच्या लग्नाचं लवकर बघा.

**आई** : पण यांची बुद्धी पाहिजे ना धड ? बोल, उत्तर दे.

( मागून चैतन्य येतो. )

**चैतन्य** : आई, अंगावर हात टाकायचं काम नाही. बाबा घरात नाहीत म्हणून काय वाट्टेल ते करशील काय ? रडू नको टिंके.

**आई** : हं. आता तू कर तिचं कौतुक. चाळे कसले करते ऐक एकेक. विचार तिला.

**चैतन्य** : कसले चाळे ?

**आई** : कोण आला होता, विचार तिला ?

**चैतन्य** : कोण आला होता ग टिंके ?

**आई** : ही प्रेझेंट्स कोण देतं, विचार तिला.

**चैतन्य** : मग काय बिघडलं ?

**आई** : काय बोलतोयस काय चैत्या ?

**चैतन्य** : तुला यातलं काही माहीत नाही. तू थांब. कोण आलं होतं ग ?

**टिंकी** : विहंग.

**चैतन्य** : हो ? हां, यांनी केली असेल चुगली. आईला यांनी जाऊन सांगितलं असेल.

**उसासे** : शेजारधर्म म्हणून आपुलकीनं लक्ष ठेवतो.

**चैतन्य** : त्या तुमच्या शेजारी जे दाबके राहातात ना ? तिथे ठेवा लक्ष. नवरा ठार बहिरा. बायको बोलभांड. तिथं चालू देत ना तुमचे धंदे. तुमची एकेक अशी प्रकरणं बाहेर काढीन की नाही, बिल्डिंगमध्ये तोंड बाहेर काढायला मिळणारच नाही. सांगून ठेवतो.

**आई** : लहान तोंडी केवढा मोठा घास घेतोस चैत्या ?

**उसासे** : तुम्हीच बघा म्हणजे झालं ?

**चैतन्य** : मग त्याचं काय झालं ?

**टिंकी** : आजही प्लेन चुकलं.

**आई** : मेल्यांनो ! प्लेननं पळून जायचा विचार होता काय तुमचा ? फार पुढं गेलीस हो !

**चैतन्य** : तू गप्प बैस ग. हं, मग काय झालं ?

**टिंकी** : मी त्याला हाकलून दिलं.

**चैतन्य** : हाकलून ?

**टिंकी** : हो, यापुढं तोंड पाहू नकोस असं सांगितलं.

**चैतन्य** : मूर्ख आहेस.

**टिंकी** : म्हणजे काय ?

**चैतन्य** : महामूर्ख आहेस ! मी सांगितलं होतं ना, त्याच्यावर विश्वास ठेव म्हणून. निव्वळ संशयानं अपमान केलास त्याचा. एवढं चांगलं घर मिळेल का आयुष्यात पुन्हा ? अग, पन्नास हजारांचा विमा उतरावयाला तयार होता तो. तो काय खोटा असेल, का मूर्ख असेल ? तू स्वतःला काय मेनका, रंभा समजतेस ? सौंदर्याची पुतळी ? आता त्याच्या वडिलांकडे गेलो आणि त्यांनी नकार दिला तर ?

**आई** : अरे, काय चालवलंय् काय तुम्ही ? तू लग्नबिघ्न ठरवतो आहेस की काय तिचं ?

**चैतन्य** : हो.

**आई** : पण आम्ही आहोत ना ?

**उसासे** : हो ! आम्ही आहोत ना ?

**चैतन्य** : मग आम्हीही आहोतच ना. जोपर्यंत कोणी हिला आपली म्हणून स्वीकारीत नाही आयुष्यासाठी तोपर्यंत बहीण म्हणून मी हिचा भाऊ. माझ्यावर संपूर्ण जबाबदारी पडते हिच्या आयुष्याची. का अपमान केलास त्यांचा ?

**टिंकी** : तू स्वतःला फसवू नकोस. तू कुठं फसलीस असं कळलं तर तुझा बाप यापुढं जगात दिसणार नाही, असं मला बाबा सांगून गेलेत.

**चैतन्य** : मूर्ख आहेस ! बाबांनी सांगितलं म्हणून काय झालं ? मला आधी विचारायला काय झालं होतं तुला ? तू वेडी आहेस. कवी आहेस. छट्, बोलू नकोस माझ्याशी. चंचल आहेस. हा मुलगा वाईट होता ? बाबांना सांगायला

लाज वाटण्यासारखा होता ?

**आई :** अरे, हा कोण मुलगा ? काय नाव त्याचं ? काही झालं तरी आई आहे तुमची.

**चैतन्य :** आणखीन दोन दोन थोबाडीत दे तिच्या. कोट्यधीश, एवढा उद्योगपती बाप त्याचा ! सारखा परदेशी वाऱ्या करणारा, असलं स्थळ तू हातानं घालवलंस ?

**आई :** अरे, कुठलं स्थळ ?

**चैतन्य :** घे. ऐक आता. आई, हा सुखात्मे. याचं आणि तिचं प्रेमप्रकरण होतं. तो मुलगा हिच्यासारखा सभ्य आहे. उगीच काही तरी कुत्सित शंका काढशील म्हणून आधी सांगून ठेवतो.

**आई :** अरे, मग मेल्या, हेच ते स्थळ मी तुझ्या वडिलांना बघायला सांगितलं होतं हिच्यासाठी. उगी उगी, रडू नको. उगाच मारलं मी. लागलं का ग ! बघा, सांगत नव्हते, माझी मुलगी कधीच वाईट मार्गानं जायची नाही.

**उसासे :** मग सांगत काय होतो ?

**आई :** अग, मग तुला हे आधीच सांगायला काय झालं होतं. काय बाई होणार आहे या घराचं ! हिची ही तऱ्हा...त्याची ती तऱ्हा...

**उसासे :** याची ही तिसरीच तऱ्हा ! या मिश्या काय भादरल्यास अभद्रासारख्या !

**चैतन्य :** बाबांना आवडत नाहीत म्हणून.-तुम्ही थांबा. मी त्या सुखात्मेला गाठतो. नाही तरी त्याची गाडी स्टार्ट व्हायला वेळच लागतो. ( चैतन्य जातो. )

**उसासे :** छान स्थळ पटकावलंस हं पोरी ! मुलगी अगदी तुमच्या वळणावर गेलीय. नाही तर हा ! हा गेलाय् वडिलांच्या वळणावर.

( दारात पोलिस येऊन उभा राहतो. )

**उसासे :** अहो, हे पोलिस कशाला आलेत ?

**पोलिस :** विठ्ठल धोंडो पूर्णपात्रे इथंच राहतात काय ?

**उसासे :** हो, का ?

**पोलिस :** ते मेलेले आहेत.

**उसासे :** काय ?

**पोलिस :** यार्डात मालगाडीखाली सापडले. चेहरा ओळखू येत नाही.

त्याच्या पाकिटात हा पास सापडला आहे. चेहऱ्याची ओळख पटवून घेण्यासाठी कुणाला तरी यावं लागेल. त्यात एक मुलीचा फोटो आहे, आणि पैसे आहेत.

( आनंदी कपाळावर हात मारून बसते... तू फसलीस असं मात्र जर माझ्या कानावर आलं तर तुझा बाप यापुढं तुला जगात दिसणार नाही... असं ऐकू येतं... भ्रमिष्टासारखी मीना उठते. पेन, काढते. पुढं असलेल्या डायरीवर चार ओळी लिहून ठेवते. तशीच भ्रमिष्टासारखी पोलिसाच्या अंगावरून बाहेर निघून जाते. )

**पोलिस** : या येताहेत ओळख पटवून द्यायला ? चालेल.

**चैतन्य** : त्या लेकाची गाडी स्टार्ट झाली आणि तो निघून गेला. आई, तो पोलिस कशाला आला होता ? आणि ती टिंकी कुठं गेली ? काय झालं आई ? आईऽऽ झालंय् काय ?

**उसासे** : तुझे वडील मालगाडीखाली सापडले.

( चैतन्य कोसळतो. )

दुसरा अंक समाप्त

## अंक तिसरा

[ वर्तमानपत्राआड चेहरा असलेले बाबा दिवाणखान्यात दिसतात. ]

**आपण गेलो विश्व बुडाले**
**उरले मागे कोण ? ॥**
**संतत चिंता करतो मानव ।**
**अखेर तोही कोण ?**
**नसण्यासाठी असणे ही तर**
**असणाऱ्याची खूण**
**मनोमनी हे पटते तेव्हा होतो ब्रह्मानंद ॥ अवघा...**

( सेक्रेटरी मागं येऊन नमस्कार करून उभा राहातो. )

**सेक्रेटरी** : आपला निरोप पोहोचवला. साहेब म्हणतात, आपण जरा वेळ थांबा, स्नान आटोपून मी येतोच. ( बाबा, चष्मा काढून डोळे पुसतात. ) काय झालं साहेब ?

**बाबा** : काय एक एक माणसं मरत असतात.

**सेक्रेटरी** : आपल्या नात्यातलं कोणी गेलं ?

**बाबा** : नात्यातलं ? हो, नात्यातलंच म्हणायला हवं. माणूस इथून तिथून सगळा आपल्या नात्यातलाच नाही का ? बसा ना, उभे का ?

**सेक्रेटरी** : असू दे. कोण गेलं ?

**बाबा** : एक हमाल.

**सेक्रेटरी** : हमाल म्हणजे ?

**बाबा** : ही काय बातमी आहे ! एका गरोदर स्त्रीनं तिसऱ्या मजल्यावरून खाली घेतलेली उडी एका फूटपाथवर झोपलेल्या हमालाच्या अंगावर पडून बाई वाचली, पण हमालाचा अंत झाला.

**सेक्रेटरी** : तुमच्या ओळखीचा होता ?

**बाबा** : असलाच पाहिजे.

**सेक्रेटरी** : म्हणजे ?

**बाबा** : माणूस होता तो !

**सेक्रेटरी** : म्हणून आपल्या डोळ्यांना पाणी ?

**बाबा** : माझ्याआधी गेला म्हणून रडतोय्. तो गेला म्हणजे मी गेलो असं जेव्हा वाटतं तेव्हा असं डोळ्यांत पाणी येत असतं. ( हसतो. ) बसा की इथं.

**सेक्रेटरी** : नाही, ठीक आहे.

**बाबा** : संकोच कसला करता ? वयाचा ? तुम्हीसुद्धा एकदा या वयाचे होणारच आहात.

**सेक्रेटरी** : वयाचा होईन. बरोबरीचा कसा होईन ?

**बाबा** : हा विचार प्रथम दूर ठेवा. हा मोठा, हा लहान, हा भेद ज्याच्या मनात तो सदा संभ्रमात.

**सेक्रेटरी** : पण निसर्गानं केलेला भेद ?

**बाबा** : आपण मोडायला हवा. बाप जेव्हा म्हातारा होतो तेव्हा मुलगा त्याचा आधार, लहानपणी चाल चाल म्हणून बाप शिकवतो. म्हाताऱ्या झालेल्या एखाद्या अंध-वृद्ध बापाला तोच मुलगा पुढं हाताला धरून चालवतो. म्हणजे वयानं मोठा असून बाप लहान आणि वयानं लहान असूनसुद्धा मुलगा मोठा होतो का नाही ? मग कोण मोठा, कोण लहान ? म्हणून म्हटलं, बसा.

**सेक्रेटरी** : तरुण वयाला जरा अभिमान असतो ना शक्तीचा म्हणून, पाय बसायला नको म्हणतात.

**बाबा** : म्हणजे मला उभं राहायला हवं. ( उभा राहतो ) हरकत नाही. आपण असे बोलत राहू.

**सेक्रेटरी** : छे, छे ! हे काय ? आपण बसा.

**बाबा** : एखादा समंध मागं लागावा तसा मी तुमच्या मागं लागलोय् असं

तुम्हाला वाटतंय् ना ?

**सेक्रेटरी** : छे, छे ! तसं काही नाही. पण आपण बसा ना.

**बाबा** : आपण बसलात तर आम्ही बसू.

**सेक्रेटरी** : तुम्ही मला अडचणीत टाकता.

**बाबा** : आपण नेहमी बरोबरच असता का ? परदेशातसुद्धा ? म्हणजे विमानानं प्रवास करता त्यांच्याबरोबर ?

**सेक्रेटरी** : हं, हो.

**बाबा** : मग त्या वेळी सगळा प्रवास उभं राहून करता ?

**सेक्रेटरी** : नाही. पण तिथं नाइलाज असतो. इथं इलाज आहे.

**बाबा** : स्मार्ट बॉय.

**सेक्रेटरी** : आपण मला काही म्हणालात ?

**बाबा** : शिक्षण किती झालंय् ?

**सेक्रेटरी** : इन्कमटॅक्स कन्सल्टंटचा कोर्स पुरा केलाय्.

**बाबा** : पुढं काय विचार आहे ?

**सेक्रेटरी** : कसला ?

**बाबा** : नोकरी वगैरे करणार का ? घरीच वडिलांच्या हाताखाली...

**सेक्रेटरी** : म्हणजे साहेबांच्याच ना ? हो ! त्यांच्याच हाताखाली.

**बाबा** : म्हणजे सगळी जबाबदारी तुमच्यावरच असेल एकूण व्यवसायाची.

**सेक्रेटरी** : हो. तशापैकीच प्रकार आहे.

**बाबा** : वा ! म्हणजे चांगलं स्थळ आहे.

**सेक्रेटरी** : स्थळ म्हणजे ?

**बाबा** : काही नाही. स्थळ घेऊन आलो होतो मुलीचं जरा साहेबांच्याकडं. तशी काही मुलगी देखणी अशातला प्रकार नाही. तिथं आणखीही कुठं तरी प्रेम वगैरे काही तरी आहे असं ऐकलंय्. तसं असलं तर इथं मी माझी मुलगी देणार नाही, तिच्या मनाविरुद्ध. पण मुलीच्या आईचाच आग्रह पडला, दर वेळी आम्हीच आपलं हट्टानं प्रचारदौरे काढत असतो. एकदा म्हटलं तिचं ऐकावं. साहेब येण्याच्या आत विचारून ठेवतो, फोटो वगैरे दाखवावा लागेल का ? का प्रत्यक्ष मुलगी पाहायलाच येता ? का तिला इथं आणू ?

**सेक्रेटरी** : ते मी कसं सांगू ?

**बाबा** : वा ! असं कसं ? हे लग्नाचं तरुण मंडळींनी आपसांतच ठरवायला हवं.

**सेक्रेटरी** : पण माझं ठरलेलं आहे लग्न.

**बाबा** : अरेरे ! म्हणजे माझा हेलपाटा फुकट जाणार म्हणायचा ?

**सेक्रेटरी** : फुकट म्हणजे ?

**बाबा** : मुलीसाठी स्थळ बघायला म्हणून यावं आणि दारी मंगलाष्टकांचा आवाज यावा तसं झालं. मी मोठ्या धूर्तपणानं मुलाजवळ वडिलांच्या आधी लग्नाचा विषय काढला आणि त्यानंच माझ्या हातात अक्षता दिल्या. तशातलं झालं. असो. तुमचं लग्न ठरलं ? शुभं भवतु. अवघा आनंदी आनंद !

**सेक्रेटरी** : मी मुलगा नव्हे साहेबांचा. आपला गैरसमज झालाय्. मी पर्सनल सेक्रेटरी आहे. इन्कमटॅक्स कन्सल्टंट.

**बाबा** : काय गाढव आहे हो मी. म्हणजे हा तुमचा संकोच नोकरीचा, नात्याचा नाही. मला वाटलं भावी सासरा म्हणून तुम्ही मला लाजत होता की काय ? मग आता बसा. मुलगी देखणी नाही वगैरे जे बोललो ना ती तुम्हाला पसंत पडू नये म्हणून. कारण तुम्ही तिला पसंत पडता की नाही कोण जाणे. मुलांच्या कलानं घ्यावं. या बायकांना काही कळत नाही. खरं का नाही ?

**सेक्रेटरी** : आता मी काय सांगू ?

**बाबा** : काहीही सांगा. विचार पुढं गेले पाहिजेत का नाही ? तुमची आमची घरं वेगळी असली तरी चुली सारख्याच. माझ्या मुलीच्या लग्नाची बोलणी तुमच्याशी अशा मोकळेपणानं बोलतो म्हणून तुम्हांला नवल वाटत असेल ना ? असं बोललं पाहिजे. चर्चा केल्या पाहिजेत. समाजसागर ढवळायचा असेल तर लाटेवर लाटा आपटायला हव्यात. आज हा माझा विषय उद्या तुम्हांला मुलगी झाली म्हणजे तुमचा होणार. मुली बघण्याचे सोपस्कार करून, आपण स्वतःचीच मुलगी विकायला काढल्यासारखं मुलीला दाखवायला नेताना मुलीच्या बापाच्या काळजात काय चावत असतं तुम्हांला कल्पना नाही. मग त्यासाठी वेगळे मार्ग शोधले पाहिजेत. त्यासाठी चर्चा केल्या पाहिजेत. मार्ग सापडेल न सापडेल, पण प्रयत्न केला नाही तर पुढच्या पिढीसाठी काही केलं नाहीत असं होणार. सगळ्या भारताचं एक शान्तिनिकेतन व्हावं. संध्याकाळच्या वेळेला एका वयाची सगळी फुलपाखरं काश्मिरी गुलाबांच्या ताटव्यातून तरंगत असावीत. तिथंच त्यांच्या ओळखी व्हाव्यात. सुगंध द्यावा, रंग घ्यावा. रंग

द्यावा, सुगंध घ्यावा. अहो, आयुष्य आहे किती दिवसांचं? आनंद द्यावा. आनंद घ्यावा. अवघा आनंदी आनंद!

**सेक्रेटरी :** आपली मुलं भाग्यवान्. आपल्यासारखे वडील त्यांना मिळाले.

**बाबा :** अहो, माझं भाग्य मोठं. मला अशी मुलं मिळाली. अहो, मुलीही आता सुशिक्षित झालेल्या आहेत. सगळ्याच काही गोदूताई, ठकूताई राह्यलेल्या नाहीत. पण हे बायकांना पटत नाही. घरात कुणी ऐकत नाही. म्हणून बाहेर प्रचार करीत फिरत असतो. बाहेर मारे व्यक्तिस्वातंत्र्यासाठी आक्रान्त करायचा आणि घरात पोरानं जरा हिप्पी कट केला की, त्याच्यावर डाफरायचं. व्यक्ति-स्वातंत्र्य ना? मग मुलगा, मुलगी आणि आई-बाप चार स्वतंत्र व्यक्ती नाहीत. ज्याचं त्याचं आयुष्य स्वतंत्र आहे.

**सेक्रेटरी :** मुलं बेजबाबदार झाली तर?

**बाबा :** त्यांच्या जबाबदारीवर! वयाची खूण म्हणून त्याच्या चेहऱ्यावर वाढणारी मिशी काही तुमच्या वडिलांच्या हाताच्या पाण्यानं वाढत नाही.

**सेक्रेटरी :** मग तुम्ही कसे स्थळ दाखवायला आलात?

**बाबा :** अहो, दौरा अचानक रद्द झाला. स्टेशनवर मी तिकिट काढायला गेलो तर पाकीट मारलं गेलं. आता तसाच परत घरी गेलो असतो तर निवडणुकीचं तिकिट न मिळालेल्या माणसासारखी माझी घरी अवस्था झाली असती म्हणून इकडे आलो. म्हटलं घरीही जरा मंडळींना बरं वाटेल. बरं नाही यांनी पसंत केली तर बरंच झालं. घरी निमित्त झालं, पण इथं येऊन बघतो ते पाकिटाबरोबर तिचा फोटोही गेलेला.

(फुल गाउन, थोडेसे टक्कल, तोंडात पाइप ओढत सुखात्मे प्रवेश करतात.)

**सुखात्मे :** काही आवश्यकता नाही फोटोची. पसंत आहे तुमची मुलगी आम्हांला.

**बाबा :** आहे का याच्यावर काही इलाज?

**सुखात्मे :** कशावर?

**बाबा :** न बघतासुद्धा तुम्ही आमची मुलगी पसंत केलीत. शरीराच्या रथात बसलेल्या आत्म्यानं मान्यता दिल्यावर माणूस तरी काय करणार हो! आणि माणूस म्हणजे तरी शेवटी कोण हो? रथात बसलेला आत्मरथ म्हणजे शरीर, बुद्धी हा सारथी, मनाचा लगाम हातात घेऊन इंद्रियं हे घोडे त्यांना

विषयाची गोचींड लागलेली. आत्मा, इंद्रिये आणि मन ज्यांच्याकडून भोगवलं जातं तो माणूस. तुमची आमची मतं ही ह्या आत्म्याची मतं. ‘ इंद्रियाणि, ह्यानुहुषियास्तेषु गोचरान् । आत्मेन्द्रियमनोसुक्ते भोक्ता इति आहुः । ’ म्हणजे म्हणतात, मनीषिणः म्हणजे मनानं इच्छा करणारा, म्हणजे माणूस.

**सुखात्मे** : काही कळलं नाही. पण सगळं छान आहे. वा ! वा ! आपल्यासारख्या थोर गृहस्थाचे पाय आज या आमच्या झोपडीला लागले. अरे, गुरुजींसाठी दूध वगैरे घेऊन ये. नाही तर नको. ब्रेक-फास्टलाच टेबल लावायला सांग. ( सेक्रेटरी जातो. ) आमच्या सौभाग्यवती जरा उटीला गेलेल्या आहेत.

**बाबा** : म्हणजे घरात आनंद.

**सुखात्मे** : आमच्या घरी नेहमीच असतो. आम्ही दौऱ्यावर असतो, तेव्हा त्या घरी असतात. आम्ही इथे आलो म्हणजे त्या थंड हवेच्या ठिकाणी जातात. संसाराकडं लक्ष द्यायला वेळ कुठाय् ?

**बाबा** : वा ! म्हणजे आपण दोघे समदुःखी.

**सुखात्मे** : ते आहोतच. पण आपण आत्ता उभे असल्यामुळे आम्ही अधिक दुःखी आहोत.

**बाबा** : म्हणजे ?

**सुखात्मे** : कारण तुम्ही बसल्याशिवाय मला बसता येत नाही. ( दोघे बसतात ) आपल्या मुलीच्या संदर्भात पत्र आलं होतं मला माझ्या मुलाचं.

**बाबा** : माझ्या मुलीच्या ?

**सुखात्मे** : तुम्हांला कदाचित माहीत नसेल.

**बाबा** : आश्चर्य आहे. मला कशी बोलली नाही ?

**सुखात्मे** : मुद्दाम बोलली नसेल.

**बाबा** : का ?

**सुखात्मे** : मी इथं येण्याआधी ही गोष्ट या घरात निघाली असती तर हे लग्न झालं नसतं.

**बाबा** : का ?

**सुखात्मे** : त्याच्या आईनं दुसरं स्थळ पक्कं केल्याचं मला कळलं होतं. आजची तारीख त्यानं फायनल म्हणून मला कळवली होती. तशात प्लेन चुकलं.

मुद्दाम चार्टर्ड प्लेन काढून आलो. फार मोठी कॉन्फरन्स होती आंतरदेशीय उद्योगपतींची. पण मुलाच्या आयुष्यापुढं सगळं व्यर्थ हो! त्याचं मन मोडलं म्हणजे आपली कंबरच खचली. आई आहे जरा जुन्या वळणाची. प्रेमविवाह वगैरे काही तिला पसंत नाही. आमचं जसं झालं तसं व्हावं असं तिचं म्हणणं. पण आपण फ्री आहोत. या बाबतीत बंधन नको. आपलं काय मत?

**बाबा** : एक. अहो, लग्न आधी एक बंधन; त्यावर पुन्हा आणखी बंधन. आपलं बरोबर.

**सुखात्मे** : माझं प्लेन चुकलं. पण मी दुसरं करून आलो. हे त्याला कळलेलं नाही. बिचारा काळजीत असेल. कुठं आहे कुणास ठाऊक? ती येण्याच्या आत मला बोलणी करून संध्याकाळच्या प्लेननं जायचं आहे. हाँगकाँग. वेळ कुठाय्...?

**बाबा** : आज जाणार लगेच?

**सुखात्मे** : अहो, निघायलाच हवं. प्रचंड उद्योग आहेत हो. आहे; वरून कुठून तरी होते प्रेरणा, वागतो तसा. एक मोठा ॲल्युमिनियमचा कारखाना बेंगलोरला उघडण्याच्या मार्गावर आहे.

**बाबा** : ॲल्युमिनियम्?

**सुखात्मे** : बघा आता. हा काय धातू आहे? आपल्या लहानपणी हलका धातू म्हणून बघत होतो ना आपण. आज बघा भरपूर डिमांड आहे. लोकच पितळ विकून जस्त घ्यायला लागलेत. आपण तरी काय करायचं? लोकांच्या मूर्ख-पणाचं भांडवल करायचं, शहाणपणाचं सोनं पदरात पाडून घ्यायचं, आणि त्याला नाव द्यायचं व्यापार..

**बाबा** : इतकं सोपं नाही देवा ते.

**सुखात्मे** : काय?

**बाबा** : आम जनता वेडी नसते. कधीच. या भारताच्या भूमीत संतांचं तत्त्वज्ञान जसं जसं रुजत जाईल तशा तशा ऐहिक उपभोगाच्या वस्तू अधिका-अधिक हलक्या होत जाणार.

**सुखात्मे** : समजलं नाही.

**बाबा** : तुम्हांलाच समजलंय्. म्हणून ॲल्युमिनियमचा कारखाना काढता. अहो, हा देहसुद्धा टिकणारा नाही, मग भोजनाची भांडी तेवढी टिकाऊ असून

करायचीत काय ? हे जनताजनार्दनाचं तत्त्वज्ञान झालं, मूर्खपणा नव्हे. पितळेचं भांडं झालं तरी त्याला भोक पडतंच ना ?— ते जस्ताला पडलं, काय बिघडलं ? मी तर म्हणतो, उद्या सरसकट माणसानं मातीची भांडी वापरली तर तुम्ही काय कराल ?

**सुखात्मे :** कुंभाराचा कारखाना काढीन.

**बाबा :** आणि म्हणता तुम्हांला समजलं नाही !

( आतून हातात फोन घेऊन सेक्रेटरी येतो. )

**सेक्रेटरी :** साहेब, धाकट्या साहेबांचा फोन आहे.

**सुखात्मे :** असं का ? हॅलो !....हां...काय रे...अरे...मी दुसरं प्लेन काढून आलो. आय् ॲम् सॉरी...बेटा...तुझी अडचण झाली असेल... डोन्ट वरी. हे बघ, त्या मुलीचा बाप— सॉरी, मुलीचे वडील समोर बसलेले आहेत. मी सांगितलंय् त्यांना तुझं लफडं— सॉरी, मी सांगितलंय् त्यांना मुलगी पसंत आहे म्हणून. अरे, तू बघितली आहेस ना ? मी बघू ? बरं बरं...त्यांच्याबरोबर त्यांच्या घरी येतो. म्हणजे पत्ता चुकायला नको. लगेच संध्याकाळच्या प्लेननं निघालो मी... येतो येतो.. जरा ब्रेकफास्ट घेतो नि येतो...नाही नाही...अजून आली नाही...अच्छा...गुड लक् ! ( फोन घेऊन जातो.) माझा मुलगा, हा नाही, फोनवर बोलला तो. एकटा आहे. लाडका आहे.

**बाबा :** साहजिक आहे.

**सुखात्मे :** साहजिक नाही. माझा असून सद्वर्तनी आहे.

**बाबा :** म्हणजे ?

**सुखात्मे :** आपण म्हणजे आयुष्यात स्वतःला झोकून दिलेली माणसं. रोज नवे देश, नवी आकर्षणं. काय करायचं खोटं बोलून ? सर्व प्रकारचे उपभोग घेत असतो. मोहाचे क्षण आधी येतात कुठं आयुष्यात ? टाकून कशाला द्यायचे ? बेचव आयुष्य जगायचं कशाला ? कुणाला ठाऊक होतं एवढा पैसा आयुष्यात मिळणार होता म्हणून ? पाठवणारा पाठवतो. आम्ही तो वाटत असतो. घेणार काय— बिअर वगैरे ?

**बाबा :** नाही, मी दूध घेईन. तिटकारा वगैरे नाही— पण मूळ काम माझं स्वच्छता करण्याचं.

**सुखात्मे :** हं. तो लौकिक आहे आपला आमच्याही कानावर.

**बाबा :** काही कारण नसताना खांद्यावर घेतलेलं ओझं. जवळ जवळ बेचाळीस शाळा मी चालू करून दिलेल्या आहेत. स्वच्छता एवढा एक जरी सद्गुण एका माणसाला रोज देता आला तरी आपण जो दिवस जगलो तो सकारण जगलो असं वाटतं.

**सुखात्मे :** म्हणजे तुम्ही आमच्या एकदम उलट्या टोकाचे.

**बाबा :** मग त्याही मार्गावर कुणी तरी पाहिजेच की नाही. तेव्हा स्वतः स्वच्छता करणाराचे हात स्वच्छ पाहिजेत ना, म्हणून म्हटलं दूध घेतो.

**सुखात्मे :** वा! आपल्यासारखा थोर गृहस्थ आज आम्हाला व्याही म्हणून लाभला, भाग्यच म्हणायला पाहिजे.

**बाबा :** आता हेच वाक्य मी बोललो म्हणजे वेगळे आभार मानायची गरज नाही.

(अंधार होतो. ब्रेकफास्टला जातात. घरचं दृश्य दिसू लागतं. जिथं दुसरा अंक संपला तिथून पुढे सुरू होतो.)

**उसासे :** काय झालं हो हे, वहिनी ?

**आई :** काहीच सुचेनासं झालंय्.

**उसासे :** असं कसं झालं हो ?

**आई :** अहो, इथं आता मघाशी की हो माझ्याशी बोलून गेले. असा काही योग होता का हो ?

**उसासे :** योग तर असा आहे वहिनी. घडलं तर फार चांगलं तरी घडणार आहे, नाही तर सत्यानाश. सगळे उत्तम ग्रह केंद्रस्थानी एकत्रित झाले की हा योग येतो.

**चैतन्य :** काका, तुमच्यावर कधी मी चिडायचो ना ? तेसुद्धा आवडायचं नाही त्यांना. किती प्रेमळ होते !

**आई :** मी मेलीनं नेहमी म्हणावं, कुठनं या घरात आले,—कधी मनाला लावून घेतलं नाही.

**उसासे :** आणि मी इतका मोकळेपणानं बोलतो ना तुमच्याबरोबर, कधी बिचाऱ्यानं मनाला लावून घेतलेलं नाही संशयी दृष्टीनं. कधीसुद्धा पाहिलेलं नाही.

**आई :** कुणी तरी पाहून तरी या रे,—ही कार्टी कुठं गेलीय् ?

**उसासे :** काही तरी लिहून ठेवलंय् या वहीत.

**चैतन्य** : कुठल्या ? ( चैतन्य उठतो, डायरीकडे जातो. )

**आई** : पण हे यार्डात कशाला गेले मरायला ?

**उसासे** : आता तसंच म्हणायला हवं.

**आई** : कसं व्हायचं पुढच्या आयुष्याचं ? मला कबूल की हो केलं होतं, तुझ्याआधी मी गेलो तर वरूनसुद्धा तुझं दुःख माझ्याच्यानं बघवणार नाही. आता कसं बघता हो तुम्ही ?

**उसासे** : हे पेपरला कळवायला हवं– गृह्यसंस्कार वगैरे. दुकानं उघडी असतात ना रे चोवीस तास सामानाची ?

**आई** : त्याला वेळ आहे हो अजून. आधी पाहून तर या.

**चैतन्य** : माझ्याच्यानं कसं बघवेल ? गाडीखाली छिन्नविच्छिन्न चेहरा मी कसा बघू ?

**उसासे** : मी बघतो. मी जाऊन येतो. झाल्या कर्माला काही इलाज नाही. कुठं हे रूप, कुठं ते रूप !... हे आयुष्य म्हणजे एखाद्या नाटकासारखं आहे. बोल बोल म्हणता केव्हा नाटक संपेल वेळसुद्धा कळायचा नाही. कोणतं पात्र केव्हा जाईल, कोणतं पात्र केव्हा प्रवेश करील, काही सांगता यायचं नाही.

( विहंग येतो. )

**विहंग** : मीना कुठाय् ?

**उसासे** : व्या. आता कुणाचं काय, तर कुणाचं काय ? अहो, इथं प्रसंग कोण गंभीर आहे !

**विहंग** : कसला प्रसंग ?

**उसासे** : टिंकी जीव द्यायला गेलीय्. माझ्या आत्महत्येचा दोष कोणावरही नाही. मी फसले हे बाबांना कळलं म्हणून त्यांनी जीव दिला ! 'बाबा, मला क्षमा करा...'

**विहंग** : म्हणजे गेली कुठं ही ?

**पोलिस** : अवं, ती पोरगी मुडदा वळकायला आलीच नाय. सरळ चौपाटीकडं गेली.

**विहंग** : चौपाटीकडं ? ( पोलिसाला धक्का मारून पळत बाहेर जातो. )

( अंधारातून प्रकाश दिसू लागतो. समोर वाळवंट. समुद्र चौपाटीचा. एकटीच मीना चालत जाताना दिसते. )

मीना :

दूर जातो तो किनारा
दूर ते घर राहिले ।
निरोप घ्यावा जाता जाता
उगाच का वाटले ।। १ ।।

केल्या होत्या होते तेव्हा
ओळखीच्या या खुणा ।
पुसून गेल्या असतिल आता
शब्द निघाला उणा ।। २ ।।

क्षमा असू दे मित्रा मजला
केल्या गेल्याची ।
पुढल्या जन्मी असे न पडणे
गाठ सुदैवाची ।।

जा विसरुनी स्वप्न पहिले
जे एका स्वप्नी
उडून गेले समजपाखरू
धवल नील गगनी
किती क्षणाची ओळख पुरते
जन्म सोबतीला
जन्म संपता काय उरे ते
स्वप्न संगतीला ।

मध्येच तुटली माळ फुलांची
धडधड ओघळली ।
डोळ्यांमधल्या अश्रूंनी ती
मोत्यांची ती केली ।।

नको कुणाचा आता आठव
झाले ते गेले ।
हात पसरुनी खुणावीत मज
माझे बाबा दिसले ।।

**येते बाबा चुकली मुलगी**
**पोटाशी घ्या ना**
**कृपासमुद्रा उदार हाती**
**जीवदान द्या ना ॥**

**विहंग** : मीना...मीना...ए मीना, थांब.

**टिंकी** : कशाला आलास मला वाचवायला ?

**विहंग** : तुला नाही, मला वाचवायला आलेय्.

**टिंकी** : इतकं तुला तोडून बोलले ? तुला काही वाटलं नाही ?

**विहंग** : लाज म्हणतेस ना ? घरी गेल्यावर सांगतो.

**टिंकी** : कुणाच्या ?

**विहंग** : माझ्या....

**टिंकी** : म्हणजे ?

**विहंग** : माझे वडील आले आहेत.

**टिंकी** : हो ? ( हुरळते, गंभीर होते. ) आता काय उपयोग त्याचा ?

**विहंग** : म्हणजे ?

**टिंकी** : बाबा... ! ( हुंदका देते. )

**विहंग** : काय झालंय् ? मीना, मीनू– मला नाही का सांगायचं ?

**टिंकी** : ( हुंदके देत ) माझ्या बाबांनी, तुझ्या बाबतीत मी फसले असंच काही तरी कळलं म्हणून त्यांनी लोकलखाली जीव दिला !

**विहंग** : कुणी जीव दिलाय् ?

**टिंकी** : माझ्या बाबांनी.

**विहंग** : कोण म्हणतं ?

**टिंकी** : म्हणजे ?

**विहंग** : अग, तुझे बाबा माझ्या डॅडींजवळ बसलेले आहेत. माझ्या घरी ! आपल्याच लग्नाची बोलणी चाललीयत. होकार दिलाय् माझ्या बाबांनी.

**टिंकी** : खरं सांगतोस ?

**विहंग** : होय.

**टिंकी** : शपथ ?

**विहंग :** होय, बये. तुझ्या बाबांची शपथ घेऊन सांगतो, की तुझा बाप जिवंत आहे. म्हणून तू जीव द्यायला निघाली होतीस ? किती एसेंट्रिक आहेस ! तुला सांभाळायचं म्हणजे कटकटच आहे आयुष्यभर !

**टिंकी :** हं, पुरे. ए, घरी कुठं बोलू नकोस हं ?

**विहंग :** काय ?

**टिंकी :** मी अशी जीव द्यायला आले होते म्हणून.

**विहंग :** आता कळू दे की.

**टिंकी :** नको, बाबा उगीच मनाला लावून घेतील.

**विहंग :** बाबा, आणि मी कुणीच नाही वाटतं ?

**टिंकी :** तुला कसं कळलं मी इथं असल्याचं ?

**विहंग :** तूच एकदा मागं म्हणाली होतीस, की जीव द्यायला ही कशी छान जागा आहे म्हणून.

**टिंकी :** ते जीव देण्याबद्दल नव्हतं म्हटलं. जिवाला जीव द्यायला—असं म्हटलं होतं.

**विहंग :** मग तो मिळाला असेल म्हणूनच मला कळलं असेल तू इथं आल्याचं.

**टिंकी :** ए ! खरंच, इतकं वाटतं तुला माझ्याबद्दल ?

**विहंग :** कधी कधी. कधी कधी असं वाटतं द्यावी एखादी ठेवून ?

**टिंकी :** ए ! मघाशी फार टाकून बोलले का रे मी तुला ?

**विहंग :** पुरे. लाडात यायचं नाही. आता पहिला स्पर्श केव्हा ? भटजी मम म्हणायला सांगतील तेव्हा. हं, चल घरी !

**पोलिस :** हं. आटपा, कोन येतंय मुडदा बगायला ? कुनी तरी चला. उगा, तापत पडलंय् उन्हात.

**उसासे :** अहो, मेल्या माणसाबद्दल जरा बरं बोला हो.

**पोलिस :** अहो, इथं शेकड्यानं मुडदे बगून बगून जीव मेलाया. मी त्याच—ड्युटीवर हाय. एकदा त्यो मुडदा घेतला की तुम्ही व्हाल जाळून मोकळे. आमच्या डोळ्याम्होरं रोज डझनानं पडतात. अहो, उद्या म्या मेलो. तरी दुःखानं मलासुद्धा रडू येणार नाय. हं, आटपा कोण येतंय् ?

**उसासे :** हं, चल. मी येतो. काही काळजी करू नका हो वहिनी. आईवर जरा

लक्ष ठेव रे. एकट्याच आहेत वहिनी. नका रडू वहिनी. मी आहे ना? गेलेला माणूस कधी परत येणार आहे का? पण मी येणार आहे. येतो मी. (उसासे आणि पोलिस बाहेर जातात.)

**चैतन्य** : आई! बाबा बघ, चष्म्याचं घर इथंच विसरून गेलेत.

**आई** : आता कसलं घर? सृष्टीही गेली आणि दृष्टीही गेली. चष्म्याचं घर राहिलं खालती, आणि ते गेले वरती!

(लोके बाहेरून प्रवेश करतात. गुरुजींच्या खाटेजवळ जाऊन बसतात.)

**लोके** : धाकटे गुरुजी, आता रडून काय उपयोग? आता कितीही रडलात तरी गेलेला माणूस परत येणार आहे का? मला नेहमी रेम्या डोक्याचा म्हणायचे. इतकं माझ्यावर प्रेम करायचे. गुरुजी तुम्ही गेल्यावर मला आता रेम्या डोक्याचा कोण म्हणेल? भारी प्रेमळ. मुलासारखे प्रेम करायचे सगळ्या जगावर. मी नक्की सांगतो मी मिसाखाली पकडला जाणार हे त्यांना कळलं म्हणूनच गुरुजींनी जीव दिला असणार.

**आई** : तुमच्यासाठी कशाला जीव देतील? आम्ही घरातले काय मेलो होतो सगळे?

**लोके** : तसं नाही म्हणत मी.

**चैतन्य** : म्हणजे खरंच बाबा गेले? तुम्ही जाऊन आलात?– त्यांना बघून?

**लोके** : नाही. मी याच बिल्डिंगमध्ये खालच्या टेलरच्या दुकानात भूमिगत झालो होतो. तिथं मी ऐकलं.

**आई** : मग त्यांना एकदा बघून या ना.

**लोके** : हो! जाईन जाईन. फार झालं तर पोलिस पकडतील. एवढा जिवासारखा जीव गेला तिथं पकडला जाण्याची भीती कुणाला? समोरचा माणूस उद्या मरणार आहे ह्या कल्पनेनं त्याच्याकडे पाहिलं की आपल्याला त्याचा राग येत नाही असं काल मला म्हणालात आणि आज स्वतःच निघून गेलात. जय गुरुदेव! (असं म्हणून गुरुजींना नमस्कार करतो.)

**आई** : नक्की गेलेत का नाही ते कळल्याशिवाय मेलं मोकळेपणानं रडतासुद्धा येत नाही.

(फोन वाजू लागतो. चैतन्य फोन घेतो.)

**चैतन्य** : हॅलो! कोण, उसासे? बोला, काय म्हणताय्? काय? एकोणीस

रुपये वीस पैसे बिल झालंय्?...कसलं?...अं? सामान घेऊन माणूस पाठवलाय्?...त्याला वेळ आहे हो अजून. (फोन ठेवतो. बाहेरून दारुड्या प्रवेश करतो.)

**दारुड्या** : हायेत का गुरुजी? (उत्तर नाही) नाय. म्या म्हनलं हायती. का? का वं कोनच बोलना. न्हाई परवा तेस्नी मारलं म्या आमच्या झोपडपट्टीजवळ माझ्या पोरावरनं नशेत दारूच्या. तेंची माफी मागाया अलो हुतो. आजधरनं म्या दारू सोडली म्हून तेस्नी सांगाया आलो हुतो. म्हून म्हटलं हायती का त्ये घरात. वास येतो. नाय, एक मुडदा पोचवायला आलु हुतो. तवा घेतली एक नवटाक. कुनीच बोलत नाय. या घरात, कोन गेलंय काय? पोचवायचं असंल तर सांगा, मी येतो पोचवायला. अरं, कुनीच बोलंना, समदे प्यालेले दिसत्यात.

(दारुड्या जातो. दारात इन्शुअरन्स ऑफिसर येतो.)

**काळे** : नमस्कार, मी इन्शुरन्स ऑफिसर आहे.—काळे.

**चैतन्य** : नमस्कार काळेसाहेब.

**काळे** : अरे, तू आहेस होय इथं? आज गेला नाहीस ऑफिसला?

**चैतन्य** : नाही जरा...हे काही नाही...

**काळे** : बरं, मी आलो होतो अशाकरता—विठ्ठल धोंडो पूर्णपात्रे त्यांची ही पॉलिसी पंचाहत्तर हजारांची, आज पूर्ण होतेय्. त्यांची सही घ्यायला आलो होतो.

**चैतन्य** : सही?

**काळे** : हो; त्याशिवाय हे पैसे मिळणार नाहीत.

**आई** : सही केलीच नाही?

**काळे** : पाच-सहा पत्रं पाठवली. पण उत्तरसुद्धा दिलेलं नाही. म्हणून मुद्दाम इन्क्वायरीला आलो होतो. कुठं आहेत?

**चैतन्य** : आमच्या कानावर एक बातमी आहे की,—ते रेल्वे अपघातात वारले. चौकशीला गेली आहेत मंडळी.

**काळे** : ओ—! आय् ॲम सॉरी!

**आई** : तरी मी पहिल्यापासून म्हणत होते, घराकडं जरा लक्ष द्या. तेवढी सही करून गेले असते तर?

**काळे** : ईश्वर मृतात्म्यास सद्‌गती देवो! असो. तू सही केलीस तर चालेल.

**आई** : याची चालेल ?

**काळे** : हो. चार्टर्ड अकौंटंट आहे हा आमच्या कंपनीचा. फोर्टमध्ये त्याचं स्वतःचं ऑफिस आहे. मी निघतो. मला दुसरी केस आहे. सो मेनी हॅपी रिटर्न्स ऑफ दि डे. सॉरी, चुकून बोललो. तुम्हा सर्व कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असं सांगून मी आपली रजा घेतो. ( तो जातो. )

**आई** : तू चार्टर्ड अकौंटंट आहेस ? तुझं स्वतःचं ऑफिस आहे ? अरे, मग इतके दिवस बोलला नाहीस ? निदान जाताना तरी त्यांना समाधान मिळालं असतं.

**चैतन्य** : व्यवसाय सुरळित चालेपर्यंत घरात बोलायचं नाही म्हणून नव्हतं सांगितलं.

**आई** : मी त्या उसासे भाउजींच्या सांगण्यावरून तुला वाटेल तसं टाकून बोलले. रागावू नकोस रे बाबा, आता तुझाच आधार आहे घराला.

**चैतन्य** : आई, मला तरी कोण आहे तुझ्याशिवाय ? टिंकी कुठं गेली असेल ग ?

**आई** : हे असते तर लगेच बाहेर पडले असते शोधायला. मी गेल्याशिवाय माझं असणं तुम्हांला हवंसं वाटणार नाही. असंसुद्धा बोलले होते रे, माझ्याजवळ. इतकं तोंड टाकायची मी त्यांच्यावर. एका शब्दानं कधी रागानं बोलले नाहीत, या इथं समोर बसून तंबाखू तोंडात टाकायचे.

**चैतन्य** : बाहेरच्या जगात त्यांना किती मान आहे ! बरोबरीच्या नात्यानं किती वेळा त्यांच्याशी बोललो असेन. म्हणायचे, अरे, तू विनोदानं बोलतोस एवढंही मला कळत नाही काय ?

( बाबा आणि सुखात्मे प्रवेश करतात. )

**बाबा** : आम्ही समाजसेवक असलो म्हणून विनोदाचं आम्हाला वावडंच असावं लागतं काय ? अहो, हसत-खेळत सत्कार्य करायचं.

**चैतन्य** : बाबा, तुम्ही आलात ?

**बाबा** : आलात म्हणजे ? दौऱ्याचं म्हणतोस ना ? स्टेशनवर गेलो तर खिडकीजवळ पाकिटच मारलं गेलेलं. दौरा रद्द केला, आणि...

**चैतन्य** : अहो, इथं तुम्ही गेलात अशी बातमी आली होती...

**बाबा** : गेलो म्हणजे ?

**चैतन्य** : मेलात !

**बाबा** : मी ?

**चैतन्य** : रेल्वेखाली सापडलात म्हणून.

**सुखात्मे** : ओ– गॉड !

**चैतन्य** : चेहरा छिन्नविच्छिन्न झालेला आहे. ओळख पटवून घेण्यासाठी गेलेत उसासे.

**बाबा** : अरेरे ! बिचारा ! ( डोळे पुसतो ) पोटासाठी बिचाऱ्या एका जिवानं चोरी केलीन, आणि पोटासाठी जीवच घेऊन गेला.

**आई** : त्याच्यासाठी रडा ! इथं आमची काय दशा झाली असेल तो विचार नका करू. कुठनं ग बाई लग्न करून या घरात आले....

**बाबा** : थांब आधी, यांची-तुझी ओळख करून देतो.

**सुखात्मे** : नाही हो. बोलू दे त्यांना. आमच्याच घरातलं वाक्य तुमच्या घरात ऐकायला मिळालं तिथंच तुमचं आमचं वर एक झालं. अहो, या बायका इथून तिथून सारख्याच. महामूर्ख !

**आई** : काय ?

**सुखात्मे** : तुम्हांला नाही म्हटलं, एकूणच मनामध्ये प्रेम असेल पण तोंडावर कधी दिसेल तर शपथ. असो. कुठाय तुमची ती मुलगी ? एकदा पसंत करून टाकतो. कसली पोरगी गटवलीय् आमच्या पोरानं, एकदा बघून तरी टाकू दे. या एका बाबतीत मात्र पोरानं बापाच्या अगदी वरताण केली. अहो, लग्नानंतरसुद्धा जे आम्हांला जमलं नाही ते त्यानं लग्नाआधी केलं ! बघून टाकू दे एकदा मुलगी. वेळ नाही. संध्याकाळी निघायचंय्. उद्या हाँगकाँग. घराकडं लक्ष द्यायला वेळ कुठाय् ?

**बाबा** : तुम्ही स्थळ बघायला जा म्हणून नेहमी म्हणत होतात ना ? घ्या. आज संधी घेतली. अनायासे दौरा रद्द झालाच आहे. जरा प्रपंचाकडे बघू या. टिंकीला पसंत केलंय यांनी.

**आई** : अहो, पण हे आहेत कोण ?

**बाबा** : हे सुखात्मे.

**आई** : नमस्कार ! मी ओळखलंच नाही आपल्याला.

**सुखात्मे** : कसं ओळखणार ? अहो, ओळखच झाली नाही तर कुठून ओळखणार ?

**बाबा :** चल रे, बोलावून आण टिंकीला. हे तुमचं एक काम मी पूर्ण केलं. आता माझ्या प्रपंचाकडं मी परत वळतो. कुठाय ती ?

**चैतन्य :** ती....ती...

**बाबा :** काय झालं ?

**चैतन्य :** तिला बोलवायला गेलेत.

**बाबा :** कोण ?

**चैतन्य :** जरा एका बाजूला या. ( कानात सांगतो. )

( विहंग आणि मीना प्रवेश करतात. )

**विहंग :** अहो बंधुराज, ही तुमची बहीण. तुमच्या स्वाधीन केलीय्. असल्या एसेंट्रिक मुलीशी मला संसार करता येणार नाही. अहो, ही कुठल्याही क्षणाला जीव द्यायला जाते. मला ते जमणार नाही. तुमची बहीण तुमच्या स्वाधीन केली. तुमचा आमचा संबंध संपला. मी येतो, नमस्कार !

**सुखात्मे :** ए गधड्या, लग्न करायला आता नाही म्हणतोस? आता तू लग्न करणार नाहीस तर काय मी करू ?

**विहंग :** हॅलो डॅड ! ( असं म्हणून शेक हॅंड करतो. पण चूक लक्षात येऊन पाया पडतो. )

**सुखात्मे :** ए, पोरी, बघत काय राहिलीस ? मी सासरा ना तुझा ? पाया पड लवकर. वेळ कुठाय् ? आज संध्याकाळचं प्लेन आहे. हॉंगकॉंग. ( पाया पडते ) लग्नाआधीच कुठं तिला घेऊन फिरत होतास? असो. आई नाही आज तुझी इथं ते एक बरं झालं. अरे पण, एक भानगड आहे गड्या.

**विहंग :** कसली ?

**सुखात्मे :** तुझ्याकरता तुझ्या आईनं ठरवलेली मुलगी ? तिला निरोप द्यावा लागेल. तीसुद्धा मुलगी चांगली आहे. त्या बिचारीला दुःख होणार.

**आई :** आमच्या चैतूला दाखवावी हवी तर.

**बाबा :** छे, छे ! आबाचं नाव कशाला ? त्याला एकदा कुठं तरी स्थिर होऊ दे.

**आई :** अहो, झालंय् काय त्याला ? कुणाजवळ बोलला नव्हता अद्याप. चार्टर्ड अकौंटंट आहे म्हणे. स्वतःचं ऑफिस आहे.

**बाबा :** होय रे ?

**चैतन्य** : ते असू दे, पण ते लग्नाचं वगैरे नको हं लोढणं गळ्यात.

**टिंकी** : ते काही नाही. आबा, तुला केलंच पाहिजे हं लग्न.

**चैतन्य** : हं, टिंके, लग्न ठरल्याबरोबर झाल्यासारखी बोलू नकोस हं.

**विहंग** : का ? का...? तुम्ही आमचं जमवलंत, आम्ही तुमचं जमवतो. अगदी तुमच्या पद्धतीनं...पहिला स्पर्श...पहिला शहारा....

**बाबा** : अहो, पण त्या मुलीला पडेल का हा पसंत ?

**सुखात्मे** : तिचा बाप पसंत करील. पैसा कुठाय् ? आमच्याजवळ आहे. याला देऊन टाकू. प्रभूची कृपा आहे. आपल्याला काय कमी आहे? पैसा काय वाटेल ते करतो. आपण पसंत करायला लावू. चला, एका मांडवात दोन बार. ते पुढचं तुम्ही तुमचं ठरवा. मला जायला हवं. वेळ कुठाय् ? ( उसासे येतात )

**उसासे** : मरून मरायला गेले ते इतक्या लांब यार्डात कशाला गेले कुणास ठाऊक. फुकट उन्हातून रखडपट्टी. फार चांगला मनुष्य गेला. वहिनी, काळजी करू नका, मी आहे ना.

**बाबा** : काय झालं हो ? मी आहे ना !

**उसासे** : अं ? तुम्ही इथंच आहात ?

**चैतन्य** : तुम्ही तिथं जाऊन काय पाहिलंत ?

**उसासे** : चेहरा ओळखता आला नाही !

**चैतन्य** : आणि कपडे अंगावरचे ?

**उसासे** : पार गळ्यापर्यंत पांढरं कापड. ते काय उचलून बघू पंचा आहे का नाही ते पाहण्यासाठी ?

**चैतन्य** : तुम्ही कुंडलीत नाही का बघितलं ?

**उसासे** : मी बरोबर सांगितलं होतं. योगच तसा होता. एक तर संपूर्ण सत्यानाश नाही तर अवघा आनंदी आनंद ! काय वहिनी, सांगितलं होतं की नाही ?

**आई** : होय बाई, बोलला होतात.

**चैतन्य** : थांबा हं. टिंकीचं काय ? प्रेमभंग होईल. वडील ठरवतील त्याच मुलाशी लग्न होईल. मग काय झाला कुठं प्रेमभंग ?

**बाबा** : अरे पण आबा, लग्न ठरवलं मीच यांच्या घरी जाऊन.

**उसासे** : बघ, अरे मग, ह्या होरारत्न उसाशाचं भविष्य आयुष्यात खोटं

होणार नाही.

**सुखात्मे :** हे ज्योतिषी आहेत का ? मग यांनाच मुहूर्त बघायला सांगून टाका. यांना घेऊन जातो बरोबर. एक वधूसंशोधन पूर्ण झालं. दुसरं करून टाकू या. चला हो.

**चैतन्य :** नाही, नाही. मला नाही लग्न करायचं.

**सुखात्मे :** मग हे लग्न होणार नाही.

**चैतन्य :** म्हणजे ?

**सुखात्मे :** त्या मुलीशी तुम्ही लग्नाला तयार असलात तर या मुलीशी याचं लग्न होईल. आम्ही एकदा बोलत असतो. पाल्हाळ बोलत नाही. वेळ कुठाय् ? लौकर... ( चैतन्य उठून टोपी घालतो. )

**टिंकी :** टोपी काय बावळटसारखी ? हे धोतर काय, शर्ट काय ?

**चैतन्य :** दोन्ही धुतलेली आहेत. हे असलं नाही. सात सात दिवस एकच पॅन्ट. रंग आहे म्हणून खपून जातंय्.

**विहंग :** अहो, अशा एका रंगाच्या दोन पॅन्टस् असू शकतात.

**चैतन्य :** मी तुमच्या रंगाबद्दल म्हटलं.

**विहंग :** म्हणजे ?

**चैतन्य :** गोरा रंग आहे, खपून जातंय्. आपलं तसं नाही. शोभलं पाहिजे ना. चेहरा बघावा अन् कपडा करावा. (असं म्हणून चैतन्य बाहेर निघून जातो.)

**सुखात्मे :** चला मंडळी, बरं आहे व्याहीबुवा. ( मिठी मारतो. ) निघालो, आणि वेळ कुठाय् ? ( सगळे जातात )

**उसासे :** वा, सगळं कसं छान. अवघा आनंदी आनंद. एखाद्याचं मरण हे माणसाला फार मोठं शहाणपण शिकवून जातं. आता आलाच आहात तुम्ही परत म्हणून मनात खळखळतंय ते एकदा बोलून टाकतो. आनंदीबाई,— चुकलो, वहिनी, माझी एक चूक तुमच्याजवळ कबूल करतो.

**आई :** कसली ?

**उसासे :** प्रत्येक वेळी तुमची बाजू घेऊन मी यांना बोलायचो. तुम्ही मला चहा-कॉफीचा आग्रह करायच्यात. मी अशी गैरसमजूत करून घेतली होती की यांच्यापासून तुम्हांला काही सुख नाही. तेव्हा तुमचं माझ्यावर मन जडलं असावं, अशी मी उगीचच समजूत करून घेतली होती.

**चैतन्य** : ते असू दे, पण ते लग्नाचं वगैरे नको हं लोढणं गळ्यात.

**टिंकी** : ते काही नाही. आबा, तुला केलंच पाहिजे हं लग्न.

**चैतन्य** : हं, टिंके, लग्न ठरल्याबरोबर झाल्यासारखी बोलू नकोस हं.

**विहंग** : का ? का...? तुम्ही आमचं जमवलंत, आम्ही तुमचं जमवतो. अगदी तुमच्या पद्धतीनं...पहिला स्पर्श...पहिला शहारा....

**बाबा** : अहो, पण त्या मुलीला पडेल का हा पसंत ?

**सुखात्मे** : तिचा बाप पसंत करील. पैसा कुठाय् ? आमच्याजवळ आहे. याला देऊन टाकू. प्रभूची कृपा आहे. आपल्याला काय कमी आहे? पैसा काय वाटेल ते करतो. आपण पसंत करायला लावू. चला, एका मांडवात दोन बार. ते पुढचं तुम्ही तुमचं ठरवा. मला जायला हवं. वेळ कुठाय् ? ( उसासे येतात )

**उसासे** : मरून मरायला गेले ते इतक्या लांब यार्डात कशाला गेले कुणास ठाऊक. फुकट उन्हातून रखडपट्टी. फार चांगला मनुष्य गेला. वहिनी, काळजी करू नका, मी आहे ना.

**बाबा** : काय झालं हो ? मी आहे ना !

**उसासे** : अं ? तुम्ही इथंच आहात ?

**चैतन्य** : तुम्ही तिथं जाऊन काय पाहिलंत ?

**उसासे** : चेहरा ओळखता आला नाही !

**चैतन्य** : आणि कपडे अंगावरचे ?

**उसासे** : पार गळ्यापर्यंत पांढरं कापड. ते काय उचलून बघू पंचा आहे का नाही ते पाहण्यासाठी ?

**चैतन्य** : तुम्ही कुंडलीत नाही का बघितलं ?

**उसासे** : मी बरोबर सांगितलं होतं. योगच तसा होता. एक तर संपूर्ण सत्यानाश नाही तर अवघा आनंदी आनंद ! काय वहिनी, सांगितलं होतं की नाही ?

**आई** : होय बाई, बोलला होतात.

**चैतन्य** : थांबा हं. टिंकीचं काय ? प्रेमभंग होईल. वडील ठरवतील त्याच मुलाशी लग्न होईल. मग काय झाला कुठं प्रेमभंग ?

**बाबा** : अरे पण आबा, लग्न ठरवलं मीच यांच्या घरी जाऊन.

**उसासे** : बघ, अरे मग, ह्या होरारत्न उसाशाचं भविष्य आयुष्यात खोटं

होणार नाही.

**सुखात्मे** : हे ज्योतिषी आहेत का ? मग यांनाच मुहूर्त बघायला सांगून टाका. यांना घेऊन जातो बरोबर. एक वधूसंशोधन पूर्ण झालं. दुसरं करून टाकू या. चला हो.

**चैतन्य** : नाही, नाही. मला नाही लग्न करायचं.

**सुखात्मे** : मग हे लग्न होणार नाही.

**चैतन्य** : म्हणजे ?

**सुखात्मे** : त्या मुलीशी तुम्ही लग्नाला तयार असलात तर या मुलीशी याचं लग्न होईल. आम्ही एकदा बोलत असतो. पाल्हाळ बोलत नाही. वेळ कुठाय् ? लौकर... ( चैतन्य उठून टोपी घालतो. )

**टिंकी** : टोपी काय बावळटसारखी ? हे धोतर काय, शर्ट काय ?

**चैतन्य** : दोन्ही धुतलेली आहेत. हे असलं नाही. सात सात दिवस एकच पॅन्ट. रंग आहे म्हणून खपून जातंय्.

**विहंग** : अहो, अशा एका रंगाच्या दोन पॅन्टस् असू शकतात.

**चैतन्य** : मी तुमच्या रंगाबद्दल म्हटलं.

**विहंग** : म्हणजे ?

**चैतन्य** : गोरा रंग आहे, खपून जातंय्. आपलं तसं नाही. शोभलं पाहिजे ना. चेहरा बघावा अन् कपडा करावा. (असं म्हणून चैतन्य बाहेर निघून जातो.)

**सुखात्मे** : चला मंडळी, बरं आहे व्याहीबुवा. ( मिठी मारतो. ) निघालो, आणि वेळ कुठाय् ? ( सगळे जातात )

**उसासे** : वा, सगळं कसं छान. अवघा आनंदी आनंद. एखाद्याचं मरण हे माणसाला फार मोठं शहाणपण शिकवून जातं. आता आलाच आहात तुम्ही परत म्हणून मनात खळखळतंय ते एकदा बोलून टाकतो. आनंदीबाई,— चुकलो, वहिनी, माझी एक चूक तुमच्याजवळ कबूल करतो.

**आई** : कसली ?

**उसासे** : प्रत्येक वेळी तुमची बाजू घेऊन मी यांना बोलायचो. तुम्ही मला चहा-कॉफीचा आग्रह करायच्यात. मी अशी गैरसमजूत करून घेतली होती की यांच्यापासून तुम्हांला काही सुख नाही. तेव्हा तुमचं माझ्यावर मन जडलं असावं, अशी मी उगीचच समजूत करून घेतली होती.

**आई** : इश्य ! तुमच्यावर ? चेहेरा बघा एकदा आरशात.

**उसासे** : हा नीचेचा शुक्र आहे ना तो नडतो. म्हणून क्षमा मागावी मनापासून. म्हणून मी थांबलो.

**बाबा** : अहो, जाऊ दे, माझा तिच्यावर विश्वास आहे. तिचा माझ्यावर आहे. असो. असतो एकेकाचा स्वभाव.

**उसासे** : आपण तर थोरच पुरुष आहात.

( चैतन्य येतो. )

**चैतन्य** : अहो वासूकाका, त्या दाबक्यांच्या वहिनी तुम्हांला बघत होत्या. काही तरी... त्या दाबक्यांना हार्ट-अॅटॅक आलाय् वाटतं ?

**उसासे** : आला ! मग जायला पाहिजे. शेजारधर्म आहे. आपुलकीनं लक्ष ठेवलं पाहिजे.

( उसासे जातो. )

**आई** : तुम्हांला साधा टेलिफोन करायला काय झालं होतं ?

**बाबा** : कसला ?

**आई** : तुम्ही तिथं असल्याचा...

**बाबा** : पण मी मेलोय् हे मला कुठं ठाऊक होतं ?

**आई** : काही बोलू नका. बसा इथं. मीठ-मोहऱ्या घेऊन येते. ( आत जाऊन मिठाची बरणी घेऊन येते. )

**बाबा** : अग, कशाला ?

**आई** : ( त्यांच्यावरून ओवाळताना ) कुठनं ग बाई लग्न करून या घरात आले ! दुसरं एखादं स्थळ मिळालं असतं तर सुखाचा संसार झाला असता.

**बाबा** : ( तिचा हात हातात घेऊन ) आनंद, अवघा आनंदी आनंद ! आयुष्याच्या कुरणात एका कळपानं राह्यचं ठरवलं ना मग अशा सवयी लावून घ्यायच्या.

तिसरा अंक समाप्त

IRBK-0120161
IRBK-0120161
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २०१६१ नों. दि. २५।१।८४
वि. नाटक क्र. ........